# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१३/ २०१४** **दिनांक २८.०८.२०१४**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ०२.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा गुरुवार दिनांक २८.०८.२०१४ रोजी दुपारी ०२.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २६१६/ २०१४, दिनांक २८ ऑगष्ट, २०१४ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दि. २८.०८.२०१४ रोजी दुपारी ०२.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.कुंदनकुमार सोनवणे, कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०३.०८.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.६७७** दिनांक ०३.०८.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक ०७.०८.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.६७८** दिनांक ०७.०८.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०३** **दिनांक २०.०८.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.६७९** दि.२०.०८.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१. संस्थानचे सर्व्हे नं.१२४ पैकी मधील भांडार इमारतीचे बाजूने असलेले संरक्षक भिंतीची उंची वाढविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडुन त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.९,७६,३५९/-)**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णयः मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४/०२/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ९३ अन्वये संस्थानचे सर्व्हे नं. १२४ पैकी मधील भांडार इमारतीचे बाजुने असलेले संरक्षक भिंतीची उंची वाढविणेकामी विहीतपध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,७६,३५९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावनाः मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी वर्तमानत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आल्या होत्या. विहीत मुदतीत दोन ठेकेदारांनी कोरे निविदा

फॉर्म विकत घेतले होते. त्यापैकी एकाच ठेकेदाराने सिलबंद निविदा सादर केली असल्याने, सदरची सिलबंद निविदा ठेकेदार यांना परत करणेस व याकामी फेर निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेस दि. १७/०६/२०१४ रोजीचे प्रशासकिय मान्यतेने दि. ११/०७/२०१४ ते दि. १८/०७/२०१४ अखेर निविदा विक्रीची मुदत देऊन या कालावधील खालील ठेकेदारांनी कोरे निविदा घेऊन, दि. २१/०७/२०१४ रोजी सादर केल्या आहेत.

| अ. नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | आवक क्र. / दिनांक |
|---|---|---|
| ०१. | श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज | ६६९६ / २१.०७.२०१४ |
| ०२. | श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव | ६६९७ / २१.०७.२०१४ |
| ०३. | श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता | ६७०० / २१.०७.२०१४ |

विभागाचा अभिप्रायः तरी विषयांकीत कामासाठी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या तिन सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला तो खालीलप्रमाणे.

(निविदा दर रु.९,७६,३५९/-)

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील दर रु. |
|---|---|---|
| ०१ | श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता | ९,३७,३०५/-<br>(४% Below) |
| ०२ | श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव | ९,६१,७१४/-<br>(१.५०% Below) |
| ०३ | श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज | ९,७६,३५९/-<br>(Estimated Rate) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील निम्नतम दरधारक श्री.संजय गणपत गायकवाड, राहाता यांना दर निश्चित करणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०२. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५००रुम) व शैक्षणिक संकुल परिसरात Rain Water Harvesting योजना राबविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडुन त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.९,९६,०००/-)**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः- अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णयः मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५/०३/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. १९२ अन्वये खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) व शैक्षणिक संकुल परिसरात Rain Water Harvesting योजना राबविणेसाठी विहीत पध्दतीने निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये ९,९६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावनाः मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी दि.०९/०७/२०१४ रोजीचे दैनिक देशदुत व दैनिक पुढारी या वर्तमानत्रात जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीसाठी दि.११/०७/२०१४ ते दि.१८/०७/२०१४ मुदत देणेत येऊन या कालावधील खालील प्रमाणे निविदांची विक्री करणेत आली आहे.

१. श्री. शशांक कैलास गायकवाड, कोपरगांव
२. श्री. बी.पी.शिंदे, पढेगांव

३. श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता

४. श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज

जाहिरातीनुसार सिलबंद निविदा सादर करणेची मुदत दि. २१/०७/२०१४ रोजी देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत उपरोक्त पैकी खालील तिन ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ. नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | आवक क्र. / दिनांक |
|---|---|---|
| ०१. | श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज | ६६९५ / २१.०७.२०१४ |
| ०२. | श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव | ६६९८ / २१.०७.२०१४ |
| ०३. | श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता | ६६९९ / २१.०७.२०१४ |

विभागाचा अभिप्रायः तरी विषयांकीत कामासाठी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या तिन सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला तो खालीलप्रमाणे.

(निविदा दर रु.९,४८,३८४/-)

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **निविदेमधील दर रु.** |
|---|---|---|
| ०१ | श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज | ९,४८,३८४/-<br>(Estimated Rate) |
| ०२ | श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव | ९,९५,८०३/-<br>(५% Above) |
| ०३ | श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता | ९,००,९६५/-<br>(५% Below) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील निम्नतम दरधारक श्री.संजय गणपत गायकवाड, राहाता यांना दर निश्चित करणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०३. संस्थानचे विविध ठिकाणी बसविणेकरीता नविन स्प्लिट ए.सी.खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून निर्णय होणेबाबत. (रु.४,९२,०००/-)**

**अधिनियम २००४ मधील तरतूद क्र. २१- १ (क)** नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईलः- (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीच्या दिनांक १५.०३.२०१४ चे सभेतील विषय क्र. ४९ निर्णय क्र. २१९ अन्वये संस्थानचे विविध ठिकाणी नवीन स्प्लिट ए.सी. खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,९२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत /११३७ /२०१३ दि.०६-०६-२०१३ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आलेली होती. तसेच वेबसाईटवर कोटेशन नोटीस दि.१२-०६-२०१४ रोजी अपलोड केलेली होती. वेबसाईटवर ही जाहिरात दि.२५-०६-२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती. कोटेशनची विक्री दिनांक १३-०६-२०१४ ते दि. २४-०६-२०१४ अशी होती. तसेच कोटेशन सबमिट करणेची तारीख व वेळ ही दि.२६.०६.२०१४ रोजी ५.०० वाजेपर्यंत अशी होती. त्यानुसार मुदतीत ०३ कोटेशन्स प्राप्त झालेली आहे. मुदतीनंतर मे.टाटर इंटरनॅशनल इंपेक्स कांदिवली (पश्चिम), मुंबई यांचे कोटेशन्स प्रशासन शाखेच्या आवक विभागाकडून दि.२७.०६.२०१४ रोजी उघडलेल्या अवस्थेत प्राप्त झालेले असल्याने ते अपात्र होत आहे.

संस्थानचे विविध ठिकाणी नवीन स्प्लिट ए.सी. खरेदी करुन बसविणेकामी मुदतीत प्राप्त झालेली ०३ कोटेशन्स मा.व्यवस्थापन समितीसमोर उघडणेकामी सादर करावे लागणार आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे:-

**०१) मुदतीत प्राप्त झालेली कोटेशन (पात्र ठरलेले)**

| अ.क्र. | पार्टीचे नांव | आवक क्रमांक व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे. आदर्श एअरकॉन , मुंबई | ५२१२/ २६.०६.२०१४ | कोटेशन १ नग बंद पाकीट. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२) | मे. लकी रेफ्रिजरेशन, नाशिक | ५२१४/२६.०६.२०१४ | ई.एम.डी. +कोटेशन २ नग बंद पाकीट. |
| ०३) | मे. श्री रेफ्रिजरेशन औरंगाबाद | ५२१५/२६.०६.२०१४ | ई.एम.डी. +कोटेशन २ नग बंद पाकीट. |

**०२) मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन (अपात्र)**

| अ.क्र | पार्टीचे नांव | आवक क्रमांक व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे.टाटर इंटरनॅशनल इंपेक्स कांदिवली (पश्चिम), मुंबई | ५२९५/ २७.०६.२०१४ | ई.एम.डी. + कोटेशन पाकिट सामान्य प्रशासन आवक विभागाकडून उघडलेल्या अवस्थेत प्राप्त झाले |

संस्थानचे विविध ठिकाणी नवीन स्प्लिट ए.सी. खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त झालेली उपरोक्त व पात्र ठरलेली ०३ कोटेशन्स आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला तो खालीलप्रमाणे.

(निविदा दर रु.४,९२,०००/-)

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | कोटेशनमधील दर रु. |
|---|---|---|
| ०१ | मे. आदर्श एअरकॉन , मुंबई | ६,००,०००/- |
| ०२ | मे. लकी रेफ्रिजरेशन , नाशिक | ५,३४,३५०/- |
| ०३ | मे. श्री रेफ्रिजरेशन औरंगाबाद | ५,२८,४००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील निम्नतम कोटेशनधारक मे. श्री रेफ्रिजरेशन, औरंगाबाद यांना दर निश्चित करणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**०४. साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग- खुर्ची खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडणेबाबत. (रु.३२,०००/-)**

अधिनियम २००४ मधील तरतुद १७ (२) (झ) मध्ये सर्व साधरणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

त्यानुसार मा.त्रिसदस्य समितीचे दि.०५.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२१ नुसार साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे कार्यालयाकरिता आवश्यक असलेल्या नामंकित कंपनीच्या खुर्च्या विहित पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.३२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाने अधिक्षक यांचेकरिता एक्झीक्युटीव्ह चेअर, हायबॅक गोदरेज कंपनी मॉ.नं.Premier – 7101-R- ०१ नग व खोली आरक्षण काऊंटर करिता गोरदेज कंपनी मॉ.नं.Starr-5D 02R – ०५ नग खरेदी करणेबाबत कळविलेले आहे. सदरचा प्रस्ताव दि.१९.०७.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार इकडील जा.क्र.१९६६/२०१४ दि.२४.०७.२०१४ नुसार संस्थानचे नियमीत पुरवठाधारकांचे (०९) पत्त्यावर दरपत्रक मागणी फॉर्म पाठवून, दरपत्रके मागणी करण्यात आले होते. दरपत्रके स्विकारण्याची अंतिम दि.०६.०८.२०१४ अशी ठेवणेत आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे (०३) दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर | ७२७८/३०.०६.२०१४ |
| ०२. | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | ७४११/०१.०८.२०१४ |
| ०३. | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | ७४१३/०१.०८.२०१४ |

तरी उपरोक्त तीन दरपत्रक आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला तो खालीलप्रमाणे.

(मंजुर रक्कम रु.३२,०००/-)

| अ. नं. | दरपत्रकधारकाचे नांव | रिव्हॉल्वींग चेअर, एक्झ्युक्युटीव्ह हायबॅक (गोदरेज कंपनी) मॉडेल नं. Premier- 7101 R दर प्रती नग | रिव्हॉल्वींग चेअर, (गोदरेज कंपनी) मॉडेल नं. Starr 5 DO2 R दर प्रती नग |
|---|---|---|---|
| | एकुण मागणी - | ०१ नग | ०५ नग |
| ०१ | मे. आर.टी. कराचीवाला, अहदमनगर | ७,०७५.०० | ४,३५०.०० |
| ०२ | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | ८,०००.०० | ५,०००.०० |
| ०३ | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | ७,५९९.०० | ४,६६९.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील निम्नतम दरधारक मे. आर.टी. कराचीवाला, अहदमनगर यांना दर निश्चित करणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**०५. विधी विभाग- टेबल व खुर्ची खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडणेबाबत. (रु.३२,५००/-)**

अधिनियम २००४ मधील तरतुद– १७ (२) (झ) मध्ये सर्व साधरणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

त्यानुसार मा.त्रिसदस्य समितीचे दि.१२.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४९९ नुसार विधी विभागासाठी आवश्यक गोदरेज मेक ऑफिस टेबल (Model No.T-104) व गोदरेज मेक रिव्हॉल्वींग खुर्ची (Model No.PCH-7001 D) खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.३२,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. सदरचा प्रस्ताव दि.१६.०७.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार इकडील जा.क्र.१९२४/२०१४ दि.२२.०७.२०१४ नुसार संस्थानचे नियमीत पुरवठाधारकांचे (०९) पत्त्यावर कोटेशन मागणी फॉर्म पाठवून दरपत्रके मागणी करण्यात आले होते. दरपत्रके स्विकारण्याची अंतिम दि.०२.०८.२०१४ अशी ठेवणेत आलेली होती. त्यानुसार मुदतीअंती फक्त दोनच पुरवठाधारकांची दरपत्रके प्राप्त झालेली होती. लेखापरिक्षणाच्या दृष्टीने कोणतीही खरेदी करणेसाठी किमान ०३ दरपत्रके असणे आवश्यक असते. करिता उर्वरीत पुरवठाधारकांना दुरध्वनीद्वारे दरपत्रके पाठविणेबाबत कळविले असता एका पुरवठाधारकांना दरपत्रक पाठविले. खरेदीकामी आवश्यक ०३ दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **दरपत्रकधारकाचे नांव** | **आवक नंबर व दिनांक** |
|---|---|---|
| ०१. | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | ७४१०/०१.०८.२०१४ |
| ०२. | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | ७४१२/०१.०८.२०१४ |
| ०३. | मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर | ७८५९/०७.०८.२०१४ (मुदतीनंतर) |

तरी उपरोक्त 03 दरपत्रके आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला तो खालीलप्रमाणे.

(मंजुर रक्कम रु.३२,५००/-)

| अ. नं. | दरपत्रकधारकाचे नांव | ऑफिस टेबल, (गोदरेज कंपनी) मॉडेल नं. T-१०४ दर प्रती नग | ऑफिस टेबल, (गोदरेज कंपनी) मॉडेल नं. PCH-७००१ D दर प्रती नग |
|---|---|---|---|
| | एकुण मागणी - | ०१ नग | ०१ नग |
| ०१ | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | २०,४००.०० | १६,०००.०० |
| ०२ | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | २०,२०९.०० | १५,२२९.०० |
| ०३ | मे. आर.टी. कराचीवाला, अहदमनगर | १८,९५०.०० | १४,२००.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील निम्नतम दरधारक मे.आर.टी. कराचीवाला, अहदमनगर यांना दर निश्चित करणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**०६. श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो शस्त्रक्रिया विभागाकरीता Micromoter Burrs खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.२,९९,८००/-)**

**अधिनियम २००४ मधील तरतुद :-** १७-२ (ण)

**प्रस्ताविक :-** श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो शस्त्रक्रिया विभागाने दि.१०/०५/२०१४ रोजीचे मागणी पत्रकान्वये कालेलकर कंपनीच्या Micromoter Burrs ची मागणी केलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Burs Size | Cutting Burr | Diamond Burr | T/C Burr |
|---|---|---|---|---|
| 1. | 3.1 mm | 10 PC | 10 PC | 10 PC |
| 2. | 3.5 mm | 10 PC | 10 PC | 10 PC |
| 3. | 4.0 mm | 10 PC | 10 PC | 10 PC |
| 4. | 4.5 mm | 10 PC | 10 PC | 10 PC |

वरील प्रमाणे Burrs खरेदीकामी M/s.Kalelker Surgical Industries, Mumbai यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी KSI/Q/१०४/२०१४-१५ दि.१०/०५/२०१४ रोजीच्या पत्रान्वये सदर Burrs ंचे दर कळविलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

| Sr No. | Burs Size | Cutting Burr | | | Diamond Burr | | | T/C Burr | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Qty | Rate Per | Total Amt. in RS. | Qty | Rate Per | Total Amt. in RS. | Qty | Rate Per | Total Amt. in RS. |
| १. | ३.१ mm | १० | १९३०.०० | १९३००.०० | १० | २१७५.०० | २१७५०.०० | १० | २७३५.०० | २७३५०.०० |
| २. | ३.५ mm | १० | २०५०.०० | २०५००.०० | १० | २४१५.०० | २४१५०.०० | १० | ३१००.०० | ३१०००.०० |
| ३. | ४.० mm | १० | २०५०.०० | २०५००.०० | १० | २४१५.०० | २४१५०.०० | १० | ३१००.०० | ३१०००.०० |
| ४. | ४.५ mm | १० | २१७५.०० | २१७५०.०० | १० | २६१५.०० | २६१५०.०० | १० | ३२२०.०० | ३२२००.०० |
| | | | | **८२०५०.००** | | | **९६२००.००** | | | **१२१५५०.००** |
| | | | | | | | | | **Total Amt. in Rs. -** | **२९९८००.००** |

**मागणी:-** श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो शस्त्रक्रिया विभाग यांचे दि.१०/०५/२०१४ (औषध भांडार प्राप्त दि.२७/०५/२०१४) चे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-** न्युरो ओ.टी शस्त्रक्रिया विभागात दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी सदर Burrs ची आवश्यकता आहे, तसेच त्यांना Kalelker कंपनीचेच Burrs पाहीजे असल्यामुळे M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai यांचेकडुन खरेदीकामी रक्कम रु.२९९८००/- इतका खर्च येणार आहे.

वरीलप्रमाणे Burr M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai यांचेकडुन खरेदी करावे लागणार असल्यामुळे त्यांना दरात अजुन सुट मिळणेकामी मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविता येईल व चर्चा/वाटाघाटी करुन अंतीम निर्णय घेता येईल.

M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai यांना दरात सुट मिळणेकामी आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटी बोलविण्यात आलेले आहे, तरी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत Micromoter Burrs खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन, विहीत पध्दतीने निविदा मागविणेत याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०७. श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Walk in Fridge खरेदीकामी प्राप्त निविदा उघडुन चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.७,२५,६०४/-)**

श्री साईनाथ रक्तपेढी विभागात सध्या ०४ नग फ्रिज (2°c to 8°c) असे उपलब्ध आहे सदर फ्रिजमध्ये Blood Bag आणि रक्ताच्या विविध तपासणी करणेकामी असलेले केमिकल्स ठेवावे लागते. परंतु दिवसेंदिवस Blood Bag च्या संख्येमध्ये वाढ होत आहे तसेच मागील वर्षी

एका वर्षात एकूण 10974 इतक्या बॅग तयार झाल्या होत्या सदर फ्रिजमध्ये केमिकल्स व **Blood Bag** ठेवण्यासाठी जागा राहत नाही. त्यामुळे रक्तपेढीविभागाने **Walk in fridge (2°c to 8°c)** ची मागणी केलेली आहे. सदर फ्रिजची साईज ही रुंदी 6.75 **X** लांबी 6.**75 x** उंची 7.50 फुट अशी आहे. सध्या त्यांचेकडे असलेले 04 फ्रिज हे **Standby** म्हणून वापरता येऊ शकेल सदर फ्रिज बसविल्यास त्यासाठी 400 वॅट इतका विद्युत पुरवठा वाढणार आहे.

सदर **Walk in Fridge** खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी इकडील पत्र् क्र. 1537 दि. 15/07/2013 चे पत्रान्वये **M/s. Megastar Engineering, Pune** व **M/s. Blue Star, Mumbai** यांचेकडून दरपत्रक मागविले होते. त्यानुसार **M/s. Megastar Engineering, Pune** यांनी त्यांचे पत्र् क्र. 250/**CR/PH/13/07/01** दि. 20/07/2013 चे पत्रान्वये दर कळविलेले होते. त्यांचे दरपत्रकानुसार 01 नग **Walk in Fridge** खरेदीकामी रक्कम रु. 725605/- इतका खर्च येणार आहे. श्री साईनाथ रक्तपेढी विभाग यांनी दि. 20/06/2013 (औषध भांडार प्राप्त दि. 02/07/2013) चे मागणी पत्रान्वये **Walk in Fridge** ची मागणी केलेली आहे.

दि. ०८/१०/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. ७२९ अन्वये वरील मागणीप्रमाणे ०१ नग **Walk in Fridge** विहित पद्धतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु.७,२५,६०४/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात लोकमंथन– नाशिक, युवावार्ता– संगमनेर, देशदूत– अहमदनगर या वर्तमान पत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि. ०१/०२/२०१४ ते दि. १५/०२/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. १८/०२/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण १० उत्पादक कंपन्या/ पुरवठा धारक यांना इकडील पत्र् क्र. ७००६ दि. २९/०१/२०१४ अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र् पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही तर शिर्डी येथील कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. J. K. Sales & Services, Aurangabad | 18/02/2014 |
| 2. | M/s. Megastar Engineering, Pune | 18/02/2014 |

अ) तेव्हा उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०२ सिलबंद निविदा मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्याच दिवशी निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्याचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी.

किंवा

ब) या कामी फेर निविदा मागवणेचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे ठेवावा.

उपरोक्त पैकी अ किंवा ब या प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदर प्रस्ताव दि. १२/०४/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीपुढे सादर करण्यात आला होता. यावर निर्णयहोऊन सदरचे खरेदीकामी वर्तमानपत्रात फेर जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले होते. त्यानुसार सदरचे खरेदीकामी सार्वमत– अहमदनगर, देशदूत– नाशिक या वर्तमानपत्रात फेर जाहिरात देऊन दि. १२/०५/२०१४ ते दि. २४/०५/२०१४ पर्यंत निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या, तर निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि. २७/०५/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण ०९ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारकयांना इकडील पत्र् क्र. ७६५ दि. ०६/०५/२०१४ अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेकामी पत्र् पाठविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत –

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1. | M/s. Megatrade, Pune | 27/05/2014 |
| 2. | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad. | 18/02/2014 |

तरी उपरोक्तप्रमाणे प्रथम जाहिरातीस अनुसरुन प्राप्त दोन निविदा व दिवतीय जाहिरातीस अनुसरुन प्राप्त दोन निविदा अशा एकूण चार निविदा आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला तो खालीलप्रमाणे.

(निविदा दर रु.७,२५,६०४/-)

| Sr. No. | Description | M/s. J. K. Sales & Services, Aurangabad (Make- Remi) | M/s. Megastar Engineering, Pune (Make- Blue Star) | M/s. Megatrade, Pune (Make- Blue Star) | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad. (Make- Remi) |
|---|---|---|---|---|---|
| | | Rate Per in Rs. | Rate Per in Rs. | Rate Per in Rs. | Rate Per in Rs. |
| 1 | Walk in Fridge | 8,32,500/- | 9,94,444/- | 11,90,000/- | 8,32,500/- |
| | Warranty | | 3 Year | 3 Year | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील समान निम्नतम दरधारक मे.जे.के. सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद व मे.सिध्दी मेडीकल डिस्ट्रीब्युटर्स्, औरंगाबाद यांना दर निश्चित करणेकामी पुढील उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०८. श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Harmonic Scalpel Set च्या Accessories चे दर निश्चित करणेबाबत.**

**०९. देणगी स्वरुपात उदीप्रसाद पाकिटे पॅकिंग मशिन स्वीकारणे बाबत.**

**१०. मंदिर परिसरातील लेंडीबागेचे नुतनीकरण करणेबाबत. (रु.५,६८,०००/-)**

**११. साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता फर्निचर देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत. (रु.२,४१,३५०/-)**

**१२. प्लॅस्टिक जग, मग, डस्टबीन खरेदी करणेबाबत. (रु.४६,०००/-)**

**१३. श्री साईप्रसादालय स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत. (रु.८८,५००/-)**

**१४. श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.- II विभागाकरीता Fully Automated Horizontal Autoclave Machine Buyback करुन नविन खरेदीबाबत. (रु.४,९५,०००/-)**

**१५. श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT-I करीता Surigcal Instrument खरेदीबाबत. (रु.७१,०५०/-)**

**१६. श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाकरीता फर्निचर खरेदी करणेबाबत. (रु.७,९९,४२१/-)**

**१७. श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सेंट्रल मेडीकल गॅस प्लँट विभागाकरीता एअर कॉम्प्रेसर खरेदी करणेबाबत. (रु.३,६५,६२५/-)**

**१८. ई.डी.पी.विभागाकरीता नविन टोनर खरेदी करणेबाबत. (रु.२,१९,५००/-)**

**वेळे अभावी उपरोक्त विषय नं.०८ ते १८ या विषयांवर चर्चा होऊ शकली नाही, यामुळे सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

---

**विषय नं.०४ दिनांक २१.०८.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.६८०** दि.२१.०८.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१. संस्थानचे सर्व्हे नं.१२४ पैकी मधील भांडार इमारतीचे बाजूने असलेले संरक्षक भिंतीची उंची वाढविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडुन त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.९,७६,३५९/-)**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद ः अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णयः मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४/०२/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ९३ अन्वये संस्थानचे सर्व्हे नं. १२४ पैकी मधील भांडार इमारतीचे बाजुने असलेले संरक्षक भिंतीची उंची वाढविणेकामी विहीतपध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,७६,३५९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावनाः मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी वर्तमानत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आल्या होत्या. विहीत मुदतीत दोन ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते. त्यापैकी एकाच ठेकेदाराने सिलबंद निविदा सादर केली असल्याने, सदरची सिलबंद निविदा ठेकेदार यांना परत करणेस व याकामी फेर निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेस दि. १७/०६/२०१४ रोजीचे प्रशासकिय मान्यतेने दि. ११/०७/२०१४ ते दि. १८/०७/२०१४ अखेर निविदा विक्रीची मुदत देऊन या कालावधील खालील ठेकेदारांनी कोरे निविदा घेऊन, दि.२१/०७/२०१४ रोजी सादर केल्या आहेत.

| अ. नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | आवक क्र. / दिनांक |
|---|---|---|
| ०१. | श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज | ६६९६ / २१.०७.२०१४ |
| ०२. | श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव | ६६९७ / २१.०७.२०१४ |
| ०३. | श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता | ६७०० / २१.०७.२०१४ |

विभागाचा अभिप्रायः तरी विषयांकीत कामासाठी उघडणेत आलेल्या निविदेतील निम्नतम दरधारक यांना आजचे सभेपुढे बोलविणेत आले असता त्यांनी चर्चेअंती खालील प्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

(निविदा दर रु.९,७६,३५९/-)

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता | ९,३७,३०५/- (४% Below) | ९,१७,७७७/- (६% Below) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निम्नतम दरधारक श्री.संजय गणपत गायकवाड, राहाता यांनी चर्चेअंती देऊ केलेले निविदा रकमेवर ०६% कमी (रु.९,१७,७७७/-) मात्र दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०२. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५००रुम) व शैक्षणिक संकुल परिसरात Rain Water Harvesting योजना राबविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडुन त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.९,९६,०००/-)**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः- अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय ः मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १५/०३/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. १९२ अन्वये खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

''..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) व शैक्षणिक संकुल परिसरात Rain Water Harvesting योजना राबविणेसाठी विहीत पध्दतीने निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये ९,९६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.''

प्रस्तावनाः मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी दि. ०९/०७/२०१४ रोजीचे दैनिक देशदुत व दैनिक पुढारी या वर्तमानत्रात जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीसाठी दि. ११/०७/२०१४ ते दि. १८/०७/२०१४ मुदत देणेत येऊन या कालावधील खालील प्रमाणे निविदांची विक्री करणेत आली आहे.

1. श्री. शशांक कैलास गायकवाड, कोपरगांव
2. श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव
3. श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता
4. श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज

जाहिरातीनुसार सिलबंद निविदा सादर करणेची मुदत दि. २१/०७/२०१४ रोजी देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत उपरोक्त पैकी खालील तिन ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ. नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | आवक क्र. / दिनांक |
|---|---|---|
| ०१. | श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज | ६६९५ / २१.०७.२०१४ |
| ०२. | श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव | ६६९८ / २१.०७.२०१४ |
| ०३. | श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता | ६६९९ / २१.०७.२०१४ |

विभागाचा अभिप्रायः तरी विषयांकीत कामासाठी उघडणेत आलेल्या निविदेतील निम्नतम दरधारक यांना आजचे सभेपुढे बोलविणेत आले असता त्यांनी चर्चेअंती खालील प्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

(निविदा दर रु.९,४८,३८४/-)

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.संजय गणपत गायकवाड, राहाता | ९,००,९६५/-<br>५% Below | ८,८१,९९७/-<br>(७% Below) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निम्नतम दरधारक श्री.संजय गणपत गायकवाड, राहाता यांनी चर्चेअंती देऊ केलेले निविदा रकमेवर ०७% कमी (रु.८,८१,९९७/-) मात्र दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०३. संस्थानचे विविध ठिकाणी बसविणेकरीता नविन स्प्लिट ए.सी.खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून निर्णय होणेबाबत. (रु.४,९२,०००/-)**

**अधिनियम २००४ मधील तरतूद क्र. २१- १ (क)** नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचाविनियोग पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईलः- (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीच्या दिनांक १५.०३.२०१४ चे सभेतील विषय क्र. ४९ निर्णय क्र. २१९ अन्वये संस्थानचे विविध ठिकाणी नवीन स्प्लिट ए.सी. खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,९२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत /११३७ /२०१३ दि.०६-०६-२०१३ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आलेली होती. तसेच वेबसाईटवर कोटेशन नोटीस दि.१२-०६-२०१४ रोजी अपलोड केलेली होती. वेबसाईटवर ही जाहिरात दि.२५-०६-२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती. कोटेशनची विक्री दिनांक १३-०६-२०१४ ते दि. २४-०६-२०१४ अशी होती. तसेच कोटेशन सबमिट करणेची तारीख व वेळ ही दि.२६.०६.२०१४ रोजी ५.०० वाजेपर्यंत अशी होती. त्यानुसार मुदतीत ०३ कोटेशन्स प्राप्त झालेली आहे. मुदतीनंतर मे.टाटर इंटरनॅशनल इंपेक्स कांदिवली (पश्चिम), मुंबई यांचे कोटेशन्स प्रशासन शाखेच्या आवक विभागाकडून दि.२७.०६.२०१४ रोजी उघडलेल्या अवस्थेत प्राप्त झालेले असल्याने ते अपात्र होत आहे.

संस्थानचे विविध ठिकाणी नवीन स्प्लिट ए.सी. खरेदी करुन बसविणेकामी मुदतीत प्राप्त झालेली ०३ कोटेशन्स मा.व्यवस्थापन समितीसमोर उघडणेकामी सादर करावे लागणार आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

**०१). मुदतीत प्राप्त झालेली कोटेशन (पात्र ठरलेले )**

| अ.क्र. | पार्टीचे नांव | आवक क्रमांक व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे. आदर्श एअरकॉन , मुंबई | ५२१२/ २६.०६.२०१४ | कोटेशन १ नग बंद पाकीट. |
| ०२) | मे. लकी रेफ्रिजरेशन , नाशिक | ५२१४/२६.०६.२०१४ | ई.एम.डी. +कोटेशन २ नग बंद पाकीट. |
| ०३) | मे. श्री रेफ्रिजरेशन औरंगाबाद | ५२१५/२६.०६.२०१४ | ई.एम.डी. +कोटेशन २ नग बंद पाकीट. |

**०२) मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन (अपात्र)**

| अ.क्र | पार्टीचे नांव | आवक क्रमांक व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे.टाटर इंटरनॅशनल इंपेक्स कांदिवली (पश्चिम), मुंबई | ५२९५/२७.०६.२०१४ | ई.एम.डी. + कोटेशन पाकिट सामान्य प्रशासन आवक विभागाकडून उघडलेल्या अवस्थेत प्राप्त झाले |

संस्थानचे विविध ठिकाणी नवीन स्प्लिट ए.सी. खरेदी करुन बसविणेकामी उघडणेत आलेल्या कोटेशनमधील निम्नतम कोटेशनधारक यांना आजचे सभेपुढे बोलविणेत आले असता त्यांनी चर्चेअंती खालील प्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| **अ.नं.** | **कोटेशनधारकाचे नाव** | **कोटेशनमधील दर रु.** | **चर्चेअंती देऊ केले दर रु.** |
|---|---|---|---|
| ०१ | मे. श्री रेफ्रिजरेशन औरंगाबाद | ५,२८,४००/- | ४,९९,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निम्नतम कोटेशनधारक मे.श्री रेफ्रिजरेशन, औरंगाबाद यांनी चर्चेअंती देऊ केलेले रु.४,९९,०००/- मात्र दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**तसेच याकामी येणाऱ्या रु.७,०००/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता असावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**०४. साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग- खुर्ची खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडणेबाबत. (रु.३२,०००/-)**

अधिनियम २००४ मधील तरतुद १७ (२) (झ) मध्ये सर्व साधरणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

त्यानुसार मा.त्रिसदस्य समितीचे दि.०५.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२१ नुसार साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे कार्यालयाकरिता आवश्यक असलेल्या नामंकित कंपनीच्या खुर्च्या विहित पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.३२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाने अधिक्षक यांचेकरिता एक्झीक्युटीव्ह चेअर, हायबॅक गोदरेज कंपनी मॉ.नं.Premier – 7101-R- ०१ नग व खोली आरक्षण काऊंटर करिता गोरदेज कंपनी मॉ.नं.Starr-5D 02R – ०५ नग खरेदी करणेबाबत कळविलेले आहे. सदरचा प्रस्ताव दि.१९.०७.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार इकडील जा.क्र.१९६६/२०१४ दि.२४.०७.२०१४ नुसार संस्थानचे नियमीत पुरवठाधारकांचे (०९) पत्त्यावर दरपत्रक मागणी फॉर्म पाठवून, दरपत्रके मागणी करण्यात आले होते. दरपत्रके स्विकारण्याची अंतिम दि.०६.०८.२०१४ अशी ठेवणेत आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे (०३) दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत.

| **अ.नं.** | **दरपत्रकधारकाचे नांव** | **आवक नंबर व दिनांक** |
|---|---|---|
| ०१. | मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर | ७२७८/३०.०६.२०१४ |
| ०२. | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | ७४११/०१.०८.२०१४ |
| ०३. | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | ७४१३/०१.०८.२०१४ |

तरी उपरोक्त तीन दरपत्रक आजचे उपसमिती सभेत उघडणेत आलेल्या दरपत्रकातील निम्नतम दरधारक यांना आजचे सभेपुढे बोलविणेत आले असता ते अनुपस्थित होते. त्यांनी ई-मेलव्दारे खालील प्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | तपशिल | मे. आर.टी. कराचीवाला, अहदमनगर | |
|---|---|---|---|
| | | दरपत्रकधारकामधील दर रु. | ई-मेलव्दारे देऊ केले दर रु. व्हॅटसह |
| ०१ | रिव्हॉल्वींग चेअर, एक्झ्युक्युटीव्ह हायबॅक (गोदरेज कंपनी) मॉडेल नं. Premier-7101 R (मागणी- ०१ नग) | ७,०७५/- | **७,०००/-** |
| ०२ | रिव्हॉल्वींग चेअर, (गोदरेज कंपनी) मॉडेल नं. Starr 5 DO2 R (मागणी- ०५ नग) | ४,३५०/- | **४,३००/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निम्नतम दरधारक मे. आर.टी. कराचीवाला, यांनी ई-मेलव्दारे देऊ केलेले प्रती नगासाठी गडद व अधोरेखीत केलेले दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**०५. विधी विभाग- टेबल व खुर्ची खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडणेबाबत. (रु.३२,५००/-)**

अधिनियम २००४ मधील तरतुद– १७ (२) (झ) मध्ये सर्व साधरणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

त्यानुसार मा.त्रिसदस्य समितीचे दि.१२.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४९९ नुसार विधी विभागासाठी आवश्यक गोदरेज मेक ऑफिस टेबल (Model No.T-104) व गोदरेज मेक रिव्हॉल्वींग खुर्ची (Model No.PCH-7001 D) खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.३२,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. सदरचा प्रस्ताव दि.१६.०७.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार इकडील जा.क्र.१९२४/२०१४ दि.२२.०७.२०१४ नुसार संस्थानचे नियमीत पुरवठाधारकांचे (०९) पत्त्यावर कोटेशन मागणी फॉर्म पाठवून दरपत्रके मागणी करण्यात आले होते. दरपत्रके स्विकारण्याची अंतिम दि.०२.०८.२०१४ अशी ठेवणेत आलेली होती. त्यानुसार मुदतीअंती फक्त दोनच पुरवठाधारकांची दरपत्रके प्राप्त झालेली होती. लेखापरिक्षणाच्या दृष्टीने कोणतीही खरेदी करणेसाठी किमान ०३ दरपत्रके असणे आवश्यक असते. करिता उर्वरीत पुरवठाधारकांना दुरध्वनीद्वारे दरपत्रके पाठविणेबाबत कळविले असता एका पुरवठाधारकांना दरपत्रक पाठविले. खरेदीकामी आवश्यक ०३ दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | ७४१०/०१.०८.२०१४ |
| ०२. | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | ७४१२/०१.०८.२०१४ |
| ०३. | मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर | ७८५९/०७.०८.२०१४ (मुदतीनंतर) |

तरी उपरोक्त 03 दरपत्रके आजचे उपसमिती सभेत उघडणेत आलेल्या दरपत्रकातील निम्नतम दरधारक यांना आजचे सभेपुढे बोलविणेत आले असता ते अनुपस्थित होते. त्यांनी ई-मेलव्दारे खालील प्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | तपशिल | मे. आर.टी. कराचीवाला, अहदमनगर | |
|---|---|---|---|
| | | दरपत्रकधारकामधील दर रु. | ई-मेलव्दारे देऊ केले दर रु. व्हॅटसह |
| ०१ | ऑफिस टेबल, (गोदरेज कंपनी) मॉडेल नं. T-१०४ (मागणी- ०१ नग) | १८,९५०/- | **१८,९००/-** |
| ०२ | रिव्हाल्वींग चेअर, (गोदरेज कंपनी) मॉडेल नं. PCH-७००१ D (मागणी- ०१ नग) | १४,२००/- | **१४,१००/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निम्नतम दरधारक मे. आर.टी. कराचीवाला, यांनी ई-मेलव्दारे देऊ केलेले प्रती नगासाठी गडद व अधोरेखीत केलेले दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**तसेच याकामी येणाऱ्या रु.५००/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता असावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.०४ दिनांक २१.०८.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.६८०** दि.२१.०८.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०६. श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Walk in Fridge खरेदीकामी प्राप्त निविदा उघडुन चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.७,२५,६०४/-)**

श्री साईनाथ रक्तपेढी विभागात सध्या ०४ नग फ्रिज (2°c to 8°c) असे उपलब्ध आहे सदर फ्रिजमध्ये Blood Bag आणि रक्ताच्या विविध तपासणी करणेकामी असलेले केमिकल्स ठेवावे लागते. परंतु दिवसैंदिवस Blood Bag च्या संख्येमध्ये वाढ होत आहे तसेच मागील वर्षी एका वर्षात एकूण 10974 इतक्या बॅग तयार झाल्या होत्या सदर फ्रिजमध्ये केमिकल्स व Blood Bag ठेवण्यासाठी जागा राहत नाही. त्यामुळे रक्तपेढीविभागाने Walk in fridge (2°c to 8°c) ची मागणी केलेली आहे. सदर फ्रिजची साईज ही रुंदी 6.75 X लांबी 6.75 x उंची 7.50 फुट अशी आहे. सध्या त्यांचेकडे असलेले 04 फ्रिज हे Standby म्हणून वापरता येऊ शकेल सदर फ्रिज बसविल्यास त्यासाठी 400 वॅट इतका विद्युत पुरवठा वाढणार आहे.

सदर Walk in Fridge खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी इकडील पत्र् क्र. 1537 दि. 15/07/2013 चे पत्रान्वये M/s. Megastar Engineering, Pune व M/s. Blue Star, Mumbai यांचेकडून दरपत्रक मागविले होते. त्यानुसार M/s. Megastar Engineering, Pune यांनी त्यांचे पत्र् क्र. 250/CR/PH/13/07/01 दि. 20/07/2013 चे पत्रान्वये दर कळविलेले होते. त्यांचे दरपत्रकानुसार 01 नग Walk in Fridge खरेदीकामी रक्कम रु. 725605/- इतका खर्च येणार आहे. श्री साईनाथ रक्तपेढी विभाग यांनी दि. 20/06/2013 (औषध भांडार प्राप्त दि. 02/07/2013) चे मागणी पत्रान्वये Walk in Fridge ची मागणी केलेली आहे.

दि. ०८/१०/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. ७२९ अन्वये वरील मागणीप्रमाणे ०१ नग Walk in Fridge विहित पद्धतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु. ७,२५,६०४/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात लोकमंथन – नाशिक, युवावार्ता – संगमनेर, देशदूत – अहमदनगर या वर्तमान पत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि. ०१/०२/२०१४ ते दि. १५/०२/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. १८/०२/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण १० उत्पादक कंपन्या/ पुरवठा धारक यांना इकडील पत्र् क्र. ७००६ दि. २९/०१/२०१४ अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र् पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही तर शिर्डी येथील कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. J. K. Sales & Services, Aurangabad | 18/02/2014 |
| 2. | M/s. Megastar Engineering, Pune | 18/02/2014 |

अ) तेव्हा उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०२ सिलबंद निविदा मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्याच दिवशी निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्याचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी.

किंवा

ब) या कामी फेर निविदा मागवणेचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे ठेवावा.

उपरोक्त पैकी अ किंवा ब या प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदर प्रस्ताव दि. १२/०४/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीपुढे सादर करण्यात आला होता. यावर निर्णयहोऊन सदरचे खरेदीकामी वर्तमानपत्रात फेर जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले होते. त्यानुसार सदरचे खरेदीकामी सार्वमत– अहमदनगर, देशदूत– नाशिक या वर्तमानपत्रात फेर जाहिरात देऊन दि. १२/०५/२०१४ ते दि. २४/०५/२०१४ पर्यंत निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या, तर निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि. २७/०५/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण ०९ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारकयांना इकडील पत्र् क्र. ७६५ दि.०६/०५/२०१४ अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेकामी पत्र् पाठविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत–

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. Megatrade, Pune | 27/05/2014 |
| 2. | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad. | 18/02/2014 |

तरी उपरोक्तप्रमाणे प्रथम जाहिरातीस अनुसरुन प्राप्त दोन निविदा व दिवतीय जाहिरातीस अनुसरुन प्राप्त दोन निविदा अशा एकूण चार निविदा उपसमिती सभेत उघडणेत आलेल्या निविदेतील समान निम्नतम कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे बोलविणेत आले असता त्यांनी चर्चेअंती खालील प्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | तपशिल | मे. जे.के. सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरगांवाद (Make- Remi) | | मे.सिध्दी मेडीकल डिस्ट्रीब्युटर्स, औरगांवाद (Make- Remi) | |
|---|---|---|---|---|---|
| | | निविदेमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केले दर रु. | निविदेमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केले दर रु. |
| 1 | Walk in Fridge | ८,३२,५००/- | **७,६५,९००/-** | ८,३२,५००/- | ८,१५,८५०/- |
| | **वॉरंटी -** | | ०३ वर्ष | ०३ वर्ष | |
| | **AMC** | 3% escatation every year of Total Valve | | 3% escatation every year of Total Valve | |
| | **CMC** | 5% escatation every year of Total Valve | | 5% escatation every year of Total Valve | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Walk in Fridge साठी मे.जे.के. सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचे निम्नतम दर रु.७,६५,९००/- मात्र स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच वॉरंटी कालावधी संपल्यानंतर त्यांचेकडे दर वर्षी वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे AMC/CMC करणेत यावी.**

**तसेच याकामी येणाऱ्या रु.४०,२९६/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता असावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०५** **श्री.बाजीराव नामदेव शेळके पा., श्री.साहेबराव नामदेव शेळके रा.शिर्डी यांनी त्यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील गट नंबर २१३ मधील क्षेत्र २ एकर जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून दिलेला प्रस्ताव.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री बाजीराव नामदेव शेळके, श्री साहेबराव नामदेव शेळके रा.शिर्डी यांनी त्यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील गट नंबर २१३ मधील क्षेत्र २ एकर जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून प्रस्ताव दिलेला आहे.

नविन विकास आराखडयानुसार स.नं.२०७,२०८ व २१५ पैकी २.५९ हे.क्षेत्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे करीता आरक्षीत आहे.

वरील प्रमाणे आरक्षीत झालेल्या क्षेत्रामध्ये श्री.बाजीराव नामदेव शेळके व श्री साहेबराव नामदेव शेळके यांचे मालकीचे गट नं.२१३ मधील क्षेत्र २ एकर (अंदाजे) ते श्री साईबाबा संस्थानला सरकारी नियमाप्रमाणे विकत देण्यास तयार आहेत.

**(ब)** नविन विकास आराखडयाची माहिती देणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना इकडील दि.२३ मे,२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते.

मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्र.न.प./टे.क्र.-८/१९०७/२०१४ दि.१६ जून,२०१४ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे माहिती कळविलेली आहे.

"शिर्डी नगरपंचायतीची हद्दवाढ सन २००१मध्ये करण्यात आलेली असून वाढीव हद्दीचा प्रारुप विकास आराखडा शासनाचे मंजूरीसाठी मा.उपसंचालक नगररचना, नाशिक यांचेमार्फत सादर करण्यात आलेला आहे. सादर करण्यात आलेल्या प्रारुप विकास योजनेनुसार स.नं.२१२ व स.नं.२१३ चे क्षेत्रामध्ये दक्षिण-उत्तर १५ मी.रस्ता दर्शविण्यता आला असून सदर रस्त्याच्या पुर्वेकडील क्षेत्र हे श्री साईबाबा संस्थानकरीता शैक्षणीक हेतु करीता आरक्षीत असून त्याची विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान दर्शविण्यात आलेली आहे.

वाढीव हद्दीची अंतीम विकास योजना शासनाकडून मंजूर झाल्यानंतर व शासनाकडून मंजूर नकाशा प्राप्त झाल्यानंतर आपणास त्याप्रमाणे कळविण्यात येईल."

यावरुन असे निदर्शनास येते की, वाढीव हद्दीचा प्रारुप विकास आराखडा शासनाचे मंजूरीसाठी सादर केलेला आहे. अद्याप शासनाची मंजूरी मिळालेली नाही.

**खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे.**

१.श्री बाजीराव नामदेव शेळके, श्री साहेबराव नामदेव शेळके रा.शिर्डी यांनी त्यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील गट नंबर २१३ मधील क्षेत्र २ एकर जमीन विकत घेणे अथवा न घेणे.

२. जमीन घेणेचा निर्णय झाला तर श्री. शेळके यांना समक्ष चर्चेसाठी बोलावून योग्य ती किंमत ठरविणे.

३. जमीन घेणेचा निर्णय झाला तर संस्थानच्या वकीलांकडून सर्च रिपोर्ट घेणे व अभिप्राय घेणे तसेच खरेदीखताचा मसुदा तयार करुन घेणे. या सर्व खर्चास व इतर तदनुषंगीक स्टॅम्प रजिस्ट्रेशन फी इत्यादी बाबीबाबत होणा-या खर्चास मान्यता देणे.

तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींच्या महासमाधी शताब्दी वर्षामध्ये साईभक्तांकरीता सोयी-सुविधा निर्माण करणेसाठी प्रस्तावित जमिनीची संस्थानला आवश्यकता असून याकामी सदर जमीन संस्थानला घेणेसाठी त्या जमिनीची अंतीम किंमत बाजार भावाप्रमाणे दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून निश्चित करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे अर्ज करावा व त्यातील आदेश/ परवानगीने खरेदीबाबत कार्यवाही करावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०६** **श्री साईबाबा फाऊंडेशन, (रजि.साईबाबुजी नगर, ओंगळ प्रशासकीय कार्यालय, चेन्नई) यांनी त्यांचे शिर्डी येथील सत्संग केंद्राकरीता संस्थान मालकीचे स.नं.५४ व ५५ मधील जागेतून १०' x २५०' जागा विकत अथवा अदलाबदली स्वरुपात मिळणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-

अधिनियमाचे कलम १७ (समितीची कर्तव्य व अधिकार) मधील पोट कलम (3) "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही. विकण्यात येणार नाही. किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही."

तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील अॅप्लीकेशन नं.१२०५६/२०१२, पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दिनांक १६ आक्टोंबर, २०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

(6) We direct that, without prior permission of this Court, the Committee,-

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2- trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2- trust;

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;

प्रस्तावना– पी.सुब्बाराजा, सचिव, श्री साईबाबा फाऊंडेशन, (रजि.ऑफीस-साईबाबुजी नगर, ओंगळ, प्रशासकीय कार्यालय, चेन्नई) यांनी त्यांचे शिर्डी येथील 'साईपथम' या सत्संग केन्द्राकरीता संस्थानमालकीची मौजे शिर्डी येथील स.नं.५४ व ५५ मधील जागेतून १०x२५० फुट लांबीचा प्लॉटविकत अथवा बदली जागेच्या स्वरुपात मिळावा अशी विनंती इकडील कार्यालयास दि. ८ ऑगस्ट, २०१४ रोजी प्राप्त झालेल्या सोबतच्या पत्रान्वये केलेली आहे.

सदरहु पत्रात त्यांनी नमुद केले आहे की,श्री शरथ बाबु हे साईबाबांचे निस्सीम भक्त होते. त्यांनी साईबाबांचे विचार व शिकवणीचा प्रचार व प्रसार केला. तसेच साईबाबांनी भक्तांना दाखवुन दिलेल्या मार्गाचा अवलंब केला व साईपथम या आश्रमाव्दारे भक्तांना तो मार्ग दाखवून दिला.साईबाबांच्या शिर्डी येथील मुर्तीच्या प्राणप्रतिष्ठेच्या तारखेला त्यांचा जन्म झाला. कुठल्याही अंधश्रध्देला बळी न पडता बाबांनी दाखवुन दिलेल्या मार्गावर चालण्याची श्री शरथ बाबु यांची शिकवण होती.

आंध्रप्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, प.बंगाल तसेच परदेशात अमेरीका, कॅनडा, ऑस्ट्रेलीया, न्युझिलंड आणि युरोप मध्ये जवळजवळ २०० पेक्षा अधिक 'साईपथम' चे सत्संग केद्र आहेत. प्रत्येक वर्षी गुरुपोर्णिमा व साईबाबांची पुण्यतीथी उत्सवाचे दिवशी पाच हजारापेक्षा जास्त भक्त शिर्डीयेथील साईपथम आश्रमात एकत्र येऊन तीन दिवस साईबाबांच्या नावाचा अविरत जप करतात. संपुर्ण तीन दिवस साईपथम आश्रमातर्फे भक्तांना अन्नदान केले जाते.

श्री शरथ बाबु हे थोर लेखक होते. त्यांनी साईबाबांवर अनेक पुस्तके व लेख लिहलेले आहेत. तसेच ते इंग्रजी व संस्कृत मध्ये पारंगत होते. त्यांना वेद उपनिषद शास्त्र, पुराण यांचे देखील ज्ञान होते. साईबाबांच्या जीवनातील घटना व त्यांची महती भक्तांना साध्या व सोप्या भाषेत समजावून सांगण्यासाठी श्री शरथ बाबु हे भारतीय ग्रंथ व वाडमयातील दाखले देत असत. श्री शरथ बाबु यांचे १३ नोव्हेंबर २०१० रोजी देहावसान झाले. त्यांच्या महासमाधीनंतर देखीलआश्रमामध्ये सर्व उत्सव पंरपरेनुसार साजरे केले जातात. दिवसोंदिवस सत्संगासाठी येणा-या भक्तांची संख्या वाढतच आहे. श्री शरथ बाबु यांनी एकच देव एकच मार्ग म्हणजेच साईबाबा आहेत असे भक्तांना आवर्जुन सांगीतले.

प्रस्ताव- 'साईपथम' आश्रम शिर्डी येथे संस्थान मालकीचे स.नं. ५४ व ५५ मधील जागेच्या शेजारील जागेत ३००० स्के. यार्ड जागेमध्ये वसलेला असून जेथे श्री शरथ बाबु यांची समाधी आहे ती दक्षीणेकडील जागा अतिशय अपुरी व अरुंद आहे. त्यामुळे भक्तांना सत्संग व ध्यान करण्यास अडचण निर्माण होते. त्यामुळे पी.सुब्बाराजा, सचिव, श्री साईबाबा फाऊंडेशन, चेन्नई यांनी संस्थानकडे १०x२५० फुट लांबीचा प्लॉट विकत अथवा बदली जागेच्या स्वरुपात मिळावा

अशी विनंती केलेली आहे. संस्थानला आवश्यक वाटल्यास संस्थान प्लॉटच्या आजुबाजुला अथवा संस्थानच्या सुचनेप्रमाणे इतरत्र कोठेही जागा उपलब्ध करुन देण्यास ते तयार आहे.

विभागाचे मत- साईबाबा फाऊंडेशन यांनी त्यांचे शिर्डी येथील आश्रमात शरथ बाबु यांच्या समाधी जवळ दक्षिण बाजुस जागा कमी असल्यामुळे सत्संग तथा ध्यान करणेस भक्तांना अडचण होते याकरीता संस्थान मालकीचे जागेतुन १०x२५० फुट लांबीचा प्लॉट अदलाबदली अथवा विकत मिळणेस विनंती केली आहे. यासंदर्भातील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील तरतुद व मा.उच्च न्यायालयाचे मा.समितीला असलेले आदेश वरील प्रमाणे नमुद केलेले आहेत.

साईबाबा फाऊंडेशन यांनी कोणते व किती क्षेत्र देणार आहेत व त्याचे मुल्यांकन याबाबत सविस्तर माहिती दिलेली नाही. त्यांचे क्षेत्रालगत संस्थान मालकीचे स.नं.५४ व ५५ मध्ये १ हे. ९० आर क्षेत्र आहे. त्यांनी संस्थानला देऊ केलेले क्षेत्र सोयीचे व फायद्याचे असल्यास समक्ष पाहणी करुन निर्णय घेणे योग्य होईल असे मत आहे.

सदरहू प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.६८२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा फाऊंडेशन, (रजि.साईबाबुजी नगर, ओंगळ प्रशासकीय कार्यालय, चेन्नई) यांचे भारतात तसेच परदेशात २०० पेक्षा आधिक सत्संग केंद्र आहेत. या सत्संग केंद्रामार्फत साईबाबांचे विचारांचा व शिकवणीचा प्रचार/ प्रसार करण्याचे काम करणेत येते. त्यांनी मागणी केलेप्रमाणे मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीचे स.नं.५४ व ५५ मधील जागेतून १०' x २५०' जागा त्यांना देणे व त्या बदल्यात संस्थानसाठी सोयीची असलेली कोणती व किती मोजमापाची जागा ते देण्यास तयार आहेत. तसा सविस्तर प्रस्ताव त्यांचेकडून घेण्यात येऊन, सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७ मंदिर परिसराचे पुर्वेकडील संस्थान मालकीचे मोकळया जागेत दर्शन रांग व्यवस्थेसाठी मंडप उभारणेसाठी झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. संस्थानमार्फत साईभक्तांचे गर्दीचे नियोजन करणेकामी जुने पिंपळवाडी रस्त्यावर दर्शन लाईनकरीता पॉलीकार्बोनेटचे शेड उभारणेत आलेले आहे. उन्हाळ्याचे तसेच पावसाळ्याचे कालावधीत साईभक्तांचे ऊन, वारा व पाऊस यापासून संरक्षण होणेकामी मंदिर परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणेत येतात. सुट्ट्यांचे कालावधीत शिर्डी येथे साईभक्तांची मोठ्याप्रमाणात गर्दी होते. सदरहू गर्दीचे नियोजन करणेकामी साईकॉम्प्लेक्स इमारतीचे उत्तर बाजुकडील पिंपळवाडी रस्त्यावर अर्ध्या भागात तात्पुरत्या स्वरुपाचे दर्शनलाईनकरीता रेलींग लावण्यात येते परंतू पिंपळवाडी रस्त्यावरील वाहतूक व रस्त्यालगत असलेल्या दुकानांमुळे तेथे आजबाजूस मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. त्याकरीता दि.२१/०६/२०१४ रोजी मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांनी मंदिर परिसराचे पूर्वेकडील संस्थान मालकीचे मोकळ्या जागेत दर्शन लाईनकरीता रेलींग लावणेकामी व साईभक्तांचे उन, वारा व पाऊस यापासून संरक्षण होणेकामी मंडपव्यवस्था करणेकामी सूचना केली होती. त्यानुसार सदर जागेत १७५३x६२३ या साईजचा १०,८५० चौ.फुट क्षेत्रफळाचा एम.एस.पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर व ताडपत्रीचे छतासह कापडी मंडप उभारणेसाठी मा. उपकार्यकारी अधिकारी यांचेशी समक्ष झालेल्या चर्चेनुसार सदरचे काम तातडीचे असल्याने मंडप ठेकेदार यांचेकडून समक्ष कोटेशन्स घेण्यात आले होते. याकामी खालील मंडप ठेकेदारांचे कोटेशन्स प्राप्त झाले होते.

| अ.नं. | मंडप ठेकेदार यांचे नांव व पत्ता | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहुरी | ४९४६ | २४/०६/२०१४ |
| ०२ | कु-हे टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | ४९४७ | २४/०६/२०१४ |
| ०३ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | ४९४८ | २४/०६/२०१४ |

सदरहू प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेण्याबाबत इकडील विभागाचे दि.२४/०६/२०१४ रोजीच्या टिपणी अन्वये मान्यता घेणेत आली. त्यानुसार प्राप्त

झालेले कोटेशन्स मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष दि.२४/०६/२०१४ रोजी उघडणेत आले. त्यामधिल दराबाबतच्या तुलनात्मक तक्त्यावरील मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेनुसार निम्नतम दराचे मंडप ठेकेदार रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांना जा.नं. १४७१/२०१४ दि.२६/०६/२०१४ अन्वये कार्यादेश देणेत आला. सदर जागेत १७५'x६०'-६" या साईजचा १०५८७.५ चौ.फुट क्षेत्रफळाचा एम.एस. पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर व ताडपत्रीचे छतासह कापडी मंडप २७ दिवसाचे कालावधीसाठी उभारणीचे काम करुन घेतले आहे. मंडप ठेकेदार रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांनी केलेल्या मंडप उभारणी कामाचे रक्कम रु.८५,७५९/- (अक्षरी रुपये पच्याऐंशी हजार सातशे एकोणसाठ) मात्रचे बिल अदा करण्यात आलले असून याप्रमाणे झालेल्या खर्चास मा.त्रीसदस्य समिती सभेत मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसराचे पुर्वेकडील संस्थान मालकीचे मोकळया जागेत दर्शन रांग व्यवस्थेसाठी मंडप उभारणेसाठी झालेल्या रक्कम रु.८५,७५९/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८ बेडशीट व उशीकव्हर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद- २१ (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेंवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

या अधिनियम व तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते. त्या अनुषंगाने साईआश्रम भक्तनिवासमधील खोल्या साईभक्तांचे निवासासाठी दि.११/०४/२०१३ पासुन सुरु करण्यात आलेल्या असुन या ठिकाणी १२ इमारती मधुन १५३६ खोल्या आहेत.

प्रत्येक रुममध्ये ३ बेडवर ३ नग बेडशीट व ३ नग उशीकव्हर प्रत्येक दिवशी साईभक्तांना रूम देते वेळेस उपयोगात आणले जातात. सदरचे बेडशीट व उशीकव्हर दुस-या दिवशी धुलाईसाठी दिले जातात. दोन दिवसानंतर सदर बेडशीट व उशीकव्हर धुलाई करुन, इस्त्री करुन पुन्हा ताब्यात मिळतात. यामुळे प्रत्येक रुमला ४ सेटची आवश्यकता गृहीत धरण्यात आलेली आहे.

तसेच वापरात असलेले बेडशीट व उशीकव्हर खराब, फाटणे, वगैरे कारणे लक्षात घेऊन प्रत्येक रुमसाठी १ नग बेडशीट व १ नग उशीकव्हर या वाढीव नगासह १९९६८ नग बेडशीट व १९९६८ नग उशीकव्हर हा विभाग सुरू होण्यापुर्वी जा.नं.एसएसएस-वशी-खरेदी-२८११-२०११ दि. ०२/०९/२०११ च्या पुरवठा आदेशान्वये खरेदी करण्यात आलेले होते.
(उदा. प्रत्येक रुमला ३ नग x ४ सेट = १२ नग + १ नग वाढीव = १३ नग एकुण प्रत्येकी रुमसाठी x १५३६ रुम = १९९६८ नग)

हा विभाग दि.११/०४/२०१३ पासून सुरू झालेला असून सदरचे बेडशीट व उशीकव्हर सततच्या वापरामुळे जीर्ण होत असून याला सव्वा वर्ष पुर्ण होत आहे. त्यामुळे नजिकच्या काळात नवीन बेडशीट व उशीकव्हर आवश्यक असल्यामुळे खालील तक्त्यात नमुद केले प्रमाणे खरेदी करणे गरजेचे आहे.

| अ.नं. | तपशील | साईज | आवश्यक नग | अंदाजे दर | एकुण अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रिंटेड बेडशीट (१००% कॉटन, कॅन्डी स्ट्रीप्स, मफतलाल कंपनी) | ५४"X९०"साईज (३०X३० काऊंट) | १९९६८ | १७५/- | ३४,९४,०००/- |
| ०२ | प्रिंटेड उशीकव्हर (१००% कॉटन, कॅन्डी स्ट्रीप्स, मफतलाल कंपनी) | १८" x २८" साईज | १९९६८ | ५०/- | ९,९८,४००/- |
| | अंदाजे एकुण रुपये- | | | | ४४,९२,४००/- |
| | जवळपास अंदाजे रुपये- | | | | ४५,००,०००/- |
| | पुर्णांकीत जवळपास (Round off) अंदाजे रुपये पंचेचाळीस लाख मात्र | | | | |

तसेच या प्रकरणाची कार्यवाही ( शेडयुल ) येणे प्रमाणे राहील

| अ. नं | कार्यवाही विभाग | तपशील | कालावधी | दिवस |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भक्तनिवास | प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे. | १२/०८/१४ ते १९/०८/१४ | ०८ |
| २ | साईआश्रम भक्तनिवास | प्रशासकीय मान्यते नंतर मा. व्य. मंडळा समोर सादर करावयाचा विषयांकीत प्रस्ताव मा. का. आ.साहेब यांचेकडे सादर करणे व तो प्रस्ताव मिटींग विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी देणे. | २०/०८/१४ ते २७/०८/१४ | ०८ |
| ३ | मिटींग विभाग | मा. व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेणे व पुढील कार्यवाही करणे कामी झालेल्या निर्णयाची प्रत या विभागाकडे येणे कामाचा कालावधी. | २८/०८/१४ ते २६/०९/१४ | ३० |
| ४ | साईआश्रम भक्तनिवास | मा. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयाची प्रत व या संदर्भातील मंजुर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी संबंधीत विभागाकडे देणे | २७/०९/१४ ते २८/०९/१४ | ०२ |
| ५ | विधी विभाग | विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांच्या मान्यतेसाठी सादर | २९/०९/१४ ते २८/१०/१४ | ३० |
| ६ | खरेदी विभाग | मा.उच्च न्यायालय यांचे मान्यता व मा. व्यवस्थापन मंडळ ठरावानुसार ई - टेंडर मागविणे. | २९/१०/१४ ते १२/११/१४ | १५ |
| ७ | खरेदी विभाग/ पार्टी | पार्टी कडुन ई - टेंडर येण्याचा कालावधी. | १३/११/१४ ते २२/११/१४ | १० |
| ८ | खरेदी विभाग | आलेले ई - टेंडर उघडणे कामी प्रस्ताव ठेवणे. | २३/११/१४ ते ३०/११/१४ | ०८ |
| ६ | खरेदी विभाग | तुलनात्मक तक्ता करून प्रशासकीय मान्यता घेणे. | ०१/१२/१४ ते ०८/१२/१४ | ०८ |
| १० | खरेदी विभाग | संबधीत पार्टीला कार्यादेश देणे. | ०९/१२/१४ ते १६/१२/१४ | ०८ |
| ११ | खरेदी विभाग/ पार्टी | माल पुरवठा करणे. | १७/१२/१४ ते ३१/१२/१४ | १५ |

१) बेडशीट व उशीकव्हर खरेदी करणे कामी अंदाजे रक्कम रु. ४५,००,०००/-(अक्षरी रुपये पंच्चेचाळीस लाख मात्र) चे खर्चास मंजुरी मिळणे.

२) मा. व्य.मंडळाच्या मान्यते नंतर विधी विभागामार्फत संस्थान वकीलाद्वारे मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाकडे रू.४५,००,०००/- च्या खर्चाचे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करणे

३) मा. उच्च न्यायालयाची मान्यता आल्यानंतर खरेदी विभागामार्फत दैनिक वर्तमान पत्रामध्ये ई-निविदा सूचना देऊन ई-निविदा मागणी करणेस.

उपरोक्त १, २ व ३ च्या प्रस्ताव मान्यतेसाठी सादर

**निर्णय क्र.६८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी.**

**तसेच साईआश्रम भक्तनिवासमधील इमारतींमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा व होणाऱ्या खर्चाचा जानेवारी- २०१४ ते डिसेंबर- २०१४ या कालावधीतील आढावा घेण्यात यावा व त्यापुढील सभेमध्ये साईआश्रम भक्तनिवाससाठी महिन्याला सरासरी किती खर्च येतो व किती उत्पन्न मिळते यासह ना नफा ना तोटा या तत्वावर खोल्यांची भाडेवाढ करावी किंवा करु नये, याबाबत करारातील अटी/ शर्तींचा विचार करुन सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०९** **साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता फर्निचर देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री राजेश शर्मा, रेवाडी (हरियाणा) या साईभक्ताने त्यांचे इतर सहकारी साईभक्तांद्वारे साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा हे दोन विभाग नव्याने सुरु होणे अगोदर साईभक्तांना व कार्यालयीन कर्मचाऱ्यांना कार्यालयात उपयोगी असे एम. एस. या मटेरियलमध्ये बरेच फर्निचर देणगी स्वरुपात दिलेले आहे.

मध्यंतरीच्या काळात झीरो नंबर या मिटींग हॉलसाठी हिरव्या रंगाच्या कुशन असलेल्या खुर्च्या देखील दिलेल्या आहेत.

संबंधीत साईभक्त हे पाच ते सहा महिन्यापुर्वी या विभागात येऊन कोणत्या फर्निचरची आवश्यकता आहे का? या बाबत चौकशी केली असता, साईभक्तांच्या उपयोगासाठी खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे फर्निचरची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले होते, त्यानुसार संबंधीत साईभक्त सदरचे फर्निचर लवकरात लवकर पाठविणार आहे.

| अ.नं. | तपशील | फर्निचरचे वर्णन | नग | प्रती नग किंमत | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | इमारतीच्या ज्या-त्या प्रत्येक माळयावर साईभक्त रुमची नोंद करण्यासाठी मदतनीस ज्या ठिकाणी बसलेला असतो त्या ठिकाणी समोर साईभक्तांना बसण्यासाठी टू-सीटरची आवश्यकता (द्वारावती भक्तनिवास नुसार) | टू-सीटर एम. एस. मध्ये | ४८ | ३,६००/- | १,७२,८००/- |
| २ | ए-सी या इमारतीच्या तळमाळयावरील पॅसेजमध्ये साईभक्तांना बसणेकामी (साईप्रसाद या विभागाकडून दोन सोफा सेट घेऊन बी-इमारतीमध्ये उपरोक्त प्रमाणे व्यवस्था केलेली आहे.) | थ्री-सीटर एम. एस. मध्ये | ०६ | ५,५००/- | ३३,०००/- |
| ३ | ए-सी या इमारतीच्या तळमाळयावरील पॅसेजमध्ये साईभक्तांना बसणेकामी (साईप्रसाद या विभागाकडून दोन सोफा सेट घेऊन बी-इमारतीमध्ये उपरोक्त प्रमाणे व्यवस्था केलेली आहे.) | वन-सीटर एम. एस. मध्ये | १२ | २,२००/- | २६,४००/- |
| ४ | कार्यालयातील शिपाई, लिफ्ट ऑपरेटर व सुरक्षा गार्ड यांना बसणे कामी | प्लास्टीक स्टूल | ३० | ३०५/- | ९,१५०/- |
| | | | | एकूण रुपये | २,४१,३५०/- |
| | | | | (अक्षरी रुपये दोन लाख एक्केचाळीस हजार तीनशे पन्नास मात्र.) | |

तरी सदरचे फर्निचर देणगी स्विकारण्याबाबत मान्यता असावी.

**निर्णय क्र.६८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.१० फर्निचर देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री राजेश शर्मा, रेवाडी (हरियाणा) व त्यांचे इतर सहकारी साईभक्त यांच्याद्वारे साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा हे दोन विभाग नव्याने सुरु होणे अगोदर, साईभक्तांच्या सुविधेसाठी व कार्यालयीन उपयोगाकरीता एम.एस. मटेरियलमध्ये बरेच फर्निचर देणगी स्वरुपात दिलेले आहे. मध्यंतरीच्या काळात झ ीरो नंबर या मिटींग हॉलसाठी हिरव्या रंगाच्या कुशन असलेल्या खुर्च्या देखील दिलेल्या आहेत.

संबंधीत साईभक्त हे पाच ते सहा महिन्यापुर्वी विविध विभागात येऊन आपणास कोणत्या फर्निचरची आवश्यकता आहे का? या बाबत चौकशी केली असता, साईभक्तांच्या सुविधेसाठी व कार्यालयीन उपयोगाकरीता फर्निचरची आवश्यकता असल्याचे विविध विभागांनी सांगितले होते, त्यानुसार संबंधीत साईभक्तांनी सदरचे फर्निचर दि.१७/०८/२०१४ रोजी शिर्डी येथे पाठविलेले असून ते सर्व फर्निचर साईआश्रम भक्तनिवास या विभागाकडे उतरविण्यात आलेले असून, त्याची विभागानिहाय माहिती खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

| **अ.नं.** | **विभागाचे नाव** | **फर्निचरचे वर्णन** | **नग** | **प्रती नग किंमत** | **एकुण किंमत** |
|---|---|---|---|---|---|
| १ | द्वारावती भक्तनिवास | अ) व्हिजीटर चेअर | १२ | २,०००/- | २४,०००/- |
| | | ब) रिव्हाल्वींग चेअर हाय बॅक | २ | ६,०००/- | १२,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | क) रिव्हाल्वींग चेअर | ९ | ४,०००/- | ३६,०००/- |
| | | **एकूण-** | **२३** | **--** | **७२,०००/-** |
| २ | कॅन्टीन विभाग | रिव्हाल्वींग चेअर | ६ | ४,०००/- | २४,०००/- |
| | | **एकूण-** | **६** | **--** | **२४,०००/-** |
| ३ | प्रसादालय विभाग | रिव्हाल्वींग चेअर | १२ | ४,०००/- | ४८,०००/- |
| | | **एकूण-** | **१२** | **--** | **४८,०००/-** |
| **(अक्षरी रुपये एक लाख चौरेचाळीस हजार मात्र.)** | | **एकूण-** | **४१** | **--** | **१,४४,०००/-** |

तरी सदरचे फर्निचर देणगी स्विकारण्याबाबत मान्यता असावी.

**निर्णय क्र.६८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.११ प्लॅस्टिक जग, मग, डस्टबीन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद - २१ (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेंवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

या अधिनियम व तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते. त्या अनुषंगाने साईआश्रम भक्तनिवासमधील खोल्या साईभक्तांचे निवासासाठी दि.११/०४/२०१३ पासुन सुरु करण्यात आलेल्या असुन या ठिकाणी १२ इमारती मधुन १५३६ खोल्या आहेत.

साईभक्तांसाठी १५३६ रूममध्ये प्लॅस्टिक जग, मग, डस्टबीन रुममध्ये ठेवण्यात आलेले आहेत.

या विभागाला चालू होवून सव्वा वर्ष पुर्ण झाले असुन प्लॅस्टिक जग,मग व लहान डस्टबीन वस्तु खराब होत आहेत. तसेच या वस्तु सततच्या वापरासमुळे फुटतुट, निरूपयोगी होत आहेत. जुन्या वस्तुच्या जागेवरती नवीन वस्तुची आवश्यकता असल्याने सदरच्या प्लॅस्टिक वस्तु खरेदी करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशील | क्षमता | कंपनी | आवश्यक नग | अंदाजे दर रु. | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Flavor Jug | २ लि. | सेलो | २०० | १००/- | २०,०००/- |
| २ | Frosty bin Without lid | - | सेलो | २०० | १००/- | २०,०००/- |
| ३ | Frosty Mug १०० | १ लि. | सेलो | २०० | ३०/- | ६,०००/- |
| | (अक्षरी रुपये- शेहेचाळीस हजार मात्र) | | | | | ४६,०००/- |

तसेच या प्रकरणाची कार्यवाही ( शेडयुल ) येणे प्रमाणे राहील.

| अ.नं | कार्यवाही विभाग | तपशील | कालावधी | दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भक्तनिवास | प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे. | २८/०७/१४ते ०४/०८/१४ | ०८ |
| २ | साईआश्रम भक्तनिवास | प्रशासकीय मान्यते नंतर मा. व्य. मंडळा समोर सादर करावयाचा विषयांकीत प्रस्ताव मा. का. अ.साहेब यांचेकडे सादर करणे व तो प्रस्ताव मिटींग विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी देणे. | ०५/०८/१४ ते १२/०८/१४ | ०८ |
| ३ | मिटींग विभाग | मा. व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेणे व पुढील कार्यवाही करणे कामी झालेल्या निर्णयाची प्रत या विभागाकडे येणे कामाचा कालावधी. | १३/०८/१४ ते १/०९/१४ | २० |
| ४ | साईआश्रम भक्तनिवास | मा. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयाची प्रत व या संदर्भातील मंजुर प्रस्ताव पुढील कार्यवाही साठीसंबंधीत खरेदी विभागाकडे देणे | २/०९/१४ ते ३/०९/१४ | ०२ |
| ५ | खरेदी विभाग | मा. व्यवस्थापन मंडळ ठरावानुसार कोटेशन मागविणे. | ४/०९/१४ ते १३/०९/१४ | १० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | खरेदी विभाग/ पार्टी | पार्टी कडुन कोटेशन येण्याचा कालावधी. | १४/०९/१४ ते २३/०९/१४ | १० |
| ७ | खरेदी विभाग | आलेले कोटेशन उघडणे कामी त्रिसदस्य व्य.मंडळा समोर प्रस्ताव ठेवणे. | २४/०९/१४ ते ०१/१०/१४ | ०८ |
| ८ | खरेदी विभाग/ मिटींग विभाग | मा. त्रि.सदस्य व्य. मं. समोर निविदा उघडणे निर्णय घेणे. | ०२/१०/१४ ते १६/१०/१४ | १५ |
| ९ | खरेदी विभाग | संबधीत पार्टीला कार्यादेश देणे. | १७/१०/१४ ते २४/१०/१४ | ०८ |
| १० | खरेदी विभाग/ पार्टी | माल पुरवठा करणे. | २५/१०/१४ ते ०३/११/१४ | १० |

तरी प्लॅस्टिक जग, मग, डस्टबीन प्रत्येक २०० नग खरेदी कामी अंदाजे रक्कम रु.४६,०००/- चे खर्चास व विहीत पध्दतीने खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास इमारतींमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले साहित्य खरेदीकामी नामांकित कंपन्यांकडून विहित पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या रु.४६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच यापुढे भक्तनिवासस्थानांमधील प्लॅस्टिक जग, मग, डस्टबीन इ. वस्तू वापराचा कमाल कालावधी किती असावा, हे निश्चित करावे व त्या कालावधीनंतर प्रस्तुत वस्तू विहीत पध्दतीने नव्याने खरेदी कराव्यात व सर्व जुन्या वस्तूंची स्क्रॅप म्हणून लिलावाद्वारे विक्री करणेत यावी. खराब वस्तू खोल्यांमध्ये वापरासाठी ठेवल्या जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी. नवीन वस्तू नामांकित कंपनीच्या, चांगल्या दर्जाच्या व एकसारखेपणा राहण्यासाठी एकाच रंगाच्या खरेदी कराव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास/ सर्व निवासस्थाने)

---

**विषय नं.१२** **व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये वास्तव्यास असलेल्या साईभक्तांना सन २०१४-१५ करीता मेडीमिक्स साबण (१२ ग्रॅम वडी) खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी अधिनियम - २००४ मधील तरतुद अधिनियम कलम २१-(१) चा (ग)- साईभक्तांना मंदिरात देवताच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणताही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यास सोई व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय** ०१) मा. व्य. स. सभा दि.१९/०७/२००९ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२४, निर्णय क्रं.६५४, ०२) मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२६/०७/२०१३ चे सभेतील विषय नं.५६, निर्णय क्रं.५८५, ०३) मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२७/१०/२०१३ चे सभेतील विषय नं.०९ निर्णय क्रं. ८६२ अन्वये.

**प्रस्तावना**- श्री साईबाबा संस्थान कडील सर्व निवासस्थानातील खोल्या मध्ये साईभक्तांना हात धुण्यासाठी छोटा साबण ठेवण्यात यावा. असा निर्णय संदर्भीय सभेत संमत झालेला आहे व्दारावती भक्तनिवास विभागाकडे सध्या खलील प्रमाणे खोल्या साईभक्ताचे वापरात आहे .

व्दारावती भक्तनिवास विभागात नॉन एसी २३६ व एसी ८० अशा एकुण ३१६ खोल्या भंक्ताचे निवासाकरीता उपलब्ध आहेत व्दारावती भक्तनिवास मंधील सर्व खोल्याचे वॉश बेसीनवर मेडिमिक्स साबण ठेवणे बाबत संदर्भ क्रं. ०१ अन्वये निर्णय क्रं. ६५४ नुसार सदरच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे . मा. व्य. समितीचे निर्णयास अनुसरून इमारतीमध्ये भक्तांनी निवासाकरीता घेतलेल्या प्रत्येक खोल्यांमध्ये मेडिमिक्स साबण देण्यात येत आहे .

**प्रस्ताव**- सन २०१४-१५ करीता (सप्टेंबर- २०१४ ते मार्च– २०१५) या ७ महिन्याचे कालावधीसाठी मेडिमिक्स साबण (१२ ग्रॅम वडी) खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे . त्यासाठी प्रती खोली १ नगा प्रमाणे प्रतिदिनी ३१६ खोल्याकरीता ३० दिवसांसाठी ९४८० नग यापमाणे प्रती महिना ९४८० x ७ महिने = ६६३६० नग साबणाची आवश्यकता आहे . मेडिमिक्स साबणाच्या एका बॉक्स मध्ये ७२० नग साबण असतात (७२० नगाचे अंदाजे १००) बॉक्स खरेदी करावे लागतील, असे मत आहे .

मा. कार्यकारी अधिकारी यांचे सूचनेवरून मेडिमिक्स कंपनीचे प्रतिनिधी श्री अलोक गोयल यांचेशी ०७/०८/२०१४ रोजी दुरध्वनी वरुन व्दारावती भक्तनिवास विभागाकरीता (१२ ग्रॅम वडी) मेडिमिक्स साबण अंदाजे १०० बॉक्स (७२,००० नग) खरेदी करावयाचे आहे .सदरचे साबन थेट कंपनी मार्फत खरेदी करता येईल का ? तसेच आपल्या पेंमेट व वाहतुक खर्चव इतर कर या संबधी माहिती तसेच

आदेशदिल्या नंतर किती दिवसात माल मिळेल या बाबत चर्चा केली आसता त्यांनी ई-मेल पाठवतो असे सांगितले. आपण अधिकृत डिलर मार्फत माल घेतल्यास योग्य होईल असे त्यांनी सांगीतले .

**दि.११/०८/२०१४ रोजी ई-मेल पठवला आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणेः-**

१. प्रत्येक साबनाची १२ ग्रॅम वडी रुपये १-९०+ वाहतुक खर्च लागेल .

२. पेमेन्टसाठी आगाऊ डि.डि. किंवा आर टी.जी.एस.मे चोलायील प्रा.लि.या नावाने पाठविणे.

३. मागणी नक्की झाल्यावर आंपणास माल कंपनीकडुन २० दिवसानंतर मिळेल

४. इतर कर लागू असेल.

**विभागाचे मत**- १०० बॉक्स चा वहातुक व हमाली खर्च प्रति बॉक्स अंदाजे २० रुपये धरल्यास रुपये दोन हजार खर्च येईल एका साबनाची वडी जर १-९० पै. व वहातुक व सर्व खर्च जर अंदाजे ०-२७ पै. येत असेल. तर एका साबनाच्या वडीची अंदाजे किंमत २.१७ पै येईल. संस्थानचे नियमाप्रमाणे अॅडव्हान्स देण्याची पध्दत नाही . अंदाजे एक महिन्याच्या कालावधीसाठी सदर रक्कम कंपनीस बिगर व्याजी द्यावे लागेल. कंपनीने इतर कर आकारल्यास ते पण द्यावे लागेल.

तरी व्दारावती भक्तनिवास विभागाकरीता मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०४/२०१४ चे सभेत झालेले चर्चा वाटाघाटी प्रमाणे मे. बाफणा जनरल स्टोअर्स यांच्याकडुन कोटेशन पध्दतीने १२ ग्रॅम वडी २.०२ पै. खरेदी केली आहे त्यानुसार व्दारावती भक्तनिवास करीता मागील वर्षचा मेडिमिक्स (१२ ग्रॅम वडी) प्रति नग साबणाचा दर रु.२.०० पैसे याप्रमाणे ७५८४० नगासाठी रु.१,६६,८४८/- इतका खर्च आला होता . तसेच व्हॅट , वाहतुक हमाली इ. स्वतंत्र आकार गृहित धरुन अंदाजे रु.१,८५,०००/- पर्यत खर्च अपेक्षीत आहे.

**विभागाचा अभिप्राय**- सन २०१४-१५ करीता ( सप्टेंबर -२०१४ ते मार्च – २०१५) या ७ महिन्याचे कालावधीसाठी आवश्यक असणारे मेडिमिक्स साबण (१२ ग्रॅम वडी) अंदाजे १०० बॉक्स (७२,००० नग) खरेदीसाठी व्हॅट , वाहतुक हमाली इ. स्वतंत्र आकार गृहित धरुन रक्कम रु.१,८५,०००/- पर्यतक्ष्या खर्चास व खरेदी विभागामार्फत विविध पुरवठाधारकांकडुन निविदा (टेंडर) मागवुन खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास करीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मेडीमिक्स साबण विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,८५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, व्दारावती भक्तनिवास)

---

**विषय नं.१३** **आरोग्य विभागासाठी स्वच्छता साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** आरोग्य विभागामार्फत संस्थान इमारती आणि परिसरातील साफसफाई केली जाते. साफसफाईचे कामासाठी स्वच्छता साहित्याची नेहमीच गरज असते यासाठी आवश्यक लागणा-या साहित्याची खरेदी वारंवार करण्यापेक्षा वार्षिक खरेदी करण्यात येते. सध्या आरोग्य विभागाकडील साहित्य वापरुन संपत आलेले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०३/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २४२ ने रु. ६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे सदरची कार्यवाही खरेदी विभागामार्फत चालू आहे. सदरचे साहित्य व विभागाकडील शिल्लक असलेले साहित्य मिळून ऑगस्ट २०१४ अखेर पर्यंत पुरेसे आहे. तो पर्यंत सन २०१४-२०१५ (सप्टेंबर - २०१४ ते मार्च – २०१५) या कालावधीसाठी लागणा-या साहित्याची खरेदीची कार्यवाही पुर्ण होईल.

आरोग्य विभागासाठी सन २०१४-२०१५ (सप्टेंबर - २०१४ ते मार्च – २०१५) करिता दैनंदिन कामासाठी आवश्यक आसणा-या साहित्याची यादी सोबत परिशिष्ठ अ जोडले आहे. परिशिष्ठातील अ. नं. ०१ ते १२ नुसार साहित्य खरेदीकामी अंदाजे रु. ९,७८,७५०/- (अक्षरी रु. नऊ लाख अठ्ठयाहत्तर हजार सातशे पन्नास) मात्र खर्च अपेक्षित आहे. सन २०१४-२०१५ चे बजेट खरेदी विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे. सदरचे साहित्य, खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करावे लागेल.

तरी सोबतचे परिशिष्टातील यादीप्रमाणे साहित्य खरेदी करणेसाठी येणा-या अंदाजे रुपये ९,७८,७५०/- (अक्षरी रु. नऊ लाख अठ्ठयाहत्तर हजार सातशे पन्नास मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.६८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य विभागाकरीता स्वच्छता कामांसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,७८,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**विषय नं.१४** **श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला, मुंबई कार्यालय यांचे कोर्ट केसबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.सुनिल दत्तात्रय राणे, बी.ए. (मराठी), पत्रकारितेचा डिप्लोमा पूर्ण हे जा.नं.एसएसएस/वशी-०१/१०५८८/२००१ दि.०५-१०-२००१ रोजीचे आदेशास अनुसरून संस्थानचे मुंबई कार्यालय येथे सहाय्यक संपादक, श्री साईलिला या पदावर दि.०१-१०-२००१ पासून संस्थान सेवेत कार्यरत होते. श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला, मुंबई कार्यालय यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांना नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतका नोटीस-पे देवून सेवामुक्त करण्यात यावे. अशाप्रकारचा कोणताही प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ व दि.२८-०८-२०११ रोजीचे सभेमध्ये प्रशासनातर्फे सादर करणेत आलेला नव्हता. तथापि, प्रशासनाचा प्रस्ताव नसतांना मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.५९५ (०४) व दि.२८-०८-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५९६ अन्वये " मुंबई येथील श्री साईलिला संपादकीय कार्यालय शिर्डी येथे हलविणेत येऊन, या कार्यालयाची संपादकीय जबाबदारी श्री.मोहन जगन्नाथ यादव, जनसंपर्क अधिकारी यांचेवर सोपविणेत यावी. सध्या श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने, त्यांना नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतना इतका नोटीस पे देऊन सेवा मुक्त करण्यात यावे. तसेच श्री साईलिला अंक द्वैमासिक काढण्याऐवजी प्रत्येक महिन्यास काढण्यात यावा. प्रत्येक अंक प्रकाशित करण्यापूर्वी सदरचा अंक मा.विश्वस्त सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.वि.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांना प्रथम दाखविण्यात यावा." असा निर्णय पारीत करणेत आला होता. त्यानुसार श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांना एक महिना मुदतीचे नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतकी रक्कम नोटीस-पे म्हणून देऊन, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३५७२/२०११ दि.०७-११-२०११ रोजीचे आदेशान्वये दि.०९-११-२०११ पासून संस्थान सेवेतून सेवामुक्त (टर्मिनेट) करणेत आले होते.

सदर सेवामुक्त (टर्मिनेशन) आदेशासंदर्भात श्री.राणे यांनी मा.कामगार न्यायालय (तिसरे), मुंबई येथे १) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी, २) श्री.किशोर रामराव मोरे सो. (तत्कालीन कार्यकारी अधिकारी), श्री.जयंत मुरलीधर ससाणे सो., तत्कालीन अध्यक्ष यांचे विरूध्द दि.१३-१२-२०११ रोजी तक्रार (यु.एल.पी) क्र.२०८/२०११ ही कोर्ट केस दाखल केलेली आहे.

श्री.राणे यांनी संस्थान विरूध्द दि.०७-११-२०११ रोजीचा सेवामुक्ती (टर्मिनेशन) आदेश बेकायदेशीर ठरवून रद्द होऊन मिळावा, मागील सेवा सलग धरून, बॅक वेजेससह पुर्ववत कामावर रूजू करून घेणेत यावे. याकरीता दाखल केलेल्या तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ कोर्ट केसमधील निशाणी यु-२ चे अर्जा संदर्भात मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी दि.२१-०८-२०१२ रोजी खालीलप्रमाणे अंतरिम आदेश दिलेला आहे.

ORDER

1. Application is partly allowed.
2. The Respondents are hereby directed to allow the complainant temporarily to work on his previous post till pending and final disposal of the main complaint.
3. If the Respondents are not willing to allow him to resume duties temporarily, in that event, his 50% salary be paid to him till pending and final disposal of the main complaint from the date of his termination.

Mumbai:
Dated :21.08.2012

(G.G.Hulsure)
Presiding Officer,
Third Labour Court, Mumbai

उपरोक्तप्रमाणे मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ मधील निशाणी यु-२ संदर्भात दि.२१-०८-२०१२ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशा संदर्भात संस्थान ॲडव्होकेट श्री.सचिन एस.शानभाग, मुंबई यांचेशी दि.२८-०८-२०१२ रोजी दुरध्वनीवरून चर्चा केली आहे. चर्चेअंती ॲडव्होकेट श्री.सचिन एस.शानभाग यांनी मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांचे दि.२१-०८-२०१२ रोजीचे अंतरिम आदेशास अनुसरून श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना पुर्वीप्रमाणेच सहाय्यक संपादक, श्री साईलिला या पदावर मुंबई किंवा शिरडी कार्यालय येथे सेवामुक्त करणेपूर्वी जे मासिक वेतन/पगार, अनुज्ञेय भत्ते व वेतन बॅन्ड देय्य होते. त्याच मासिक वेतन/पगारावर नियमित वार्षिक वेतनवाढीसह वेतन/पगार अधिक अनुज्ञेय भत्ते/वेतन बॅन्ड, ग्रेड-पे इत्यादीसह तात्पुरते स्वरूपात कामावर (सेवेत) हजर (रूजू) करून घेणेत यावे.

**किंवा** मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी दि.२१-०८-२०१२ रोजी दिलेल्या अंतरीम आदेशास स्थगिती मिळावी, सदरचा अंतरिम आदेश बेकायदेशीर ठरवून, रद्द होऊन मिळावा या कामी श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांचे विरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे संस्थानचे वतीने दि.२०-०९-२०१२ अखेर रिव्हीजन अर्ज दाखल करणेत यावा. अशा सुचना चर्चेअंती दिल्या होत्या.

म्हणून सदर न्यायालयीन प्रकरणा संदर्भातील मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी दि.२१-०८-२०१२ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशास अनुसरून योग्य तो निर्णय घेणेकामी प्रस्ताव तयार करून, तो मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५-०९-२०१२ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन,निर्णय क्र.७९२ अन्वये "श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांचे तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ मधील निशाणी यु-२ संदर्भातील दि.२१-०८-२०१२ रोजीचे अंतरिम आदेशास अनुसरून सहाय्यक संपादक, श्री साईलिला या पदावर मुंबई कार्यालय येथे तात्पुरते स्वरूपात (मा.तिसरे कामगार न्यायालयाचा अंतिम आदेश होईपर्यंत) कामावर(सेवेत) हजर (रूजू) करून घेणेस, तसेच त्यांना सेवामुक्त (टर्मिनेशन) करणेपूर्वी जे मासिक पगार/वेतन आदा करण्यात येत होते. त्याचप्रमाणेच वेतन, अनुज्ञेय भत्ते, वेतन बॅन्ड, ग्रेड-पे, इत्यादी वार्षिक वेतनवाढीसह मासिक पगार/वेतन आदा करणेस मान्यता देणेत आली."असा निर्णय पारित झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-०९-२०१२ रोजीचे निर्णय क्र.७९२ यांस अनुसरून श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना सहाय्यक संपादक, श्री साईलिला या पदावर मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांचा अंतिम आदेश होईपावेतो तात्पुरते स्वरूपात जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२९१०/२०१२ दि.२९-०९-२०१२ रोजीच्या आदेशान्वये दि.०१/१०/२०१२ पासून कामावर/सेवेत हजर/रूजू करून घेणेत आलेले आहे.

त्यानंतर आता श्री.राणे यांनी संस्थान विरूध्द दाखल केलेल्या तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ कोर्ट केस संदर्भात मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी दि.२८-०२-२०१४ रोजी खालीलप्रमाणे अंतीम आदेश (Judgement) दिलेले आहे.

ORDER

1. Complaint is hereby allowed.
2. It is hereby declared that,respondents have engaged in unfair labour practices under item 1 (b) and (f) of Sch.IV of the said Act by terminating the services of the complainant w.e.f.7/11/2011 and hereby directed to desist the same.
3. The respondents are hereby further directed the complainant is entitled for reinstatement and continuity of service with full back wages and as he was reinstated w.e.f.1/10/2012,to give continuity of service and full back wage from the date of termination i.e.7/11/2011 till 1/10/2012.
4. In the discussed facts respondents should pay cost of Rs.3,000/- to the complainant.

Mumbai :
Dated :28.02.2014

(G.G.Hulsure)
Presiding Officer,
Third Labour Court, Mumbai

उपरोक्त आदेशास अनुसरुन तक्रारदार श्री.राणे यांचे ॲडव्होकेट श्री.अशोक बी.सोनवणे यांनी दि.१०-०३-२०१४ रोजीचे पत्रान्वये,"मा.तिसरे कामगार न्यायालय,मुंबई यांचे दि.२८-०२-२०१४ रोजीचे आदेशाप्रमाणे"तक्रारदार श्री.राणे यांना दि.०७-११-२०११ ते दि.०१-१०-२०१२ या कालावधीतील अनुज्ञेय असलेले सर्व फायदे व कॉस्ट रक्कम रु.३,०००/- तात्काळ आदा करावी अन्यथा योग्य ती पुढील कारवाई केली जाईल." असे कळविले आहे.

याबाबत संस्थान ॲडव्होकेट श्री.सचीन एस.शानभाग,मुंबई यांचेशी मोबाईल दुरध्वनीवरुन चर्चा केली असता त्यांना मा.तिसरे कामगार न्यायालय,मुंबई यांनी तक्रार यु.एल.पी.क्रं.२०८/२०११ संदर्भात

दि.२८-०२-२०१४ रोजी दिलेल्या अंतिम आदेशाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी अशा सुचना चर्चेअंती दिल्या आहेत.

सबब,मा.तिसरे कामगार न्यायालय,मुंबई यांनी तक्रार यु.एल.पी.क्रं.२०८/२०११ संदर्भात दि.२८-०२-२०१४ रोजी दिलेल्या अंतीम आदेशास अनुसरुन श्री.सुनिल दत्तात्रय राणे,सहाय्यक संपादक,श्री साईलिला, मुंबई कार्यालय यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ ए/२९१०/२०१२ दि.२९-०९-२०१२ अन्वये देण्यात आलेला नेमणूक आदेश कायम करुन श्री.राणे हे मागील कालावधीतील पुर्ण वेतन फुल बॅक वेजेस सह सलग नोकरीत पुर्ववत घेण्यास पात्र असल्यामुळे त्यांना दि.०७-०११-२०११ पासून ते दि.०१-१०-२०१२ या मागील एक वर्ष कालावधीतील पुर्ण वेतन,अनुज्ञेय भत्ते,वेतन बॅंड,ग्रेड पे इत्यादी वार्षिक वेतन वाढीसह आदा करण्यास व कॉस्टची रक्कम रु.३,०००/- श्री. राणे यांना आदा करण्यास मान्यता असावी असे मत आहे.

या संदर्भात निर्णय घेणेकामी उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेत आला होता.

त्यावर दि.०५-०६-२०१४ रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा होवून,सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले. असा निर्णय क्रं.४१२ पारीत झालेला आहे.

तथापी श्री.सचिन,एस.शानभाग,हायकोर्ट ॲडव्होकेट,मुंबई यांनी दि.२६-०६-२०१४ रोजीचे लेखी अभिप्राय पत्र दिलेले आहे त्यात त्यांनी, "In the matter I have already forwarded copy of order dated 28.02.2014 passed by Holble III rd Labour Court at Bandra Mumbai for your ready perusal and record.I have also applied for certified copies of the said order and will forward the same as and when it comes to my end.

The court order is self explanatory;therefore kindly direct the office to comply the same at the earliest as per the direction given in the said order.

As far as filing appeal against the said order will not give any fruit full relief thereby challenging same and filing appeal against the same." असे म्हटलेले आहे.

सबब, मा.तिसरे कामगार न्यायालय,मुंबई यांनी तक्रार यु.एल.पी.क्रं.२०८/२०११ संदर्भात दि.२८-०२-२०१४ रोजी दिलेल्या अंतीम आदेशास अनुसरुन श्री.सुनिल दत्तात्रय राणे,सहाय्यक संपादक,श्री साईलिला, मुंबई कार्यालय यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ ए/२९१०/२०१२ दि.२९-०९-२०१२ अन्वये देण्यात आलेला नेमणूक आदेश कायम करुन श्री.राणे हे मागील कालावधीतील पुर्ण वेतन फुल बॅक वेजेस सह सलग नोकरीत पुर्ववत घेण्यास पात्र असल्यामुळे त्यांना दि.०७-०११-२०११ पासून ते दि.०१-१०-२०१२ या मागील एक वर्ष कालावधीतील पुर्ण वेतन,अनुज्ञेय भत्ते,वेतन बॅंड,ग्रेड पे इत्यादी वार्षिक वेतन वाढीसह आदा करण्यास व कॉस्टची रक्कम रु.३,०००/- श्री. राणे यांना अदा करण्यास मान्यता असावी असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी तक्रार यु.एल.पी.क्रं. २०८/२०११ संदर्भात दि.२८-०२-२०१४ रोजी दिलेल्या अंतीम आदेशास अनुसरुन श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला, मुंबई कार्यालय यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ ए/२९१०/ २०१२ दि.२९-०९-२०१२ अन्वये देण्यात आलेला नेमणूक आदेश कायम करणेत यावा. मा.न्यायालयाचे आदेशानुसार श्री.राणे यांना मागील कालावधीतील पूर्ण वेतन फुल बॅक वेजेससह सलग नोकरीत पूर्ववत धरुन, दि.०७-११-२०११ ते दि.०१-१०-२०१२ या मागील एक वर्ष कालावधीतील पुर्ण वेतन, अनुज्ञेय भत्ते, वेतन बॅंड, ग्रेड पे इत्यादी वार्षिक वेतन वाढीसह व कॉस्टची रक्कम रु.३,०००/- मात्र त्वरीत आदा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१५** **तक्रार यु.एल.पी.क्र.२०८/२०११ श्री.सुनिल दत्तात्रय राणे विरुध्द श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी कोर्ट केसची वकील फि व इतर कोर्ट खर्च रु.५०,०००/- चे बीलाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री.साईलिला, मुंबई कार्यालय यांचे सेवेची सस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांना नोटीसीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतका नोटीस-पे देवून सेवामुक्त करण्यात यावे. अशाप्रकारचा कोणताही प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ व दि.२८-०८-२०११ रोजीचे सभेमध्ये प्रशासना तर्फे सादर करणेत आलेला नव्हता.तथापी, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ रोजीचे सभेतील ऐत्या वेळेचा निर्णय क्रं.५९५ (०४) व दि.२८-०८-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५९६ अन्वये श्री. राणे यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांना एक महिना मुदतीचे नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतकी रक्कम नोटीस-पे म्हणून देऊन, जा.नं.एसएसएस/ वशी-

७ए/३५७२/२०११ दि.०७-११-२०११ रोजीचे आदेशान्वये दि.०९-११-२०११ पासून संस्थान सेवेतून सेवामुक्त (टर्मिनेट) करणेत आले होते.

सदर सेवामुक्त (टर्मिनेशन) आदेशासंदर्भात श्री.राणे यांनी मा.कामगार न्यायालय (तिसरे), मुंबई येथे १) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी, २) श्री.किशोर रामराव मोरे सो. (कार्यकारी अधिकारी), ३) श्री.जयंत मुरलीधर ससाणे सो., तत्कालीन अध्यक्ष यांचे विरूध्द दि.१३-१२-२०११ रोजी तक्रार (यु.एल.पी) क्र.२०८/२०११ ही कोर्ट केस दाखल केलेली आहे. दाखल केलेल्या तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ कोर्ट केसमधील निशाणी यु-२ चे मनाई हुकूम अर्जा संदर्भात मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी दि.२१-०८-२०१२ रोजी श्री.राणे यांचे बाजूने अंतरिम आदेश दिलेला आहे.

मा.कामगार न्यायालयाचे सादर अंतरिम आदेशास अनुसरुन श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सेवामुक्त सहाय्यक संपादक, श्री साईलिला, मुंबई कार्यालय (झालेली सेवा-१० वर्षे, वय-४९ वर्षे)यांना पुन्हा तात्पुरते कामावर हजर/रूजू करून घेणेबाबतचा प्रस्ताव निर्णय होणेकामी दि.१५-०९-२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता.त्यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना मा.तिसरे कामगार न्यायालय,मुंबई यांचे तक्रार (यु.एल.पी.) क्रं.२०८/२०११ मधील निशाणी यु-२ संदर्भातील दि.२१-०८-२०१२ रोजीचे अंतरिम आदेशास अनुसरुन सहाय्यक संपादक,श्री साईलिला या पदावर मुंबई कार्यालय येथे तात्पुरते स्वरुपात (मा.तिसरे कामगार न्यायालयाचा अंतिम आदेश होईपर्यंत) कामावर (सेवेत) हजर (रुजू) करुन घेणेस, तसेच त्यांना सेवामुक्त (टर्मिनेशन) करणेपुर्वी जे मासिक पगार/वेतन आदा करण्यात येत होते.त्याचप्रमाणेच वेतन,अनुज्ञेय भत्ते,वेतन बॅन्ड,ग्रेड-पे,इत्यादी वार्षिक वेतनवाढीसह मासिक पगार/वेतन आदा करणेस निर्णय क्रं.७९२ अन्वये दि.२९-०९-२०१२ रोजीचे आदेशान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना पुन्हा सहाय्यक संपादक या पदावर मुंबई कार्यालय येथे कामावर हजर करुन घेणेत आलेले आहे. तथापी, श्री.राणे यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेली सदर मुळ कोर्ट केस अदयाप मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असून न्याय प्रविष्ठ आहे.

सदरचे कोर्टकेसचे वकिलपत्र ॲड.सचिन एस.शानभाग, हायकोर्ट ॲडव्होकेट, मुंबई यांचेकडे देण्यात आलेले आहे. म्हणून त्यांनी दि.२६-०७-२०१३ रोजीचे पत्रान्वये वकालत नामा, रिप्लाय ड्राफ्टींग फी, वेळोवेळी कोर्टासमोर संस्थानचे वतीने उपस्थित राहिले असून वकिल फी पोटी रु.५०,०००/- (रु.पन्नास हजार) मिळावी अशी विनंती केलेली आहे.ॲड.सचिन एस.शानभाग यांनी संस्थानच्या वतीने दि.२३-१२-२०११, दि.०६-०१-२०१२, दि.२०-०१-२०१२, दि.१०-०२-२०१२, दि.०६-०३-२०१२, दि.२८-०३-२०१२, दि.१६-०४-२०१२, दि.०४-०५-२०१२, दि.१२-०६-२०१२, दि.१९-०६-२०१२, दि.२६-०६-२०१२, दि.२९-०६-२०१२, दि.१३-०७-२०१२, दि.१६-०७-२०१२, दि.२१-०८-२०१२,दि.१४-०९-२०१२, दि.१६-१०-२०१२, दि.०२-११-२०१२, दि.०७-१२-२०१२ या दिवशी सुनावणीकामी मा.कामगार न्यायालयात उपस्थित राहिलेले आहेत असे नमुद केलेले आहे.

श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेल्या सदरच्या कोर्ट केसमध्ये अंतिम निर्णय आदेश होणे बाकी असुन त्यांना यापुर्वी वकिल फि पोटी ॲडव्हान्स रक्कम देण्यात आलेली नाही.औरंगाबाद खंडपीठाकडील उच्च न्यायालयातील ॲडव्होकेट यांना रु.१०,०००/- ते रु.२५,०००/- पर्यंत वकिल फि व कोर्ट खर्च कामी रक्कम यापुर्वी अदा करणेत आलेली आहे.हायकोर्ट ॲडव्होकेट यांना किती रक्कम वकिल फि व कोर्ट खर्च म्हणून अदा करावी याबाबत फिक्स असे शेडयुल ठरविणेत आलेले नाही.

श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला,मुंबई कार्यालय यांनी संस्थान विरुध्द मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या तक्रार (यु.एल.पी.) क्रं.२०८/२०११ कोर्ट केस संदर्भात मागणी केलेल्या रुपये ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) रक्कमेपैकी किती रुपये

श्री.सचिन एस.शानभाग, हायकोर्ट ॲडव्होकेट, मुंबई यांना अदा करावी या संदर्भात निर्णय होणेकामी उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.०५-०६-२०१४ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता.

त्यावर सविस्तर चर्चा होवून, तक्रार यु.एल.पी.२०८/२०११ श्री सुनिल दत्तात्रय राणे विरुध्द श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट,शिरडी या केसमध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारे श्री.सचिन एस.शानभाग, हायकोर्ट ॲडव्होकेट, मुंबई यांनी सदर तक्रारीमध्ये पुढे अपील करायला संधी नाही, त्यामुळे दि.२६-०२-२०१४ रोजीचे आदेशान्वये कार्यवाही करणेत यावी,असे तोंडी सांगितल्याचे समजले, तसे त्यांचेकडून लेखी स्वरुपात घेण्यात यावे, त्यानंतर निर्णय घेतला जाईल, असे ठरले. असा निर्णय क्रं.४११ पारीत झालेला आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन श्री.सचिन शानभाग,हायकोर्ट ॲडव्होकेट,मुंबई यांचेकडे लेखी अभिप्राय पत्र मागविणेत आलेले होते.श्री.शानभाग यांनी दि.२६-०६-२०१४ रोजीचे लेखी अभिप्राय पत्र दिलेले आहे त्यात त्यांनी, "In the matter I have already forwarded copy of order dated 28.02.2014 passed by Holble III rd Labour Court at Bandra Mumbai for your ready perusal and record.I have also applied for certified copies of the said order and will forward the same as and when it comes to my end.

The court order is self explanatory;therefore kindly direct the office to comply the same at the earliest as per the direction given in the said order.

As far as filing appeal against the said order will not give any fruit full relief thereby challenging same and filing appeal against the same." असे म्हटलेले आहे.

सबब, श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला,मुंबई कार्यालय यांनी संस्थान विरुध्द मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेली तक्रार/कोर्ट केस निकाली निघालेली असल्यामुळे सदर तक्रार (यु.एल.पी.) क्रं.२०८/२०११ कोर्ट केस संदर्भात मागणी केलेल्या रक्कम रुपये ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) रक्कमेपैकी रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) मात्र वकील फि व इतर कोर्ट खर्च म्हणुन श्री.सचिन एस.शानभाग, हायकोर्ट ॲडव्होकेट, मुंबई यांना अदा करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू निकालपत्राचे वाचन केले असता, या प्रकरणात अपील करण्यास फारसा वाव नाही, असे समितीचे मत झाले. तसेच संस्थानचे वतीने ॲड.शानबाग यांनी अनेक वेळा संधी देवूनही तक्रारदाराची उलट तपासणी घेतली नाही व संस्थानचे वतीने मा.न्यायालयामध्ये कुठलाही पुरावा सादर केलेला नाही, असे निदर्शनास आले. श्री.सचिन एस.शानभाग, हायकोर्ट ॲडव्होकेट, मुंबई यांना वकील फी व इतर कोर्ट खर्च म्हणुन रु.५०,०००/- ऐवजी रु.२५,०००/- मात्र रक्कम आदा करणेत यावी.**

**यापुढे संस्थानचे विधी विभागाने त्या विशिष्ट केसचा काळजीपूर्वक पाठपुरावा करावा. वकिलास आवश्यक ती सर्व माहिती पुरवली जावी व प्रत्येक तारखेच्या कामकाजाचा आढावा घ्यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१६** **सेवानिवृत्तीनंतर संस्थान सेवेत काम करण्याची संधी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अ) श्री.तुकाराम गोपीनाथ माणिक, कार्यालय अधिक्षक, मुंबई कार्यालय यांनी दि.१५/०७/२०१४ रोजीचे पत्रात "मी तुकाराम गोपीनाथ माणिक सध्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीच्या मुंबई कार्यालयात कार्यालय अधीक्षक या पदावर कार्यरत आहे. संस्थान नियमाप्रमाणे वयाची ६० वर्षे पुर्ण झाल्यावर संबंधीत कर्मचा-याला संस्थान सेवेतुन निवृत्त केले जाते. या नियमानुसार दि.१४/०८/२०१४ या दिवशी माझ्या वयाला ६० वर्षे पुर्ण होत असल्यामुळे सामान्य प्रशासन शाखा जा.क्र.एसएसएस/वशी-आस्था/९३७/२०१४ दि.१२/०६/२०१४ या आदेशानुसार दि.३१/०८/२०१४ रोजी माध्यान्होत्तर मी ४० वर्षाच्या संस्थान सेवेतील कारकीर्दीनंतर संस्थान मधुन निवृत्त होत आहे. संस्थानच्या मुंबई कार्यालयात सध्या इतर ०६ कायम कर्मचारी, ०२ सुरक्षा रक्षक, ०१ वाहन चालक व ०२ अकुशल कर्मचारी असे ०५ कंत्राटी कर्मचारी मिळुन एकुण ११ कर्मचा-यांकडुन मी संस्थानची दररोजची कामे सुरळीतपणे करुन घेत आलो आहे. मुंबई कार्यालयाचे कामकाज सांभाळुन मी वेळोवेळी गरजेनुसार मंत्रालयाशी निगडीत कामांबरोबरच आयकर कार्यालयाकडील संस्थान संबंधीत कामे करीत आहे. तसेच, श्री साईबाबा संस्थान शिर्डी येथील संस्थानच्या सर्व विभागांकडुन गरजेनुसार सांगण्यात येणारी कामे मी इतर कर्मचा-यांकडुन करुन घेत असतो व स्वतः करीत असतो. माझ्या वयाला ६० वर्षे पुर्ण झाल्यावरही मी आणखी काही वर्षे काम करु शकतो, माझे प्रकृतीमान धडधाकट आहे. तरी कृपया पुढील १-२ वर्षे मला संस्थान सेवेत काम करण्याची संधी मिळावी "

अशी विनंती केलेली आहे. तथापी श्री माणिक यांनी सेवानिवृत्ती नंतर त्यांची नेमणुक / मुदतवाढ कशा पध्दतीने करावी, किती मानधन / वेतन मिळावे याबाबत कुठलाही स्पष्ट उल्लेख अर्जात केलेला नाही.

**ब)** श्री रामदास मारुती कोते, वरिष्ठ लिपीकयांनी दि.२२/०७/२०१४ चे अर्जात "मी दि.०८/०२/१९७३ पासुन ४१.५ वर्ष अखंडपणे संस्थानमध्ये विविध विभागात सेवा केलेली असुन या कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन माझे हातुन झालेले नाही. दि.३१/०७/२०१४ रोजी माझे वयाला ६० वर्ष पुर्ण होत असल्याने संस्थान नियमानुसार मी दि.३१/०७/२०१४ रोजी सेवानिवृत्त होत आहे. माझी शारिरीक व मानसिक स्थिती व्यवस्थित असल्याने मी यापुढेही काही वर्ष संस्थानला सेवा देऊ शकतो. संस्थानमध्ये पुर्नसेवेसाठी मला संस्थानमार्फत मानधनावर सेवा करण्याची संधी दिल्यास मी सेवा देऊ शकेल. मात्र कंत्राटी पध्दतीने कर्मचारी म्हणुन मी सेवा करु इच्छित नाही. जर संस्थानमार्फत मानधनावर सेवेची संधी देणे शक्य होत नसेल तर मी विना मोबदला कोणत्याही विभागात सेवा करण्यास तयार आहे. " अशी विनंती केलेली आहे.

**क)** श्री रामदास मारुती कोते, वरिष्ठ लिपीक, मंदिर विभाग यांचे अर्जावर अधीक्षक,मंदिर विभाग प्रमुख यांनी "श्री रामदास मा.कोते व.लिपीक हे दि.१८/१०/२०१२ पासुन मंदिर विभागामध्ये पर्यवेक्षक या पदावर काम करीत आहेत. ते संस्थान सेवेमध्ये सन १९७३ पासुन कार्यरत आहेत. मी त्यांचे सन १९७५ पासुन काम पहात आहे.त्यांची सर्वात जास्त सेवा २३ वर्ष प्रसादालय विभागात झाली असुन १७ वर्ष सेवा निवासस्थान विभागात झालेली आहे. सन २०१२ पासुन ते मंदिर विभागात पर्यवेक्षक म्हणुन काम करीत असुन त्यांनी प्रत्येक ठिकाणी प्रामाणिकपणे,निस्पृह,निःशकलंकीत, निसंकोच सेवा निस्वार्थपणे व प्रशासनिक कामाचा चांगला अनुभव आहे हे मी संस्थान सेवेत पाहिलेले आहे. ते मंदिर विभागामध्ये पर्यवेक्षक म्हणुन ऑक्टोबर २०१२ पासुन काम करीत असुन ते प्रामाणिक असुन निःसीम साईभक्तीने व निस्वार्थपणे काम करीत आहे. त्यांचे वय ६० वर्षे झालेले आहे परंतु त्यांची शारीरिक क्षमता अजूनही ५/७ वर्ष काम करण्याची दिसुन येते.प्रदिर्घ सेवाकाळ व निःशकलंक असल्यने त्यांना संस्थान सेवेत निवृत्तीनंतरही ठराविक मानधनावर मंदिरामध्ये विशेष कार्यपर्यवेक्षक म्हणुन घेण्यास हरकत नाही " असा अभिप्राय दिलेला आहे.

**ड)** मा.व्यवस्थापन समितीचे दि. २८/०८/२०११ रोजी झालेल्या सभेतील विषय नं.६६ निर्णय क्र.६६१ अन्वये येथुन पुढे सेवानिवृत्त कर्मचा-यांनी सेवानिवृत्ती नंतर सेवेत मुदतवाढ मागीतल्यास नाकारणेत येऊन सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत येऊ नये असे ठरलेले आहे.

**इ)** मा.नामदार श्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री, कृषी व पणन यांनी दि.०७/१२/२०१२ रोजीचे पत्रान्वये "सेवानिवृत्तीनंतर कर्मचा-यांना मुदतवाढ दिल्यास नवीन व होतकरु तरुणांचा रोजगाराचा प्रश्न निर्माण होतो. नवीन तंत्रज्ञान आत्मसात केलेल्या कर्मचा-यांची नियुक्ती करुन त्यांना व्यवस्थापनेचे प्रशिक्षण दिल्यास त्यांच्या ज्ञानाचा संस्थानला निश्चितच उपयोग होऊ शकेल व बेरोजगारीचा प्रश्नही सुटू शकेल. सेवारत अथवा निवृत्त कर्मचा-यांना मुदतवाढ दिल्यास होतकरु तरुणांचे मनोबल खच्चीकरण होते. संस्थानचे कामात नवीन तरुण कर्मचा-यांना वाव देण्याचे हेतुने कोणत्याही सेवानिवृत झालेल्या कर्मचा-यास मुदतवाढ देऊ नये ही विनंती. तथापी असे प्रस्ताव मंजूर करुन शासकीय निर्देशाचे उल्लंघन झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासकीय मंडळावर राहील." असे कळविलेले आहे.

**ई)** महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी सांसवि-२०११/५३८/ प्र.क्र.६९/ पुर्नबांधणी-१२/ का.सोळा दि.२३/०१/२०१३ रोजीचे पत्रातील अ.नं.५ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर मंजूर करण्यात आलेल्या आकृतीबंधाबाहेर जावून कोणत्याही पदावर भरती करु नये तसेच शासनाच्या प्रचलित नियमानुसार सेवेत मुदतवाढ, पुर्ननियुक्ती, सेवानिवृत्ती नंतर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात येऊ नये असे आदेश दिलेले आहेत.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, यापुर्वी श्री.ई.एन.वाघ, श्री.आर.एस.साबळे, श्री.पी.बी. बोरावके (सर्व प्रशासकीय अधिकारी) तसेच श्री.एन.के.कुलकर्णी व इतर कर्मचा-यांचे सेवेत मुदतवाढीचे अर्ज मा.व्यवस्थापन समितीने नामंजुर केलेले आहेत. तसेच श्री.जे.व्ही.वझे,वरिष्ठ लेखापाल, श्री.पी.व्ही.कुलकर्णी,मुख्य रोखपाल, लेखाशाखा यांचे विनंती अर्ज संस्थान प्रशासनाने मंजुर टिपणीन्वये दप्तरी दाखल केलेले आहेत.

तथापी, श्री.तुकाराम गोपीनाथ माणिक हे संस्थानचे मुंबई कार्यालयात अधीक्षक म्हणुन कार्यरत आहे. त्यांना मुंबई येथील मंत्रालयीन तसेच आयकर विभागातील कामाची चांगल्याप्रकारे माहिती आहे. त्याचप्रमाणे ते संस्थानचे मुंबई कार्यालयातील कर्मचा-यांकडुन चांगल्या प्रकारे कामे करुन घेतात.

तसेच श्री रामदास मारुती कोते, व.लिपीक,हे मंदिर विभागात कार्यरत असुन त्यांनी प्रामाणिकपणे, निस्पृह, निःशकलंकीत,निसंकोच सेवा विविध विभागात केलेली आहे. व ऑक्टोबर २०१२ पासुन निस्वार्थपणे

मंदिर विभागामध्ये पर्यवेक्षक म्हणुन काम करीत असुन ते प्रामाणिक असुन निःसीम साईभक्तीने व निस्वार्थपणे काम करीत आहे.

सबब, उपरोक्त नमुद बाबींचा विचार करता श्री.माणिक व श्री.कोते यांना संस्थान सेवेत मुदतवाढ देणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१७ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम- २००४ मधील तरतुदींमध्ये आवश्यक बदल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वतव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४, (२००४ चा महा.१४) च्या कलम ५ (०१) (०२) अन्वये संस्थानच्या व्यवस्थापनासाठी व्यवस्थापन समिती नियुक्त करण्यात आली असून, तीचे अधिपत्याखाली संस्थानचे कामकाज चालु आहे.

सदर अधिनियमाची माहे सप्टेंबर २००४ मध्ये अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर त्यांतील विविध तरतुदींची प्रत्यक्षात अंमलबजावणी करतांना कायदेशीर अडचणी येत असून प्रशासकीय कामकाजात क्लिष्टता वाढली आहे. तरी प्रशासकीय कामकाजाच्या सुलभतेच्या दृष्टीकोनातून अधिनियमातील तरतूदींमध्ये आवश्यक बदल सूचवून मान्यता देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २९/०१/२००५ व दि.१७/०५/२००९ चे सभेमध्ये ठराव करण्यात आलेला आहे. त्यानुसार अधिनियमातील तरतुदींमध्ये बदल करणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/३७७०/२००५ दि.१२/०४/२००५ व जा.नं.एसएसएस/ वशी-०१/६०२८/२००९ दि.१९/०५/२००९ अन्वये यापुर्वी शासनास कळविण्यात आलेले आहे.

त्यानंतर शासन क्र.सासंवि २००९/२६७/प्र.क्र.२१/का.१६ विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२२/१०/२०१३ व शासन क्र.सासंवि २००९/२६७/प्र.क्र.२१/का.१६ विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०३/०४/२०१४ चे पत्रान्वये नव्याने मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याच्या दृष्टीने सद्यस्थितीत यापूर्वी सादर केलेल्या सुधारणांसह अन्य काही दुरूस्त्या प्रस्तावीत व आवश्यक असल्यास सर्वांगिण बाबींचा समाविष्ट असलेला एकत्रित प्रस्ताव खास दूतामार्फत शासनास सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

त्यास अनुसरून जा.नं.एसएसएस/वशी-०१/११७/२०१४ दि.०५/०४/२०१४ रोजीचे पत्रान्वये पुन्हा सदरचा प्रस्ताव संस्थानचे खास दूता मार्फत दि.०७/०४/२०१४ रोजी कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.

आता, शासन क्र.सासंवि २००९/२६७/प्र.क्र.२१/का.१६ विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२२/०४/२०१४ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूदींमध्ये आवश्यक बदल करण्याच्या अनुषंगाने आपण दि.०५/०४/२०१४ रोजीचे पत्रान्वये पूर्वीचाच मसूदा पुन्हा मान्यतेसाठी शासनास सादर केलेला आहे. वस्तुतः २००५ व २००९ च्या व्यवस्थापन समितीच्या सभेत झालेल्या ठरावानुसार आता मसुदा सादर करणे योग्य नसून २००९ नंतरच्या कालावधीत अधिनियमातील तरतूदींची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन सर्वांगीण प्रस्ताव विद्यमान व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने शासनास सादर करणे अपेक्षीत आहे. तसेच दि.२४/०१/२०१३ च्या शासन अधिसूचनेतील तरतुदी विचारात घेणे आवश्यक आहे. इत्यादी सर्वांगीण बाबींचा समावेश करुन एकत्रित प्रस्ताव व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन शासनास अत्यंत तातडीने सादर करणेबाबत कळविलेले आहे.

सदरचा प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करणेकामी दि.१२/०५/२०१४ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे कक्षात प्रशासकीय अधिकारी यांचे समवेत सभा घेण्यात आली. यांची एकत्रित सभा घेऊन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूदींमध्ये आवश्यक बदल करण्याच्या अनुषंगाने सोबतचे परिशिष्टानुसार यापुर्वी सादर कलेल्या बाबींचे वाचन करुन खालीलप्रमाणे नव्याने दुरूस्त्या करणेचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

| विद्यमान तरतुदी | शासनास सूचित करावयाची सुधारित तरतूद | सुधारणांची कारणे |
|---|---|---|
| **१३.** (४) समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि | **१३.** (४) समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी या | या कायदयानुसार विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यक्षम व्यवस्थानासाठी आणि कर्तव्ये व कार्य करण्यासाठी व्यवस्थापन समितीस शासनाने |

| | | |
|---|---|---|
| या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकारी व्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल.<br>परंतू ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा **दोन हजार** रुपयावरुन अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा दयावयाचे असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्यांची नेमणूक समितीकडून असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. | अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची **कंत्राटी पध्दतीने** नेमणूक करता येईल.<br>परंतु समितीस जेव्हा राज्य शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधाव्यतिरिक्त ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्यांला दरमहा **पन्नास हजार** रुपयापेक्षा अधिक वेतन देय असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्यांची नेमणूक शासनाचे पूर्व परवानगीने करील. | मंजूर केलेल्या आकृतीबंधा खेरीज अधिकारी / कर्मचारी नेमणेची परवानगी असावी.<br>शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांच्या गर्दीत दिवसेंदिवस होणारी लक्षणीय वाढ विचारात घेता भक्तांना पायाभूत सेवा सुविधा पुरविणेकामी प्रशिक्षीत कर्मचारी वर्गाची कंत्राटी अथवा स्थायी स्वरुपात आवश्यकतेनुसार नेमणूक करावी लागते.<br>सध्याची वेतनश्रेणी व महागाई विचारात घेता नेमणूक करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या एकुण वित्तलब्धीची दरमहा मर्यादा रु.५०,०००/- पर्यंत वाढविणे योग्य होईल. |
| **समितीच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये.**<br>**१४ (२) (ख)** बांधकामासाठी किंवा मालाच्या पुरवठयासाठी निविदा मागवण्याचे आणि जेव्हा अशा निविदेची रक्कम अथवा मुल्य **२५०००/-** रुहून अधिक नसेल तेव्हा त्या निविदा स्विकारण्याचे : | **समितीच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये.**<br>**१४ (२) (ख)** संस्थानला मालाच्या पुरवठयासाठी निविदा मागवण्याचे आणि जेव्हा अशा निविदाची रक्कम अथवा मुल्य रु. **दहा लाख** पेक्षा अधिक नसेल तेव्हा त्या निविदा स्विकारण्याचे : | **१४)** (२) (ब) मधील रक्कम रु.२५०००/- पर्यंतच्या खुल्या निविदा मागविण्याची तरतूद अतिशय निर्बंधीत आहे.<br>राज्य शासनामध्ये वरील अधिकार हे विभाग प्रमुखांना दिलेले आहेत.महाराष्ट्र आकस्मिक खर्च अधिनियम १९६५ प्रमाणे महाराष्ट्र शासन वित्त विभाग, राजपत्र प्रसिद्धिकरण क्रमांक M C E १०९१ / (५) नियम, दिनांक २२ नोव्हेंबर १९९१ च्या नियम नं.०२ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.<br>कुठल्याही प्रकारची खरेदी ही सर्व साधारणपणे सार्वजनिक टेंडर बोलावून करण्यात यावी. सदर खरेदीतील मालाची किंमत रु.५०,०००/- पेक्षा अधिक होत असल्यास वर्तमानपत्रात जाहीरात देणे सक्तीचे आहे. तसेच खरेदी रक्कम रु.५०,०००/- पेक्षा कमी होत असल्यास संस्थेने मान्य केलेल्या यादीतील मध्यवर्ती खरेदी भांडार संघाकडे खरेदी विषयी चौकशी करावी. चलण फुगवटयाच्या होणाऱ्या परिणामाच्या निवारणासाठी वरील वित्तीय मर्यादामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात येते. वरील मर्यादांमध्ये १५ वर्षांपासून सुधारणा झालेली नाही. |

| | | |
|---|---|---|
| **१७** (४) विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहीत केलेली, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहीर, दागिणे व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजुरीने असेल त्या खेरीज समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण | (४) विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहीत केलेली, **पाच लाख** रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहीर, दागिणे व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजुरीने असेल त्या खेरीज समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण | भक्तांनी श्री साईबाबांना अर्पण केलेल्या सोने-चांदीचे वस्तू वितळवून त्यांचे श्री साईच्या मुद्रांची नाणी तयार करुन ती नाणी भक्तांना किमान दरात संस्थानकडून उपलब्ध करुन देणे सोईचे होणेकामी सदरची मर्यादा पन्नास हजार हून पाच लाख करणे सोईचे होईल. |

| | | |
|---|---|---|
| म्हणून ठेवण्यात येणार नाही. किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही. | म्हणून ठेवण्यात येणार नाही. किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही. | |

यापुर्वी शासनास सादर केलेल्या प्रस्तावामधील तरतुदीमध्ये वरील बाबींचा समावेश करुन सोबत परिशिष्ट सादर केलेले आहे. त्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूदींमध्ये आवश्यक बदल करणेबाबतचा प्रस्ताव प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९३ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम- २००४ मधील तरतुदींमध्ये कोण-कोणत्या आवश्यक सुधारणा करावयाच्या आहेत, याबाबतचा अभ्यास करणेसाठी त्या तरतुदींमधील सुधारणांच्या प्रती समिती सदस्यांना पुरविणेत याव्यात, तोपर्यंत सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१८ संस्थान सेवेत असतांना मयत (निधन) झालेल्या पतीचे जागी अनुकंपा तत्वावर संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** कै.सोमनाथ भगवान मराठे, वर्ग ०४ कर्मचारी, प्रसादालय विभाग यांचे संस्थान सेवेत असतांना दिनांक ३० मे २०१४ रोजी रोजी श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी येथे आजारपणामुळे दु:खद निधन झालेले आहे. कै. सोमनाथ मराठे यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर त्यांचे जागी नोकरी मिळणेबाबत त्यांच्या पत्नी श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे मु.पो.शिरडी यांनी दि.२४ जून २०१४ रोजी विहीत नमुन्यात अर्ज सादर केलेला आहे. या अर्जासोबत श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

०१. कै.सोमनाथ भगवान मराठे यांचे मृत्यू प्रमाणपत्र.
०२. श्री भगवान जावजी मराठे (दिवंगत यांचे वडील) यांनी मा.तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे समोर सादर केलेले दि.२२ जुलै २०१४ रोजीचे संमतीपत्र.
०३. शिधापत्रिका क्र. WG-०३५०८६३.
०४. भारत सरकार निवडणूक ओळखपत्र क्रं. ITJ- ६०३६१५६.
०५. श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे व रुपाली रामदास आमले दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच असल्याचे मा.तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे समोर सादर केलेले दि.२२ जुलै २०१४ रोजीचे प्रतिज्ञापत्र.
०६. शारदा कन्या विद्या मंदिर, राहाता यांचे शाळा सोडल्याचा दाखाला व त्यावरील जन्मतारीख - २६/०५/१९८३ व आज रोजीचे वय ३१ वर्षे ०२ महिने.
०७. पुणे विद्यापीठ बी.ए उत्तीर्ण प्रमाणपत्र.
०८. एम.एस.सी.आय.टी पास प्रमाणपत्र.
०९. Montessori Teachers Course.(Gov.Reg)

**दिवंगत कर्मचारी यांची माहीती**

A) दिवंगत कर्मचाऱ्यचे पूर्ण नाव : सोमनाथ भगवान मराठे
B) मृत्यू दिनांक : दि.३०/०५/२०१४.
C) मृत्युचे वेळी असणारे पदनाम व विभाग : वर्ग ०४ कर्मचारी, प्रसादालय विभाग.
D) वेतनश्रेणी : वेतनबँड ४४४०-७४४० + ग्रेड पे १३००
E) संस्थानमधील कायम सेवेचा कालावधी : दि.०१/०९/२००१ ते दि.३०/०५/२०१४
एकूण सेवा १२ वर्षे ०८ महिने २९ दिवस

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. अकंपा-१०००/प्र.क्र. २०/२०००, दि.२८/०३/२००१ तसेच सुधारीत शासन निर्णय क्र. अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४, दि.२२/०८/२००५ अन्वये शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. तसेच अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याच्या वारसाचे वय ४० वर्षाच्या आत असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते.

या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन ( Form 'F' See Sub- Rule (१) of Rule ६- "Nomination made herein invalidates my previous

nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

कै. मराठे यांनी हयात असतांना दिनांक १३/०९/२००१ रोजी ग्रॅच्युएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे नॉमीनेशन पत्रात सौ.शांताबाई भगवान मराठे (आई) व श्री. भगवान जवाजी मराठे (वडील) यांची वारसदार (Nominee) म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यापैकी सौ.शांताबाई मराठे यापूर्वीच मयत झालेल्या आहेत. सदर नॉमिनेशन पत्रात श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे यांचे नाव नाही.

यापुर्वी शासन निर्णयानुसार व तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेल्या विविध निर्णयानुसार, संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत सामावुन घेणेत आलेले आहे.

उपरोक्त विवेचनानुसार, श्री हे संस्थानमध्ये अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेस पात्र आहेत, तथापि, मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/ (३७/०९)-का.सोळा, दि.०७/०८/२००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात आज रोजी वर्ग ०४ संवर्गाची १२३२ स्थायी पदे मंजूर आहेत. सद्यःस्थितीस वर्ग ४ चे पदावर १२६७ कर्मचारी काम करत असून, सध्या वर्ग ४ संवर्गाचे ३५ कर्मचारी अतिरिक्त आहेत.

तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे :

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे. "

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे. तसेच कै.सोमनाथ मराठे यांचे लहान बंधू श्री मनोज भगवान मराठे, वर्ग ०४ कर्मचारी म्हणून संस्थान सेवेत कार्यरत आहेत.

तरी उपरोक्त परिस्थिती, शासन निर्णय व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६५ विचारात घेता, श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे यांना सध्या लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत अकुशल कामगार म्हणून कामावर घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालयाचे मनाई हुकूमामुळे व संस्थान आस्थापनेवर सध्या वर्ग-०४ ची पदे रिक्त नसल्यामुळे अनुकंपा भरती होवू शकत नाही, असे अर्जदारास कळविणेत यावे. मा.उच्च न्यायालयाची परवानगी मिळाली आणि जागा रिक्त असेल त्यावेळी अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याच्या सर्व नियमांचा विचार करुन योग्य निर्णय घेतला जाईल.**

**अशा प्रकारे अनुकंपा तत्वावर नोकरीची मागणी करणाऱ्या अर्जदाराची शिफारस त्यास कंत्राटी पध्दतीने कामावर घेणेबाबत ठेकेदाराकडे करु नये. मा.उच्च न्यायालयाची परवानगी मिळेपावेतो अशी अनुकंपा भरती केली जाणार नाही, तेव्हा असे प्रस्ताव तोपर्यंत समितीसमोर आणू नयेत व संबंधीतास तसे कळविण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१९** **संस्थान सेवेत असतांना मयत (निधन) झालेल्या वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्री. किरण प्रकाश कोते यांचा दि.२९.०७.२०१४ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** कै.प्रकाश भाऊसाहेब कोते, वर्ग ०४ कर्मचारी, साईबाबा भक्तनिवासस्थान यांचे संस्थान सेवेत असतांना दिनांक ०१ जुलै २०१४ रोजी श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी येथे आजारपणामुळे दुःखद निधन झालेले आहे. कै. कोते यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर त्यांचे जागी नोकरी मिळणेबाबत त्यांचा मुलगा श्री किरण प्रकाश कोते, शिरडी यांनी दि.२९ जुलै २०१४ रोजी विहीत नमुन्यात अर्ज सादर केलेला आहे. या अर्जासोबत श्री किरण कोते यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१. कै. प्रकाश भाऊसाहेब कोते यांचे मृत्यू प्रमाणपत्र.
२. श्रीमती अलका कोते (दिवंगत यांच्या पत्नी) यांचे मा.तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे समोर सादर केलेले दि. २५ जुलै २०१४ रोजीचे संमतीपत्र.
३. श्रीमती अलका प्रकाश कोते यांचे नावे असलेले शिधावाटप पत्रिका क्रं.WG-०३५१०३१.
४. भारत सरकार आधार कार्ड क्र. ९१६८ ०००२ ०३४३.
५. निवडणूक आयोग ओळखपत्र क्र. ITJ- 1433895.

६. श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय,शिर्डी यांचेकडील शाळा सोडलेचा दाखला अनुक्रमांक- ६५९. (सत्यप्रत) जन्मदिनांक - २१/०८/१९८४ आज रोजीचे वय- ३० वर्षे.

**दिवंगत कर्मचारी यांची माहीती**

A) दिवंगत कर्मचाऱ्याचे पूर्ण नाव : प्रकाश भाऊसाहेब कोते

B) मृत्युचे वेळी असणारे पदनाम व विभाग : वर्ग ०४ कर्मचारी, साईबाबा भक्तनिवासस्थान.

C) वेतनश्रेणी : वेतनबँड ४४४०-७४४० + ग्रेड पे १४५०.

D) संस्थानमधील कायम सेवेचा कालावधी: दि.१०/०६/९३ ते दि.०१/०७/२०१४एकूण सेवा २१ वर्षे ०१ महिने.

E) मृत्यू दिनांक : ०१/०७/२०१४.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.अकंपा-१०००/प्र.क्र.२०/ २०००, दि.२८/०३/२००१ तसेच सुधारीत शासन निर्णय क्र.अकंपा-१००४/ प्र.क्र.५१/ २००४, दि.२२/०८/२००५ अन्वये शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. तसेच अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याच्या वारसाचे वय ४० वर्षाच्या आत असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते.

या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub- Rule (1) of Rule 6- "Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

कै. कोते यांनी हयात असतांना दिनांक ११/०३/२००२ रोजी ग्रॅच्युएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे नॉमीनेशन पत्रात श्री किरण प्रकाश कोते (मुलगा) यांची वारसदार (Nominee) म्हणून नोंद केलेली नाही. तसेच या नॉमिनेशन फॉर्ममध्ये त्यांची पत्नी म्हणून सौ.शोभा प्रकाश कोते अशी नोंद असून अर्जासोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांवर श्रीमती आलका प्रकाश कोते अशी नोंद आहे. त्यामुळे याबाबत अर्जदार यांचेकडून खात्री होणे आवश्यक आहे.

यापुर्वी शासन निर्णयानुसार व तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेल्या विविध निर्णयानुसार, संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत सामावुन घेणेत आलेले आहे.

मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/ (३७/०९)-का.सोळा, दि.०७/०८/२००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात सद्यस्थितीस वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३३ स्थायी पदे मंजूर असून, सद्यःस्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर अंदाजे १२६९ इतके कर्मचारी काम करीत असलेने, सध्या वर्ग ४ चे ३६ कर्मचारी अतिरिक्त आहेत.

तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे :"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे." असा निर्णय झालेला आहे.

तथापी, शासन निर्णय क्रं.अकपा/ १०९३/ २३३५/ प्र.क्र.९०/ ९३/आठ दिनांक २६/१०/१९९४ मधील कलम ३ ब मध्ये

"सदर नेमणूक शासकीय कर्मचाऱ्याच्या फक्त एकाच नातेवाईकास देता येईल."

तसेच कलम ७ ब मध्ये असे नमूद केले आहे की,

"एखाद्या कुटुंबात मृत कर्मचाऱ्यांचा नातेवाईक यापूर्वीच सेवेत असेल परंतु तो त्या कुटुंबातील अन्य सदस्यांना आधार देत असेल तर अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे किंवा कसे हे ठरवितांना नियुक्ती अधिकाऱ्याने अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत नाही या नावाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही.

या संदर्भात नियुक्ती अधिकाऱ्यांने, मिळणाऱ्या निवृत्तीबाबतची रक्कम, कुटुंबातील व्यक्तिची संख्या, त्याची मालमत्ता, दायित्व, गंभीर आजारमुळे मृत झाला असल्यास त्यासाठी करण्यात आलेला वैद्यकिय खर्च, कुटुंबातील मिळवत्या व्यक्ती इत्यादी बाबी विचारात घेणे अपेक्षित आहे." असे नमूद केलेले आहे.

उपरोक्त दि.२६/१०/१९९४ रोजीचे शासन निर्णयामधील कलम ३ ब व ७ ब नुसार दिवंगत कर्मचारी यांचा मोठा मुलगा व अर्जदारांचा मोठा भाऊ श्री.अरुण प्रकाश कोते (वर्ग ०४ कर्मचारी, साईबाबा

भक्तनिवासस्थान) हे यापूर्वीच संस्थान सेवेत कायम पदावर कार्यरत असून याबाबत अर्जदारांनी त्यांचे विहीत नमुन्यातील अर्जात तसेच दि.२५/०७/२०१४ रोजीचे प्रतिज्ञा पत्रात उल्लेख केलेला दिसत नाही.

तरी उपरोक्त परिस्थिती विचारात घेता श्री.किरण प्रकाश कोते यांना लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत अकुशल कामगार म्हणून प्रसादालय विभागाकडे कामावर घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालयाचे मनाई हुकूमामुळे व संस्थान आस्थापनेवर सध्या वर्ग-०४ ची पदे रिक्त नसल्यामुळे अनुकंपा भरती होवू शकत नाही, असे अर्जदारास कळविणेत यावे. मा.उच्च न्यायालयाची परवानगी मिळाली आणि जागा रिक्त असेल त्यावेळी अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याच्या सर्व नियमांचा विचार करुन योग्य निर्णय घेतला जाईल.**

**अशा प्रकारे अनुकंपा तत्वावर नोकरीची मागणी करणाऱ्या अर्जदाराची शिफारस त्यास कंत्राटी पध्दतीने कामावर घेणेबाबत ठेकेदाराकडे करु नये. मा.उच्च न्यायालयाची परवानगी मिळेपावेतो अशी अनुकंपा भरती केली जाणार नाही, तेव्हा असे प्रस्ताव तोपर्यंत समितीसमोर आणू नयेत व संबंधीतास तसे कळविण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२०** **दिपावली- सन २०१४ करीता संस्थान सेवकांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सासंकसं/ १७/१४, दिनांक ०८ ऑगष्ट, २०१४ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे विनंती केली आहे :

.. .. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत दरवर्षी संस्थान कर्मचाऱ्यांना दिपावली सानुग्रह देण्यात येते त्याबद्दल, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना आपले मन:पूर्वक आभारी आहोत. यावर्षी दिपावली दि.२३/१०/२०१४ रोजी असून दरवर्षी ८.३३% इतका सानुग्रह अनुदान दिला जात आहे. परंतु दिवसेंदिवस महागाई मोठया प्रमाणात वाढलेली असल्याने ह्या दिपावली निमित्त कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान वाढ करुन १६.६६ इतका (दुप्पट) दिल्यास दिपावली आनंदाने साजरी करता येईल.

तरी मा. मेहरबान श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना आपणांस नम्रपणे विनंती करते की, ह्या वर्षी दिपावली निमित्त संस्थान कर्मचाऱ्यांना त्यांचे दोन महिन्यांचे पगाराइतके सानुग्रह अनुदान मिळावे, ही विनंती.

थोडक्यात, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी सन २०१४ मध्ये साजऱ्या करणेत येणाऱ्या दिपावली उत्सवासाठी संस्थान सेवेतील कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान मिळणेबाबत विनंती केलेली आहे. कर्मचारी संघटनेने केलेल्या विषयांकित विनंतीबाबत विवेचन खालीलप्रमाणे :

सन १९७७ पासून तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार तसेच मा. न्यायालयाचे निर्णयानुसार संस्थानचे व्यवस्थापन पहाणारे मा. कोर्ट रिसीव्हर यांचे आदेशानुसार, संस्थान सेवकांना दिपावली उत्सवानिमित्त दरवर्षी दिपावलीपुर्वी सानुग्रह अनुदान देणेत येत आहे. तद्नंतर सन १९८४ मध्ये मा. सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांनी संस्थान व्यवस्थापनासाठी स्किम तयार करुन, मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रणाखालील तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळानेही संस्थानचे व्यवस्थापन पहात असतांना दरवर्षी संस्थान सेवकांना सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे.

**(ब)** दरम्यानचे कालावधीत, माहे ऑगष्ट, २००४ मध्ये, महाराष्ट्र शासनाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व प्रशासन पहाणेकरीता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ (अधिनियम क्रमांक १४) हा कायदा पारित केला. या अधिनियमांत संस्थान कर्मचाऱ्यांचे बाबतीत प्रामुख्याने खालील तरतुदी करणेत आलेल्या आहेत :

**कलम १५:** कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या शीर्षाखालील पोटकलम (३) समितीच्या कार्यकारी अधिकाऱ्याचे आणि इतर अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च हे व्यवस्थापन निधीतून देण्यात येतील.

सार्वजनिक विश्वतस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे या शीर्षाखालील **कलम १६:** नियत दिवसाच्या लगतपूर्वी जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तिला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजांशी संबंधित अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही.

परंतु, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदीनुसार अशा कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही.

याशिवाय, **कलम १७:** समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षाखालील पोटकलम (२)(घ) समितीच्या सदस्यांना व कार्यकारी अधिकाऱ्याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय रकमा नियमित प्रदान करील.

तसेच या व्यतिरिक्त कलम १५ चे तरतुदीत उल्लेख केलेल्या व्यवस्थापन निधीबाबत या अधिनियमात **कलम २२:** व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग या शीर्षाखालील तरतुदीत पोटकलम (३)(ख) मध्ये समितीचे इतर अधिकारी व इतर कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे असे स्पष्टपणे नमूद करणेत आलेले आहे.

उपरोक्त अधिनियमांतील तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या मा. व्यवस्थापन समितीनेही सन २००४ ते सन २०११ पर्यन्त दरवर्षी संस्थान सेवकांना दिपावली उत्सवाकरीता सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे.

तसेच, उक्त अधिनियमातील तरतुदींनुसार, सानुग्रह अनुदानाचा खर्च कलम २२ नुसार व्यवस्थापन निधीत खर्ची टाकणेत येतो व व्यवस्थापन निधीतून केलेल्या खर्चाच्या नोंदी वार्षिक अहवालाच्या माध्यमातून राज्य शासनाच्या व विधी मंडळाच्या पटलासमोर मान्यतेसाठी सादर करणेत येतो.

(क) दरम्यानचे कालावधीत, म्हणजेच दिनांक २९ मार्च, २०१२ रोजीचे मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व नियंत्रण करणेसाठी नियुक्त केलेल्या मा. त्रिसदस्यीय समितीने सन- २०१२ चे दिपावली उत्सवाकरीता संस्थान सेवकांना द्यावयाचे सानुग्रह अनुदानाबाबत दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८७३ अन्वये तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र. १८/२०११ मधील दिवाणी अर्ज क्रमांक १२६९४/२०१२ चे अनुषंगाने, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१२ रोजीचे आदेशानुसार संस्थान सेवकांना रक्कम रुपये ४,८४,००,०००/- मात्र सानुग्रह अनुदान म्हणून वाटप करणेस मान्यता दिलेली होती. या निर्णयांनुसार सन २०१२ मध्ये संस्थान सेवकांना रुपये ४,६२,०५,१८४/- मात्र इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून आदा करणेत आलेली आहे.

तसेच, मा. त्रिसदस्यीय समितीने सन- २०१३ चे दिपावली उत्सवाकरीता संस्थान सेवकांना द्यावयाचे सानुग्रह अनुदानाबाबत दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७७० अन्वये तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र. १८/२०११ मधील दिवाणी अर्ज क्रमांक १३२८४/२०१३ चे अनुषंगाने, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशानुसार, संस्थान कर्मचाऱ्यांना रक्कम रुपये ५,६०,००,०००/- मात्र सानुग्रह अनुदान म्हणून वाटप करणेस सशर्त मान्यता दिलेली होती. या निर्णयांनुसार, संस्थान सेवकांकडून विहित नमुन्यात हमीपत्र घेऊन, लेखाशाखेकडील दिनांक २३ ऑगष्ट, २०१४ रोजीचे अहवालानुसार सन २०१३ मध्ये संस्थान सेवकांना रुपये ५,१९,३५,५६०/- मात्र इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून आदा करणेत आलेली आहे.

सन २०१३ चे सानुग्रह अनुदानाबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशात सशर्त मान्यता देतांना खालीलप्रमाणे नमुद केलेले होते :

.. 5. As the amounts have been disbursed in past, we permit the applicant Sanstha to provisionally disburse the amount as per prayer.

6. However, We direct Respondent No.1 – Non Applicant No. 1 State Government to file appropriate reply on the provisions of Section 21 and 22 of the said Act withinh a period of four weeks from to day. After receipt of said reply further appropriate orders on this civil application shall be passed. If the Court finds amount could not have been paid or less amount should have been paid, he direction to recover that amount or to adjust that amount from salaries being paid can be issued. We permit the applicant to disburse the amount provisionally and grant prayer B as an ad-interim order.

मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक २३ जानेवारी, २०१३ चे पत्रातील निर्देशानुसार आणि मा.उच्च न्यायालयाचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशानुसार, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस संस्थान सेवकांना सन २०१३ चे दिपावलीकरीता सानुग्रह अनुदान अदा करणेस मान्यता मिळणेकामी अनुक्रमे दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१३ व दिनांक ०८ जानेवारी, २०१४ रोजी प्रस्ताव-वजा-विनंती पत्र सादर करणेत आलेले आहे.

त्यास अनुसरुन, मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील दिनांक ०४ एप्रिल, २०१४ रोजीचे पत्राने, प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रतिक्षा करणेत यावी, असे कळविलेले आहे.

**थोडक्यात,** वर नमुद केलेप्रमाणे, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सन १९८४ ते सन २०१० अखेर संस्थान आस्थापनेवरील स्थायी सेवकांना व सन २०११ पासून स्थायी व अस्थायी कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्रत्येक वर्षी सानुग्रह अनुदान आदा करणेत येत आहे.

**(ड)** उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेल्या विवेचनास अनुसरुन, सन २०१४ चे दिपावली उत्सवाचे सानुग्रह अनुदानाकरीता खाली नमुद केलेप्रमाणे संस्थान आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी सेवकांना प्रस्तावित करता येईल :

(०१) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१३ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ या कालावधीत संस्थान आस्थापनेवर मासिक वेतन/ नियत वेतन/ मानधनावर सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी, संस्थान आस्थापनेवरील मासिक एकत्रित मानधनावर, कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेले विशेष कार्य अधिकारी, कनिष्ठ अभियंते, सल्लागार, मोजणीदार, वाहनचालक, ग्रंथालय सहाय्यक, कार्यालय प्रमुख, कार्यालय सहाय्यक, मदतनीस, संस्थान आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने असलेले शासकीय अधिकारी यांना दिलेल्या एकूण वेतनाचे/ पगाराच्या ८.३३ टक्के दराने (एक महिन्याचे वेतन) होणारी रक्कम आदा करता येईल.

(०२) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१३ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ या कालावधीत ज्या कर्मचाऱ्यावर गैरवर्तनाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन, सेवेतून कमी केलेले आहे अशा कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देय्य होणार नाही.

(०३) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१३ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ या कालावधीत संस्थानला कंत्राटी पध्दतीने कामगार पुरविणेसाठी नेमलेल्या लेबर व सुरक्षा कंत्राटदारामार्फत कामास असलेल्या सर्व कंत्राटी कुशल, अकुशल तसेच माजी सैनिक सुरक्षा रक्षकासह इतर सुरक्षा कर्मचारी यांना दिलेल्या एकूण वेतनाचे ८.३३ टक्के दराने होणारी सानुग्रह अनुदानाची रक्कम संबंधित कंत्राटी कामगार यांना कंत्राटादामार्फत आदा करता येईल.

तरी आता, सन २०१४-दिपावली उत्सवानिमित्त सानुग्रह अनुदानासाठी, उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे व संस्थान नियमाप्रमाणे पात्र ठरणाऱ्या स्थायी व अस्थायी संस्थान सेवकांना दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१३ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ अखेरच्या वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने होणारी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून आदा करणेस आणि याकामी लेखाशाखेकडील दिनांक २३ ऑगष्ट, २०१४ रोजीचे अहवालानुसार अंदाजे रक्कम रुपये ६,५०,००,०००/- मात्रचे (अक्षरी रुपये सहा कोटी पन्नास लाख मात्र) खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील कायम कर्मचाऱ्यांना सन- २०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास मंजुरी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये पी.आय.एल. १८/ २०११ सिव्हील अर्ज क्रमांक १३२८४/ २०१३ दाखल असून त्या अर्जावर अद्याप निर्णय झालेला नाही. मा.खंडपीठाने या सिव्हील अर्जावर दि.२५.१०.२०१३ रोजीचे आदेशान्वये, सन-२०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान तुर्तास देण्याविषयी अंतरीम आदेश केलेला आहे व जर का शासन धोरणानुसार असे अनुदान देता येणार नाही, असे मा.खंडपीठाचे मत झाले तर दिले गेलेले अनुदान संबंधीत कर्मचाऱ्यांच्या पगारामधून पुन्हा वसुल करुन घ्यावे, अशी अट घातली आहे.**

**त्यामुळे सन- २०१४ चे सानुग्रह अनुदान देण्यासाठी संस्थानला आर्थिक अडचण जरी नसली, तरी मागील वर्षीच्या सानुग्रह अनुदानाबाबत निर्णय अद्याप झालेला नाही व त्यावर मा.खंडपीठाचा अंतीम निर्णय होईपर्यंत चालु वर्षाचे सानुग्रह अनुदान देण्याविषयी समिती निर्णय घेऊ शकत नाही, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२१** **खुले नाट्यगृह व त्यासमोरील जागेत भजनाचे कार्यक्रमास परवानगीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.ए.एन.रेड्डी, हैद्राबाद यांनी आपले कडील १५/०७/२०१४ रोजीचे अर्जान्वये कळविले आहे की "आम्ही गेल्या ७ ते ८ वर्षे दरवर्षी डिसेंबर महिन्यात संस्थान मंदिर परिसरातील लेंडीबागेत भजनाचा कार्यक्रम करीत असतो. संस्थानकडून आम्हांला दरवर्षी याकामी परवानगी दिली जाते. त्याबद्दल आम्ही आपले अत्यंत आभारी आहोत. संस्थानने मागील ४ वर्षापासून आम्हाला व्दारकामाई समोरील खुले नाटयगृहाजवळची जागा आम्हाला भजनासाठी दिली होती. त्याप्रमाणेच चालूवर्षीही डिसेंबर महिन्यात २४ तारखेपासून ३१ तारखेपर्यंत

मागीलवर्षीच्याच जागेवर भजन करण्याची परवानगी मिळावी ही नम्र विनंती. तसेच याकामी संस्थानकडून साऊंड सिस्टीम, इलेक्ट्रीक कनेक्शन, मंडप व साईभक्तनिवासस्थानामध्ये साधारण ४०० साईभक्तांसाठी खोल्या, त्यांना जेवण तयार करण्यासाठी मागील वर्षीप्रमाणे जागा मिळावी ही विनंती."

दि.१०/०१/२००८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१० खालीलप्रमाणे झालेला आहे.

दि.२८/०७/२००७ सभेत निर्णय क्र.५७४ अन्वये साईभक्त ए.एन.रेड्डी, चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर, ए.एम.आर कन्स्ट्रक्शन लि. हैद्राबाद यांना श्री चे सिंहासनासाठी व श्री च्या मुर्तीच्या पाठीमागील भिंतीवर जे चांदी काम केलेले आहेत. त्यासाठी सर्व काम सोन्यामध्ये तयार करुन देणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार श्री रेड्डी यांनी सुमारे ११ कोटी खर्च करुन ९६ किलो वजनाचे श्री चे सिंहासन व श्री च्या मुर्तीच्या पाठीमागील भिंतीवरची प्रभावळ इ. (भितींवर जे चांदी काम केलेले आहे त्याठिकाणी) सर्व काम सोन्यामध्ये करुन दिलेले आहे.

तसेच त्यांच्या कुटुंबियातील व्यक्ती शिर्डीस येतील. त्या त्या वेळेस त्यांना प्रत्येकी जास्तीत जास्त १० कुटुंबियासमवेत तहयात आरती व दर्शन व्यवस्था विनामुल्य करण्यात यावी. तसेच दि. २० डिसेंबर ते ३१ डिसेबर पर्यत त्यांचे मार्फत लेडीबागेत आयोजित करण्यात येणाऱ्या नाम सप्ताहास कायम स्वरुपी मान्यता देण्यात यावी. अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

त्यानुसार ए.एन.रेड्डी यांना सन २००७ पासून ते २००९ पर्यत लेडीबागेजवळ असलेल्या मोकळया जागेत भजन करण्यास परवानगी देण्यात आली होती. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० च्या सभेत निर्णय क्र.३१५ नुसार "श्री. ए.एन.रेड्डी, हैद्राबाद यांचेसह कोणासही मंदिर परिसरात तसेच लेडीबागेत भजन व अन्य कार्यक्रमासाठी परवानगी देण्यात येवू नये. असे ठरले आहे. त्यानंतर सन २०१० पासून ते २०१३ पर्यत लेडीबाग ऐवजी खुले नाटयगृहा समोरील जागेत भजन करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

| अ.नं | मागणीचा तपशिल | कार्यालयीन अभिप्राय |
|---|---|---|
| १ | दिनांक २४/१२/२०१४ ते ३१/१२/२०१४ या कालावधीत खुले नाटयगृह व त्यासमोरची जागा मिळावी. | विशेष देणगीदार साईभक्त असलेने मागील वर्षाप्रमाणे सदर जागेवर भजनास परवानगी देता येईल. |
| २ | इलेक्ट्रीक कनेक्शन, साऊंड सिस्टीम संस्थानकडून मिळावी | वीज वापर ५ केव्हीपेक्षा जास्त असेल तर वीज पुरवठयाची व्यवस्था सबंधीत अयोजकांनी स्वतः करावयाची आहे. जर वीज वापर ५ केव्हीपेक्षा कमी असेल तर आयोजकाकडून डिपॉझिट म्हणून रक्कम रु.३०००/- भरुन घेणे. मिटरप्रमाणे (महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या चालू आकारानुसार) वापरलेले वीजेचे बील देऊन डिपॉझिट मधून या बीलाची रक्कम वजा करुन घेऊन राहिलेली रक्कम त्यांना परत दयावी. |
| ३ | साईभक्त निवासस्थान मध्ये साधारणतः ४०० साईभक्तांसाठी खोल्या व त्यांना जेवण तयार करण्यासाठी जागा मिळावी. | या कालावधीत गर्दी जास्त असल्याने तसेच काही खोल्यांचे आरक्षण ऑन लाईन होत असलेने उपलब्धते नूसार खोल्या सशुल्क देता येतील. खोल्या उपलब्ध नसल्यास त्यांची निवासाची व्यवस्था आयोजकांना करावी लागेल. तसेच जेवण करणेसाठी जागा उपलब्ध नसलेने त्यांनी इतरत्र जेवण तयार करणेसाठी व्यवस्था करावी. |

तरी श्री.रेड्डी यांना दिनांक २४/१२/२०१४ ते ३१/१२/२०१४ या कालावधीत खुले नाटयगृह व त्यासमोरील जागेत भजन करण्यास परवानगी दयावी किवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, खुल्या नाटयगृहाच्या जागेबाबत संपुर्ण माहितीची टिपणी संबंधीत विभागांकडून मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे सादर करणेत यावी, तोपर्यंत सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी/ सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.२२ श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव- २०१४ साजरा करणेस व त्यास येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २०१४ मधील कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे. राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून

संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील.

२१(१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरांतील धर्मिक विधी ,पुजा-अर्चा समारंभ व उत्सव अयोजित करणे व पार पाडणे. अशी तरतूद आहे.

त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात. सालाबाद प्रमाणे यावर्षी **श्री साईबाबांचा ९६ वा पुण्यतिथी उत्सव गुरुवार दि.२/१०/२०१४ ते शनिवार दि.४/१०/२०१४ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.**

या उत्सवासाठी पुढील प्रमाणे तयारी करावी लागणार आहे. उत्सवासाठी करावयाच्या कामाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशील | उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे |
|---|---|---|
| १ | उत्सव निमंत्रण पत्रिका व प्रसाद | संस्थान व्यवस्थापना मार्फत पूर्वापार चालत आलेल्या प्रथेप्रमाणे भक्तमंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद पाठवावा लागतो. यंदाचे श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १७९००० निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतील.<br>तसेच नेहमीप्रमाणे निमंत्रण पत्रिका व उत्सवासंबधीत माहिती प्रेस नोट (न्यूज ॲटम) म्हणून वर्तमान पत्रातून जनसंर्पक कार्यालया मार्फत प्रसिध्दी देण्यात येईल. |
| २ | उत्सव व्यवस्था | **अ) कलाकार कार्यक्रम** |
| | गुरुवार दि.२/१०/२०१४ ( प्रारंभ दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर |
| | शुक्रवार दि.३/१०/२०१४ ( मुख्य दिवस) | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर.)<br>२) रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० पर्यंत कलाकारांची सेवा हजेरी कार्यक्रम.<br>या मुख्य दिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | शनिवार दि.४/१०/२०१४ ( सांगता दिवस) | सायंकाळी ०७.३० ते ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर) |
| | | **ब) कीर्तन कार्यक्रम** |
| | गुरुवार दि.२/१०/२०१४ ते शनिवार दि.४/१०/२०१४ या कालावधीत नेहमीच्या वेळेप्रमाणे किर्तन कार्यक्रम होतील. | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवासाठी तीन दिवस कीर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. कीर्तनकार निश्चीती करावयाची आहे. |
| | | **क) विविध पुजा व आराधना विधी** |
| | गुरुवार दि.२/१०/२०१४ ते शनिवार दि.४/१०/२०१४ | भिक्षा झोळी मिरवणूक, त्यात सदस्यांचा सहभाग, पालखी व रथ मिरवणूक, आराधना विधी, विणा, व पोथी त्यातील सदस्यांचा सहभाग, सिमोल्लंघन, इ. कार्यक्रम नेहमीचे प्रथेप्रमाणे करण्यात येतील. (आराधना विधी बाबत विशेष टिपणी शेवटी नमूद केली आहे.) |
| ३ | श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण) पूजा व अभिषेक पूजा | उत्सवकाळात गुरुवार दि.२/१०/२०१४ ते शनिवार दि.४/१०/२०१४ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा बंद राहतील. |
| ४ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दिनांक २/१०/२०१४ रोजी सकाळी ०५.१५ वाजता श्री |

| | | |
|---|---|---|
| | | द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक ३/१०/२०१४ रोजी सकाळी ०५.०० वाजता पारायण समाप्ती होईल. मा.त्रिसदस्य समितीचे ३ सदस्य पहिले तीन अध्याय वाचतील व राहिलेले ५० अध्याय प्रत्येकी एक असे ५० साईभक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक १/१०/२०१४ रोजी अनाऊंसमेंट सेंटर मधील मंदिर कर्मचा-याकडे नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता त्रिसदस्य समितीचे सदस्य उपस्थीत राहातील. तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन २०१४ मध्ये पोथी, विणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा इ.भाग घेतलेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सदस्याचे नावाचा तक्ताही सोबत जोडलेला आहे. |
| ५ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी दिनांक २/१०/२०१४ रोजी श्रींचे पालखीची गांवातून रात्रौ ९.१५ वाजता मिरवणूक होईल, दि.३/१०/२०१४ रोजी रात्रौ ०९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| ६ | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| ७ | गावजेवण | उत्सवाचे सांगता दिनी नेहमीप्रमाणे गावजेवण देण्यात येईल. |
| ८ | प्रसाद - भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये १०/- या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.त्रिसदस्यीय समितीचे सदस्यांचे कुटुंबिय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्ती , निमंत्रीत कलाकर, पोलीस कर्मचारी, उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजनाची व्यवस्था स्वतंत्र केली जाईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन दिले होते, त्यानुसार श्री पुण्यतीथी उत्सवात येणा-या पालखीधारकांना एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन द्यावयाचे आहे.<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सन २०१४ तिनही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ म्हणून बुंदी ठेवण्यात आली होती.<br>या उत्सवामध्ये तीनही दिवसात मिष्टांन्न म्हणून बुंदी देता येईल. |

| | | |
|---|---|---|
| ९ | विद्युत रोषणाई | समाधी मंदिर, द्वारकामाई , चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री पुण्यतिथी उत्सवात व्दारकामाई मंडळ,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्ट्याची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| १० | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ११ | लेखाशाखा | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने विहीत पध्दतीने जाहिर लिलावाने विक्री करण्यात येईल. |
| १२ | बांधकाम | उत्सव कालावधीत समाधी मंदीर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप /शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ.व्यवस्था करावयाची आहे. |
| १३ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी कामगार अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |
| १४ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईआश्रम नं. १ व २, द्वारावती, भक्तनिवासस्थान, इ. इमारती मधून पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. |
| १५ | रुग्णालय व्यवस्था | संस्थानमार्फत दोन ठिकाणी चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील.तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात येईल. |
| १६ | पालखी व्यवस्था | श्री पुण्यतीथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था साईआश्रम २ मध्ये करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. दोन-तीन वर्षापासून पालखीधारकांतील पदयात्रींना संस्थान मार्फत शिर्डी येथे आलेवर एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येत आहे. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येईल. |
| १७ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १८ | खर्चाचे अंदाज पत्रक | श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव -२०१३ मध्ये अंदाजपत्रकीय रु.५५२००००/- (रु.पचावन्न लाख वीस हजार) इतक्या रकमेस मंजूरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये ३८४४५८८/- (रु.अडवतीस लाख चौवेचाळीस हजार पाचशे अठ्ठयांशी ) इतका खर्च झाला होता.श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव २०१४ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ५३,८२,०००/- (अक्षरी रु त्रेपन्न लाख ब्यांऐशी हजार) मंजूरीसाठी सादर केलेले आहे. अंदाजपत्रकाचा तपशिलवार माहिती तक्ता सोबत माहिती करीता जोडला आहे. |

आराधना विधी बाबत टिपणी- मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९४.

"आराधना विधी समाधी मंदिराच्या पहिल्या माळयावर आहे त्याच ठिकाणी करण्यात यावा, सदरहु आराधना विधीचे थेट प्रक्षेपण (Live Telecast ) टिव्हीवर व इतर माध्यमांना करणेत यावे, यामुळे मंदिर परिसरातील दूरचित्रवाणीच्या संचावर व संपूर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल. समाधी मंदिर (बुटी वाडयास १०० वर्षे झाल्याने जुनी वास्तू झाली आहे त्यामुळे गावकरी व इतर यांची वर्दळ वरती बंद करून लाईव्ह दर्शन देणेत यावे आराधना विधीकरीता जे यजमान (पतिपत्नी ) असतात ते व मंदिरातील ब्राम्हण व सुवासिनींना ( त्यांच्या पत्नी ) यांची प्रसाद भोजनाची व्यवस्था मंदिराचे पहिल्या माळयावर हॉल येथे करणेत यावी, त्यांचे शिवाय इतरांना समाधी मंदिर हॉलवर प्रवेश नसावा. ते भोजन यजमान, ब्राम्हण सुवासिनीना दिले जाते तेच शाही भोजन गावकरी व मान्यवर यांना श्रीसाई प्रसादालयाच्या व्ही.आय.पी.हॉलच्या बाजुला असलेल्या दोन हॉलमध्ये ठरावीक वेळेत देणेत यावे - व्यवस्था करण्यात यावी. या दिवशी साईभक्त व गावकऱ्यांसाठी श्रीसाई प्रसादालयामध्ये उत्सवाचे नेहमीचे प्रसाद भोजन संस्थानतर्फे मोफत देण्यात यावे. "

तरी श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव -२०१४ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ५३,८२,०००/- (रु.त्रेपन्न लाख ब्यांऐशी हजार ) चे खर्चास मान्यता असावी.

अवलोकनार्थ व निर्णयार्थ सविनय सादर,

**निर्णय क्र.६९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सालाबादप्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव- २०१४ साजरा करणेकामी प्रस्तावित कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.५३,८२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५/ विधी अधिकारी )

---

**विषय नं.२३** **देणगी स्वरुपात उदीप्रसाद पाकिटे पॅकिंग मशिन स्वीकारणे बाबत.**

**प्रस्ताव-** प्रशासन शाखेतील कार्यासन नं.८ (भक्तमंडळ सभासद कक्ष) कडून उदीची तसेच प्रसादाची (सुंठ साखरेची) पाकिटे प्लास्टीक पेपर रोल वापरुन सिलबंद करुन साईभक्तांना पाठविलेले जातात, दिले जातात. अशा भक्तांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | देणगी कॅश काऊंटरवर देणगी देणा-या भक्तांना | १०००० प्रति दिन |
| २ | मनिऑर्डरव्दारे देणगीदार साईभक्त | १५०० प्रति दिन |
| ३ | चेक, डि.डि.देणगीदार साईभक्त | ३०० प्रति दिन |
| ४ | ऑनलाईन बँक ट्रान्सफर इ. | ८०० प्रति दिन |
| ५ | प्रतिवर्षी ३ वेळेस होणारा उत्सवाचा उदीप्रसाद भक्तमंडळ सभासदांना श्री रामनवमी, श्री.गुरुपौर्णिमा, श्री.पुण्यतिथी उत्सव | १७५००० प्रति उत्सव |

अ.नं.५ मध्ये नुमद केलेल्या उत्सवापुर्वी साधारणपणे दोन महिन अगोदर उदिप्रसाद पाकिटे तयार करणेस सुरुवात केली जाते. तसेच अ.नं.२,३,४, मध्ये नमुद केलेल्या देणगीदार भक्तांना उदीप्रसाद नियमितपणे पाठविणे आवश्यक असते.

सदर उदीप्रसाद मिळणेकामी देणगीदार भक्तांकडून पत्रव्यवहार होत असतो. दिवसेंदिवस देणगीदारांची संख्या लक्षणीय प्रमाणात वाढत असलेने उदीप्रसाद पाकिटे तयार करणेवर मर्यादा येत आहे. सध्यास्थितीत विभागाकडे दोन मशिन आहे. दररोज अंदाजे सरासरी १४ ते १५ हजार उदीप्रसाद पाकिटे तयार केली जातात. देणगीदार व साईभक्त सभासदांना लागणारे उदीप्रसाद पाकिटे, तयार होणारे पाकिटे, हे वाढती मागणी लक्षात घेता आणखी एक मशिन विभागाकडे जादा असणे आवश्यक आहे. विभागाकडे एक उदी व एक प्रसाद (सुंठ, साखर) असे दोन मशिन आहे. हे मशिन चालविण्याकरीता मर्यादा आहे. मशिन असल्याने पार्ट खराब होण, प्लास्टीक रोल अडकणे ,गरम होणे, इ.काहीअडचणीमुळे मशिन काही वेळेस बंद ठेवावे लागते. पर्यायाने उदीप्रसाद पाकिटे कमी तयार होतात. पर्यायाने भक्तांना पावत्या व उदीप्रसाद पाठविण्यास विलंब होतो व उदीप्रसाद न मिळाल्यास पत्रव्यवहार वाढतो.

सन २०१५ मध्ये नाशिक येथे होणारा कुंभमेळा व सन २०१८ श्री साईबाबांच्या समाधी शताब्दी सोहळा याकरीता येणा-या साईभक्तांची गर्दी लक्षात घेता विभागाकडे एक जादा उदीप्रसाद पॅकिंग मशिनची आवश्यकता आहे. असे नम्र मत आहे.

साईभक्त श्री.सुशील मंशारमाणी व्दारा, अशिष एन्टरप्राईजेस ४८ ब, सनवर रोड, इंडस्ट्रीयल एरिया, इंदौर, फोन नं.०८८२६०४८६०० यांनी दि.२४/१०/२००९ रोजी श्री साईबाबा संस्थान ट्रस्टला उदीप्रसाद, पाकिटे पॅकिंग करण्याचे एक मशिन रक्कम रुपये ३८,०००/- (पावती नं.२७६८२ दि.२१/१२/२००९) व दुसरे मशिन रुपये ५१,०००/- (पावती नं.३९६५० दि.२८/०३/२०१०) देणगी दिलेले आहे. सदर मशिनच्या साहयाने उदीप्रसाद पाकिटाचे पॅकिंग

उत्तम प्रकारे होत आहे. सदर साईभक्तांनी दि.१२/०६/२०१४ रोजी पत्राने आणखी एक मशिन देणगी रुपाने इच्छा कळविली आहे.( सोबत सदरचे पत्र अवलोकनार्थ सादर केले आहे.)

सन २०१५ मध्ये नाशिक येथे होणारा कुंभमेळा व सन २०१८ श्री साईबाबांच्या समाधी शताब्दी सोहळा व भक्तांची वाढती संभाव्य गर्दी पाहता उदीप्रसाद पॅकिंग मशिन संस्थानला आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रमाणे देणगी स्वरुपात मिळणारे उदीप्रसाद पॅकिंग मशिन स्विकारणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०८ )

---

**विषय नं.२४ पुजारी सोवळे, वस्त्र व इतर कापड देणगी स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** सालाबादप्रमाणे गुरुवार, दि.०२/१०/२०१४ ते शनिवार, दि.०४/१०/२०१४ अखेर तीन दिवसाचे कालावधीत श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने श्रीसाईबाबांची ९६वी पुण्यतिथी साजरी करण्यांत येणार आहे.

प्रति वर्षी उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिरातील पुजारी यांना सोवळे-उपरणे, चोपदार कर्मचारी यांना चोपदार गणवेष, तसेच निमंत्रित ब्राह्मण व ब्राह्मण-सुवासिनी यांना मा.अध्यक्ष साहेब यांचे शुभहस्ते वस्त्रदान केली जातात.

साईभक्त श्री रमेश जी. सहेता, रा.वर्सोवा, मुंबई हे बरेच दिवसांपासून पुण्यतिथी उत्सवाचे निमित्त लागणारे सोवळे, चोपदार गणवेष (शिवणावळसहीत), साडया, धोतरपान, शॉल व इतर अनुषंगिक साहित्य देणगी दाखल देतात व त्या वस्त्रांची देगणी पावती करण्यांत येते.

आराधनाविधीसाठी लागणाऱ्या खर्चाची तत्वतः मान्यता घेतली जाते. परंतू, एखादा साईभक्त देगणी स्वरुपात सदर साहित्य देत असेल तर त्याबाबतही मान्यता घेतली जाते. श्री.रमेश जी. सहेता, रा.मुंबई यांनी दि.०३/०६/२०१४ रोजीच्या लेखी अर्जाने वस्त्र व इतर साहित्य देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केलेली आहे.

तरी प्रतिवर्षाप्रमाणे श्रींचे पुण्यतिथी उत्सवाकरीता साईभक्त श्री रमेश जी. सहेता, रा.वर्सोवा, मुंबई यांचेकडून पुजारी सोवळे, चोपदार ड्रेस, वस्त्र व इतर साहित्य देगणी दाखल स्विकारणेस मान्यता असावी, ही विनंती. देणगी दाखल वस्तूंची देणगी पावती करणेत येईल. त्यासाठी सोबत जोडल्याप्रमाणे अंदाजे रक्कम रु.४,६५,३३०/- खर्च होईल व सदर खर्च श्री.रमेश जी. संहेता देणगी दाखल देणार असल्याने ते स्विकारणेस मान्यता असावी. तरी त्याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.७०० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.२५ मंदिर परिसर, व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान व साईआश्रम-०१ साठी सीसीटीव्ही कॅमेऱ्या संदर्भात नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुसार मंदिर परिसर, द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान व साईआश्रम-१ विभागासाठी आवश्यकतेनुसार कॅमेरे बसविणेचे नियोजन करण्यात आलेले होते. परंतु सदर कॅमेरे बसविताना सोनी कंपनीचे Lens व लॉजिक बोर्ड बसविणेबाबत specification बनविण्यात आलेले आहे. सदरच्या प्रस्तावात Brand-sony शब्दाचे ऐवजी सोनी कंपनीचे कॅमेरे व Lens असे नमुद करणे अपेक्षित आहे. यासाठी Panasonic, Axis, MX, Vantage, CP-Plus Honey-Well, Bosch या कंपनीचे Brand चे प्रस्ताव निवीदेत मागविण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे, Brand-sony ऐवजी सोनी कंपनीचे 4mm Lens व Logic bord व वरिल उत्पादित कंपन्यांच्या Brand ची नोंद घेणेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे सभेसमोर सदरचा विषय सविनय सादर.

**निर्णय क्र.७०१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख)

---

**विषय नं.२६ श्री साईबाबांची मुर्ती देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री ए. राजेश, हैद्राबाद यांनी दि.१३.१२.२०१३ रोजी शिर्डी येथे भेट दिली असता. तत्कालीन मा.श्री. अजय मोरे, कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन श्री साईबाबांची आकर्षीत स्वरुपात दगडावर बसलेले श्री साईबाबांची मुर्ती बनविलेली आहे.सदर मुर्ती त्यांना देणगी स्वरुपात संस्थानला द्यावयाची आहे. सदर मुर्ती ठेवण्यासाठी काचेची पेटी तयार केली आहे.

संस्थानमार्फत आजपावेतो देणगी स्वरुपात श्री साईबाबांची मुर्ती स्वीकार करण्यात आलेल्या नाहीत.

संस्थानला आवश्यकता भासल्यास मुर्ती तयार करुन घेण्यात आल्या आहेत. समाधी मंदिरातील श्री साईंची मुर्ती कै.बाळाजी वसंतराव तालीम , मुंबई यांचेकडून सन १९५४ मध्ये तयार करुन घेण्यात आली होती. तसेच नवीन प्रसादालय परिसरातील श्री साईबाबा प्रसाद (भोजन) तयार करीत असल्याचे शिल्प श्री प्रमोद कांबळे, अहमदनगर यांचेकडून तयार करुन घेण्यात आले आहे.

१) संस्थानला रोख रक्कम अथवा वस्तुरुपाने मिळणारी देणगी घ्यावी लागते. नकार देता येत नाही, आवश्यक असलेस वस्तुंचा वापर करण्यात येतो किंवा गरज नसल्यास त्यांची कापडकोठी व्दारे भक्तांना विक्री करण्यात येते.

२) देणगी स्वरुपात प्राप्त होणारी मुर्तीचे पवित्र्य राखणेकामी संस्थानमध्ये कोठे स्थापना करता येईल. (उदा.साई अश्राम १ व २ किंवा नियोजीत साई गार्डन)

३) पत्रासोबत प्राप्त झालेला फोटोचा नमुना पाहिला असता श्री साईंचा चेहरा काल्पनीक वाटतो.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

**तसेच, यापुढे बाहेरील कोणतीही व्यक्ती/ संस्था किंवा अन्य कोणी श्री साईबाबांची कोणतीही मुर्ती अथवा फोटो देणगी स्वरुपात देवू इच्छित असल्यास वा त्यांचेकडून विकत घेण्याची विनंती करत असल्यास अशी कुठलीही परवानगी समिती देणार नाही. तेव्हा अशा मुती/ फोटो स्वीकारणेबाबत अर्ज आल्यास तात्काळ उलटटपाली नकार देण्यात यावा व असा प्रस्ताव समितीसमोर आणणेत येऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.२७ श्री साईसच्चरीत- मराठी पोथीचा कन्नड भाषेत अनुवाद प्रकाशित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मधील १७ (२) (ठ) मधे खालीलप्रमाणे तरतूद आहे.

श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

यानुसार संस्थानद्वारा १६ भाषांमध्ये श्री साईचरित्र व इतर संस्थान प्रकाशने विक्रीस उपलब्ध आहेत.

डॉ.आर सितालक्ष्मी, म्हैसुर यांनी दि.०२.०७.२०१४ चे पत्रान्वये श्री साईसच्चरित- मराठी पोथीचा कन्नड भाषेत अनुवाद तयार करुन कन्नड साईसच्चरित पोथी तयार केली आहे. सदर पोथी संस्थानने प्रकाशित करावी अशी इच्छा त्यांनी प्रदर्शीत केली आहे. त्याकामी पुस्तकाचे सर्वाधिकार ते संस्थानला विनामुल्य देणार आहेत.

उपरोक्त सन २००४ चे महाराष्ट्र अधिनियमातील तरतूदीनुसार अधिकाधिक भाषेत बाबांच्या मुळ साईचरित्राचा इतर भाषेत अनुवाद झाल्यास इतर भाषिकांना त्याचा लाभ होईल.

संस्थानमार्फत श्री साईचरित्र कथारुपाने (स्टोरी) पद्धतीने कन्नड भाषेत प्रकाशित करण्यात आलेले आहे. परंतु श्री साईसच्चरित ओवी टु ओवी कन्नड भाषेत प्रकाशीत झालेले नाही. सदरचे चरित्र कन्नड भाषेत प्रकाशित केल्यास कन्नड भाषिक भक्तांना पारायण करणेकामी उपयोग होऊ शकेल व श्री साईबाबांचे जीवन कार्याचा प्रचार- प्रसार सर्व भाषेत व्हावा म्हणून त्यांनी प्रस्तावित केलेप्रमाणे श्री साईसच्चरित मराठी पोथीचा कन्नड भाषेत अनुवाद करणेस मान्यता देणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

तथापि संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तक प्रकाशनापूर्वी, केलेला अनुवाद मुळ पुस्तकाबरहूकूम असलेबाबत व अनुवाद करतांना त्याचे अर्थात कोणताही बदल केला नसल्याबाबत पुणे अथवा कन्नड भाषीक विद्यापीठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत त्यांना सांगता येईल सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतरच पुस्तकाचे संस्थानद्वारा प्रकाशन करणेबाबत कार्यवाही करणेत येईल.

सबब श्री आर सितालक्ष्मी, म्हैसुर यांना श्री साईसच्चरित मराठी पोथीचा कन्नड भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणेकामी तसेच संस्थानचे नियमाप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता पूर्ण केलेनंतर त्याचे संस्थानद्वारा प्रकाशन करणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास प्राथमिक मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याबाबत सर्व सोपस्कार पुर्ण झाल्यानंतर सदरहू प्रस्ताव अंतीम मान्यतेसाठी पुन्हा समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.२८ संस्थान प्रकाशित प्रकाशनांवर श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीचे कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७(२)ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

श्रीसाईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणिश्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील

उपरोक्त तरतुदीनुसार प.पू. श्री साईबाबांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबत प्रचार-प्रसार होणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत संस्थान प्रकाशीत साईचरित्रे,पुस्तके,श्री साईलिला अंक फोटो,व ऑडिओ/ व्हिडीया सीडी चे पुनरमुद्रण करुन साईभक्तांना माफक किंमतीने विक्री केली जाते.

श्री साईबाबांचे समाधीस २०१८ या वर्षामध्ये १०० वर्ष होत असल्याने संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ मध्ये साजरा होणार आहे त्या दृष्टीने साईभक्तांना शताब्दी महोत्सवाबाबत महिती होणेकामी संस्थान प्रकाशीत प्रकाशनांवर लोगोचे खालील बाजूस पुस्तकाचे दर्शनी भागास दिसेल अशा ठिकाणी श्री साईबाबा महासमाधी शताबदी महोत्सव २०१७-२०१८ अशा प्रकारचा मजकुर चार रंगात कव्हरवर वरील बाजुस मराठी भाषेतील प्रकाशनांवर मराठी भाषेत व इतर भाषेतील प्रकाशनांवर इंग्रजी भाषेत छपाई करता येईल.

सदर मजकूर प्रकाशनांवर छपाई केल्यास श्री साईबाबांच्या महासमाधी शताब्दी महोत्सवासंबंधी माहिती सर्व देश, विदेशापर्यंत पोहेचेल व सन २०१७ पासुन महासमाधी शताब्दी महोत्सव सुरु होणार असल्याने साईभक्तांचा वर्षभर गर्दीचा ओघ चालू राहील.

तरी संस्थान प्रकाशीत प्रकाशनांवर श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ अशा प्रकारचा मजकूर चार रंगात कव्हरवर वरील बाजूस कोप-यात मराठी भाषेतील प्रकाशनांवर मराठी भाषेत व इतर भाषेतील प्रकाशनांवर इंग्रजी भाषेत छपाई करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.७०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.२९ सन २०१४-१५ (ऑक्टोबर- १४ ते मार्च-१५ अखेर) प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी वार्षीक किरणा माल व इतर खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी सन २०१४-१५ करिता आवश्यक किराणा माल व त्यानुषंगिक इतर माल (पेपर पिशवी, दुध, पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर इ.) तसेच भाजीपाला खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.७८,७५,००,०००/- मात्रचे खर्चास मा.व्य.समितीचे दि.१३.१२.२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र.९६७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदरचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे खर्चास मान्यता घेणेकामी सादर केला असता, त्यांनी दि.१३००३.२०१४ रोजीचे आदेशान्वये माहे एप्रिल २०१४ ते सप्टेंबर २०१४ अखेर सहा महिन्यांकरिता किराणा माल खरेदीकामी रक्कम रु.३५ कोटी मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशास अधीन राहून सन २०१४-१५ चे प्रथम सहामाही करिता (एप्रिल-२०१४ ते सप्टें-२०१४) करिता प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागाचे दैनंदिन वापरासाठी लागणारा किराणा माल खरेदीकामी मा.व्य.समितीचे दि.१२.०४.२०१४ चे सभेतील निर्णयाप्रमाणे न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेत आलेले

आहेत. सन २०१४-१५ चे प्रथम सहामाहीचे किराणा माल खरेदीची मुदत माहे सप्टेंबर-२०१४ अखेर संपणार आहे.

सन २०१४-१५ दुस-या सहामाही करिता (ऑक्टोबर २०१४ ते मार्च २०१५) चे किराणा माल खरेदीचा प्रस्ताव विधी विभागामार्फत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्येतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास अद्याप मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळालेली नाही. मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळालेनंतर वर्तमानपत्रात जाहिरात देणे, ई-निविदा प्रक्रिया राबविणे, नमुने निवडणे, तांत्रिक लिफाफे उघडणे, मुळ निविदा उघडणे, पुरवठा आदेश देणे या सर्व कार्यवाहीस अंदाजे २ महिन्यांचा कालावधी लागणे अपेक्षित आहे. अर्थातच पुढील सहामाही करिता किराणा माल खरेदीचे पुरवठा आदेश देणेस साधरणतः नोव्हेंबर-२०१४ महिन्यातील पहिला किंवा दुसरा आठवडा उजाडण्याची शक्यता आहे.

माहे सप्टेंबर-२०१४ अखेर किराणा माल खरेदीची मुदत संपत असल्यामुळे व पुढील कालावधीतील किराणा माल खरेदीचे पुरवठा आदेश देणेस नोव्हें-२०१४ पर्यंत कालावधी अपेक्षित असल्यामुळे दरम्यानचे काळात किराणा मालाअभावी साईभक्तांना लाडूप्रसाद, भोजनप्रसाद, चहा, कॉफी इ.सेवा देण्यास अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**विभागाचा अभिप्राय –** सन २०१४-१५ द्वितीय सहामाही करिता (ऑक्टो-२०१४ ते मार्च-२०१५) चे किराणा माल खरेदीचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेसे आधीन राहुन किराणा माल खरेदीकामी प्राथमिक पुर्वतयारी करता येईल, असे नम्र मत आहे.

करिता माहे ऑक्टो-२०१४ ते मार्च-२०१५ अखेर खरेदी करावयाचे किराणा मालासाठीच्या निविदेचा मसुदा मान्यतेसाठी सादर केलेला असून, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, e-Tender मागणी करावी लागतील, त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल असे नम्र मत आहे.

| अ.नं. | तपशिल | कार्यवाही |
|---|---|---|
| ०१. | वर्तमानपत्रात निविदा जाहिरात प्रसिद्धी | दि.०६.०९.२०१४ |
| ०२. | वेबसाईटवर e-Tender प्रसिद्ध करण्याची दिनांक व वेळ | दि.०६.०९.२०१४ सकाळी ११.०० वा. पासून |
| ०३. | e-Tender डाऊनलोड करण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.२०.०९.२०१४ सायं.०५.०० वा. पावेतो |
| ०४. | निविदा (Technical Bid) व नमुने स्विकारण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.२०.०९.२०१४ सायं.०५.०० वा. पावेतो |
| ०५. | निविदा (Technical Bid) उघडण्याची दिनांक | दि.२२.०९.२०१४ सकाळी ११.०० वा. |
| ०६. | नमुने निवडण्याची दिनांक | दि.२४.०९.२०१४ सकाळी ११.०० वा. |
| ०७. | मुळ निविदा (Financial Bid) उघडणे | मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळालेनंतर मा.त्रिसदस्य समितीचे सभेत |

प्रस्तावित को-या निविदेची किमंत रु.१,०००/- अशी ठेवणेत येईल.

निविदेसोबत तांत्रिक लिफाफ्यामध्ये (Technical Bid) बयाणा रक्कम रु.३,००,०००/- (अक्षरी रु.तीन लाख मात्र) व निविदा किमंत रु.१,०००/- मात्रचा राष्ट्रीयकृत/आंतरराष्ट्रीय बँकेचा डी.डी., तसेच निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या कागदपत्रांच्या झोरॉक्स प्रती व किराणा मालाच्या नमुन्यांची मागणी दि.२०.०९.२०१४ अखेर करणेत येईल.

तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी माहे एप्रिल-२०१४ ते सप्टेंबर २०१४ अखेर किराणा माल खरेदीचे दि.१३.०३.२०१४ रोजीचे निर्णयामध्ये नमुद केलेल्या (Times of India, Indian Express, Hindustan Times, Navbharat Times, Hindustan Times (Marathi), Dainik Bhaskar (Hindi), Punjab Kesari and also other newspapers) वर्तमानपत्रात जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात प्रसिद्ध करता येईल. तसेच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिद्ध करता येईल.

तरी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची ऑक्टो-२०१४ ते मार्च-२०१५ चे किराणा माल खरेदीचा प्रस्तावास मान्यता मिळेपर्यंत त्यांचे निर्णयास अधीन राहुन, उपरोक्त नमुद केलेप्रमाणे किराणा माल खरेदीकामी प्राथमिक पुर्वतयारी करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्य.समिती समोर सादर केलेला आहे, त्यास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.खंडपीठाचे मान्यतेस अधीन राहून सन २०१४-१५ व्दितीय सहामाही करीता (ऑक्टो-२०१४ ते मार्च-२०१५) चे किराणामाल खरेदीकामी प्राथमिक पूर्वतयारी करणेस व याकामी जाहिरातीसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.३० सिलबंद केलेल्या महारतन गावरान तुपाची फेर जाहिर लिलावाव्दारे विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव- अधिनियम २००४ मधिल तरतूदः-** अधिनियम २१(१)(घ) साईभक्तांना जेवण पुरविणे व अनछत्र चालविणे.

**व्यवस्थापन समितीचा ठरावः-** १) मा.व्यवस्थापन समितीचे दि. १४.११.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९१०

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०१.

**प्रस्ताविकः-** उपरोक्त विषयांस व संदर्भास अनुसरुन कळविण्याचे की, दि.२८/०८/२०१२ रोजी मा.सहा. आयुक्त कार्यालय, अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचे कार्यालयाकडील अन सुरक्षाअधिकारी श्री. का.सु.शिंदे यांनी "महारतन" गावरान तुप बॅच नं.१२ चे ४२७ डबे एकुण ६,४०४.२ किलो किंमत रु.१३९१९५२.८७ व बॅच नं.१५ चे ९०४ डबे एकुण १३५५९.२ किलो किंमत रु २९४७०९२.१२ असे एकूण १३३१ डबे भांडार विभागात येवून सिलबंद केले आहेत सिलबंद केलेल्या एकूण डब्यांची किंमत रू.४३,३९,०४५/- इतकी आहे.

सदरच्या जप्त केलेल्या गावरान तुपासंदर्भात पुरवठादार मे.बाफना बाजार, नासिक यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद येथे अन व औषध प्रशासन कार्यालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर क्रिमिनल रिट पिटीशन नं.२९६/२०१३ दाखल केलेली होती. रिट पिटीशन नं.२९६/२०१३ संदर्भात दि.१२/०७/२०१३ रोजी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशानुसार, मा.सहा.आयुक्त, अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर यांनी " जप्त केलेल्या गावरान तुपाचा साठा अखाद्य असल्याने त्याचा वापर लिक्वीड सोफ तयार करणे इ. अखाद्य वापरासाठी करावयाचा आहे. याबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देवून लिलावाव्दारे सदरच्या जप्त केलेल्या गावरान तुपाची विक्री करण्यात यावी, विक्री केल्यानंतरची सर्व रक्कम मा.सहा.आयुक्त कार्यालय, अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचेकडे जमा करण्यात यावी" असे आदेशीत केले आहे.

उपरोक्तप्रमाणे झालेल्या आदेशानुसार श्री.का.सु.शिंदे, अन सुरक्षा अधिकारी, मा.सहा.आयुक्त कार्यालय, अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचे पयर्वेक्षणाखाली जनसंपर्क विभागामार्फत वर्तमान पत्रात जाहीरात देवून जप्त महारतन गावरान तुपाचे १३३१ डबे लिलावाव्दारे विक्री करणेस व सदरची रक्कम मा.सहा.आयुक्त कार्यालय, अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर यांचे कार्यालयात जमा करणेस मा.व्यवस्थापन समितीची दि.१४.११.२०१३ रोजीचे सभेत निर्णयार्थ टिपणी सादर करण्यात आली होती. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**निर्णय क्र.९१० :-** यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे जप्त केलेले महारतन गावरान तुपाच्या १३३१ डब्यांची लिलावाव्दारे विक्री करणेकामी मा.सहा.आयुक्त, अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचेकडून तारीख निश्चत करुन, त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये जाहीरात देण्यात येऊन मा.सहा.आयुक्त, अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचे प्रतिनिधींचे उपस्थतीत सदरच्या तुपाची जाहिर लिलावाव्दारे विक्री करणेत यावी. याकामी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच, उपरोक्त प्रमाणे जप्त केलेल्या महारतन गावरान तुपाच्या १३३१ डब्यांची लिलावाव्दारे विक्री केल्यानंतर सर्व रक्कम मा.सहा.आयुक्त, अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचेकडे डी.डी. व्दारेजमा करणेत यावी, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयाबाबत मा.सहा.आयुक्त, अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांना जा.नं.एसएसएसटी/भांडार/५०३५/२०१३ दि.३१/०१/२०१४ अन्वये अवगत

करण्यात आलेले आहे. तसेच वेळोवेळी त्यांचेशी संपर्क साधुन लिलावाचे प्रक्रिये संदर्भांत समक्ष तसेच दुरध्वनीव्दारे चर्चा करण्यात आलेली असुन झालेल्या चर्चेबाबत दि.३१/१२/२०१३ रोजीचे टिपणी सादर करण्यात आली आहे.

जप्त करण्यात आलेल्या या गावरान तुपाची किंमत मा.सहा.आयुक्त, अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचेकडे जमा करण्यात येणार असल्याने लिलावाव्दारे विक्री करणेपुर्वी जप्त केलेल्या गावरान तुपाचे किमान मुल्य निश्चित करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि. १२.०६.२०१४ रोजीचे सभेत निर्णयार्थ टिपणी सादर करण्यात आली होती, त्यावर खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

**निर्णय क्र.५०१ :-** यावर सविस्तर चर्चा होउन, प्रस्तावात नमुद केलेले सिलबंद/ जप्त महारतन गावरान तुप मुळ किमतीच्या २५ टक्के रक्कम कमी करुन, उर्वरीत शिल्लक रक्कम किमान मुल्य गृहीत धरण्यात यावे व त्याची लिलावाद्वारे विक्री करणेत यावी, असे ठरले.

सिलबंद/जप्त केलेल्या एकुण १,३३१ महारतन गावरान तुपाचे डब्यांची किंमत रु.४३,३९,०४५/- एवढी असुन, खरेदीची किंमत प्रति किलो रु. २१७.३५ वजा २५ टक्के रक्कम रु.५४.३३ उर्वरीत रक्कम रु. १६३.०२ पुर्णाकित रु. १६३.०० प्रति किलो किमान मुल्य निश्चीत करण्यात आले व दि.२७.०८.२०१४ रोजीची लिलावाची तारीख निश्चत करण्यात आली. याबाबत जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहीरात दि.२०.०८.२०१४ रोजीचे सामना (औरंगाबाद), दि.२१.०८.२०१४ रोजीचे प्रहार (मुंबई), पुण्यनगरी (पुणे) व दिव्या मराठी (नासिक) या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आली.

दि.२७.०८.२०१४ रोजी भांडार विभागाचे परिसरात दुपारी ०१.२० वा. गावरान तुपाची अखाद्य वापरासाठी लिलावाची प्रक्रीया मा. श्री का.सु. शिंदे, सहा.आयुक्त तथा अन सुरक्षा अधिकारी, मा. श्री भा.भी. भोसले, अन सुरक्षा अधिकारी अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर, मा.श्री अप्पासाहेब शिंदे-उपकार्यकारी अधिकारी यांचेसह सर्व प्रशासकीय अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व प्र.अधिक्षक-भांडार विभाग यांचे उपस्थितीत सुरु करण्यात आली. या लिलावप्रक्रीयेत १) श्री कांतीदेवजी परमार, सटाणा, २) न्यु इंडीया स्क्रॅप सेंटर, कोपरगाव, ३) हाजी प्लॅस्टीक सेंटर, कोपरगाव, ४) श्री रंगनाथ बारकु कानडे, कोपरगाव ५) श्री संतोष शिवाजी अंबोरे, कोपरगाव या पाच लिलावधारकांनी भाग घेतला. पाचही लिलावधारकांना अटी/शर्ती वाचुन दाखविल्या व समजुन सांगीतल्या. संस्थानने निश्चित केलेले गावरान तुपाची किंमत प्रतिकिलो १६३/- या दरानुसार लिलावप्रक्रीया सुरु करण्यात आली. तथापी निश्चत केलेल्या किंमतीस कोणाही लिलावधारकांनी प्रतिसाद न दिल्याने तसेच या किंमतीच्या पुढे कोणत्याही प्रकारच्या बोलीस नकार दिल्याने मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने सदरचा लिलाव स्थगीत करण्यात आला आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सिलबंद/ जप्त केलेल्या एकुन १,३३१ महारतन गावरान तुपाचे डब्याची (१९,९६३.४ कि/ग्रॅम) किंमत रु. ४३,३९,०४५/- एवढी आहे. सदर सिलबंद तुपाचे डबे भांडार विभागात दि.२८.०८.२०१२ पासुन म्हणजेच २४ महिन्यापासुन पडुन आहे. सदरचे तुपाचा साठा जास्त दिवस ठेवणे सुरक्षेच्या दृष्टीने योग्य नाही. लिक्वीड सोफ, साबन इत्यादीचे उत्पादक अखाद्य तेलाचा उपयोग करतात, त्याचा दर प्रतिकिलो अंदाजे रु.३० ते ३५ चे दरम्यान आहे. महारतन गावरान तुपाची खरेदी किंमत प्रति किलो रु.२१७.३५ इतकी आहे. या मुळ किंमतीच्या १५ टक्के रक्कम रु.३२.६० पुर्णांकित रु. ३३/- प्रति किलो किमान मुल्य गृहीत धरुन त्याची लिलावाद्वारे विक्री करता येईल, असे मत आहे. तसेच गावरान तुपाचे रिकाम्या डब्याची अभिलेख विभागाचे मंजुर दर रु. ३०/- प्रति डब्या प्रमाणे होणारी रक्कम लिलावधारकांकडुन स्वतंत्रपणे घेता येईल.

सिलबंद केलेल्या महारतन गावरान तुपाचे १,३३१ डब्यांची फेर जाहीर लिलावाद्वारे विक्री करणेकामी मा.सहा.आयुक्त, अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य अहमदनगर यांचेकडुन तारीख निश्चित करुन, त्याबाबत वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात येउन मा.सहा. आयुक्त, अन व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य अहमदनगर यांचे प्रतिनिधीचे उपस्थितीत सदरचे तुपाची फेर जाहीर लिलावाद्वारे विक्री करावी लागेल याकामी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता असावी.

निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.७०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, प्रस्तावित तुपाची फेर जाहिर लिलावाद्वारे विक्री करताना जी उच्चतम किंमत येईल, त्या किमतीस त्याची विक्री करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-प्र. अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं.३१ माहे सप्टेंबर, २०१४ अखेर गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे **सप्टेंबर, २०१४** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | ७/९/२०१४ | १७,७१,४४,८०६/- |
| २. | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | १८/९/२०१४ | २५,४६,४५,६५९/- |
| ३. | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | २७/९/२०१४ | ३६,४२,५८,२५४/- |
| ४. | दैनंदिन खर्च वजा जाता माहे **सप्टेंबर** २०१४ अखेर गुंतवणूकीसाठी उपल्बध होऊ शकणारी रक्कम- | | १०,००,००,०००/- |
| | | **एकूण रक्कम-** | ८९,६०,४८,७१९/- |

वरील तपशिलानुसार साधारणतः रक्कम रु.८९.६० कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणार आहेत.

प्रचलित कार्यपध्दतीनुसार उपलब्ध होणारी रक्कम उच्चतम व्याजदर देणा-या राष्ट्रीयीकृत बँकांकडे गुतविण्यात येते. त्यास अनुसरून सदर बँका संस्थानला चांगल्या बँकिेंग सेवा देतात. वैधानिक लखापरिक्षणात लेखापरिक्षकांनी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत /सेवा देणा-या बँकेकडेच उच्चतम व्याजदराने गुंतविण्यात यावी असे सुचविले आहे. त्यास अनुसरुन बँकिंग सेवा व आर्थिक फायद्याच्या दृष्टीने गुंतवणूकीसाठी वेळोवेळी उपलब्ध होणा-या रकमेची, खाली नमूद केलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांकडून व्याजदर मागवून जास्तीत जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे गुंतवणूक करता येईल.

१) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नाशिक
३) बँक ऑफ इंडिया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) देना बँक, शिर्डी
८) स्टेट बँक ऑफ इंडिया, शिर्डी
९) युको बँक, शिर्डी
१०) युनियन बँक ऑफ इंडिया, शिर्डी
११) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
१२) विजया बँक, शिर्डी
१३) इंडियन बँक, शिर्डी
१४) ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१५) स्टेट बँक ऑफ हेद्राबाद, शिर्डी

तरी वरील अ.क्र. १ ते १५ या बँकांकडून जसजशी गुंतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तपणे उपलब्ध होणारी रककम रु.89.60 कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.७०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १५ या स्थानिक, राष्ट्रीयीकृत व संस्थानला सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणाऱ्या रु.८९.६० कोटी मात्र रकमेची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३२ Trend Micro Anti Virus सॉफ्टवेअरचे नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुदः कलम १७ (१) नुसार

प्रास्ताविक: नेटवर्कमध्ये चालू असणाऱ्या संगणक प्रणालीला व्हायरसचा प्रादूर्भाव होऊ नये, तसेच साठविण्यात आलेली माहिती सुरक्षित राहावी, तसेच नेटवर्क पूर्ण क्षमतेने सतत कार्यान्वीत राहावे, यासाठी TREND MICRO ANTI VIRUS 100 युजर्ससाठी लागणारे सॉफ्टवेअर एक वर्षाचे कालावधीसाठी कार्यान्वित करण्यात आलेले होते. दिनांक १०/०९/२०१४ रोजी सदर ANTI VIRUS ची मुदत संपत असल्याने, सदर सॉफ्टवेअर सदर सॉफ्टवेअर नुतनिकरण करणेकामी Minitek Systems (India) Pvt. Ltd. Pune यांचे कडे चौकशी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर कळविले आहे. (Minitek Systems (India) Pvt. Ltd. यांचा दि.२७/०७/२०१४ रोजीचे ई-मेल पत्र.)

| Sr. No. | Description | Rate | Qty. | Amount | Taxes |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Trend Micro Worry Free Business Security Standard Renewal for 1 Year | 600 | 100 | 60000 | S.Tax Extra @ 12.36% |
| 02. | Trend Micro Worry Free Business Security Standard Renewal for 3 Year | 1200 | 100 | 120000 | S.Tax Extra @ 12.36% |

उपरोक्त दराचा अभ्यास करता TREND MICRO ANTI VIRUS Licence संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवून नुतनिकरण ३ वर्षासाठी केल्यास योग्य राहील असे, नम्र मत आहे

साईटेक प्रकल्पाअंतर्गत Old Data Migration चे काम शेवटच्या टप्प्यात होणार असून त्या अनुषंगिक जुन्या संगणकप्रणाली ह्या चालू राहाणार आहेत. तसेच विविध विभागातील कार्यालयीन कामासाठी वापरण्यात येणारे संगणके साईटेक प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित होईपर्यंत नविन नेटवर्कमध्ये तुर्त घेतली जाणार नाही. त्यामुळे सदर संगणकांना व्हायरसचा प्रादूर्भाव होऊ नये म्हणून, TREND MICRO ANTI VIRUS या प्रणालीचे स्वॉफ्टवेअर वरील दराचा अभ्यास करुन किमान तिन वर्षाचे कालावधीकरीता संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवून नुतनिकरण करण्यात यावे, असे नम्र मत आहे.

तसेच नविन संगणके, युपीएस व सॉफ्टवेअर घेणेस १.२५ कोटीचे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे सादर करण्यात आला असुन यास बराचसा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे VIRUS प्रदुर्भाव होऊ नये यासाठी किमान ३ वर्षाकरीता TREND MICRO ANTI VIRUS कार्यप्रणालीचे संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवून नुतनिकरण करणे आवश्यक आहे.

मागणी: TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअरचे १०० युजर्सची क्षमता असलेले स्वॉफ्टवेअरची मुदत दिनांक १०/०९/२०१४ रोजी संपत असल्याने त्याचे नुतनिकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. पुढील तिन वर्षाचे कालावधीसाठी संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवून नुतनिकरण करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,२०,०००/- + टॅक्स चे खर्चास मा.व्यवस्थापन समीतीचे सभेत मान्यता मिळावी, असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान : आर्थिक व तांत्रिक

विभागाचा अभिप्राय / सष्ट मत : TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअरचे १०० युजर्सची क्षमता असलेले स्वॉफ्टवेअरची मुदत दिनांक १०/०९/२०१४ रोजी संपत असल्याने सदर सॉफ्टवेअरचे Installation केलेपासुन पासुन पुढील तिन वर्षाचे कालावधीसाठी संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवून नुतनिकरण करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,२०,०००/- + टॅक्स इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास मान्यतेसाठी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.७०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, Trend Micro Anti Virus सॉफ्टवेअरचे तीन वर्षाकरीता नुतनीकरण करणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,२०,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख )

---

**विषय नं.३३ संस्थानचे नियोजित प्रकल्प अंतर्गत सिव्हील वर्कचे ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रा.लि., हैद्राबाद यांचेकडून उर्वरित दंडाची रक्कम वसुल करणेकामी कायदेशीर कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१२/११/२०१३ रोजीचे पत्रान्वये संस्थानचे नियोजित साईगार्डन प्रकल्पांतर्गत करावयाचे सिव्हिल वर्कचे ठेकेदार के.आर.आर.इन्फ्रा.प्रा.लि.हैद्राबाद यांचेकडुन उर्वरित दंडाची रक्कम रु.२,११,०५,७४८/- वसुल करणेकामी विधी विभागास कळविण्यात आलेले आहे.

त्यासअनुसरुन ॲड.कुलकर्णी सो यांना दि.२७/११/२०१३ रोजीचे पत्राने कायदेशीर मार्गदर्शन देणेकामी विनंती करणेत आली होती. त्यानुसार ॲड कुलकर्णी,सो, यांचमार्फत दि.३०/११/२०१३ रोजी के.आर.आर.इन्फ्रा.प्रा.लि.हैद्राबाद यांना पाठविण्याची नोटिस तयार करुन दिली होती. सदरची नोटिस दि.३०/११/२०१३ रोजीचे कार्यालयीन टिपणी मंजुर करुन मा.कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने जा.क्र.३९६४/२०१३ दि.०३/१२/२०१३ रोजी के.आर.आर. इन्फ्रा.प्रा.लि.हैद्राबाद व श्री के.राघव रेड्डी, एम.डी.के.आर.आर.इन्फ्रा.प्रा.लि., हैद्राबाद यांना पाठविण्यात आली होती. सदर नोटीसा संबधीत व्यक्ती परदेशात गेल्याने नोटिसा दि.११/१२/२०१३ रोजी परत आलेल्या आहे.

त्यानंतर संदर्भ क्र.५ अन्वये बांधकाम विभागाचे मंजुर टिपणी अन्वये आपला अभिप्राय घेऊन ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रा.प्रा.लि.हैद्राबाद या कंपणीचे इतर संचालक यांना नोटिस पाठविणेकामी विधी विभागामार्फत कार्यवाही करण्यास सांगितले होते. यास अनुसरुन संदर्भ क्र.६ अन्वये मे.के.आर.आर.इन्फ्रा.प्रा.लि.हैद्राबाद या कंपणीचे अकरा संचालक यांना नोटिस पाठविणेत आली होती. त्यातील १) श्री के.आर.आर.इन्फ्रा.प्रा.लि.हैद्राबाद,२) श्री सुधाकर रेड्डी, ३) श्री के. व्हि. सुभा रेड्डी, ४) ऑन सी.एस.टी. रजिस्ट्रेशन सर्टिफिकीट, व ५) के.राघव रेड्डी ६) As per Address on:VAT registration certificate:- No.६५,Banagair ४th Main Opp Park Maruti Lay out, Vasanthapura Main Road, Uttarahalli, Subramanayapu , Banglore, ७) As per Address on;CST registration certificate; ६-३-५९६/८९/१,Sarvepalli House, Near IIPM, Naveen Nagar, Khairatabad, Hyderabad ०४ यांना पाठविलेल्या नोटीसा देखील परत आलेल्या आहेत.

प्रस्तुतची नोटीस १) आर.चंद्रा शेखर रेडड्डी , २) कुनम रजनी रेडड्डी, ३) कुनम अनिल रेडड्डी ४) इडुकोंडल रेडड्डी अहुला ५) कुनम राघव रेडड्डी यांना पोहोचलेली आहे .त्यांची पोहोच पावती विधी विभागास प्राप्त झाली आहे .

दि.२५/०४/२०१४ रोजीचे पत्रान्वये बांधकाम विभाग यांनी संस्थानचे नियोजित साईगार्डन प्रकल्पअंतर्गत सिव्हिल वर्कचे ठेकेदार के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. हैद्राबाद यांचेकडुन उर्वरीत दंडाची रक्कम रु.२,११,०५,७४८/-

मात्र वसुल करणेकामी कायदेशीर कार्यवाही करणेस कळविणेत आलेले आहे .

सदरचे प्रकरणातील ठेकेदार के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. हैद्राबाद यांना ॲड कुलकर्णी सो यांचेमार्फत नोटीसा पाठविणेत आलेल्या आहेत. इकडील विभागामार्फत ॲड एस.डी.कुलकर्णी सो यांना जा.नं.एसएसएस/वशी-विधी/११७६/२०१४, दि.०९/०६/२०१४ रोजीचे पत्राने सदर प्रकरणी त्यांचेमार्फत संस्थानचे वतीने मा.सिव्हील कोर्ट कोपरगांव येथील मा.सिव्हील जज्ज यांचे कोर्टात के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. हैद्राबाद यांचेकडुन उर्वरीत दंडाची रक्कम रुपये २,११,०५,७४८/- मात्र वसुल करणे कामी विरुध्द् दावा दाखल करणेचे व प्रस्तुत दाव्यास येणारा वकिल फी, स्टॅम्प फी, प्रोसेस फी, व इतर प्रासंगिक व इतर अनुषंगिक खर्चाचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०९** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रा.लि., हैद्राबाद यांचेबरोबर झालेल्या करारातील Arbitration Clause वगैरे सर्व संबंधीत माहितीसह सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.३४** **शिर्डी नगरपंचायत शिर्डी विशेष स्वच्छता कर व आरोग्य कर प्रदुषण नियंत्रण कर (पथकर) बाबत.**

**प्रस्ताव-** **१)** शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी देशातून व परदेशातून दररोज हजारो साईभक्त येतात. भक्तांच्या वाहनावर शिर्डी नगरपंचायतीकडून दि.०१/०४/१९९२ पासून वाहन कर (विशेष स्वच्छता व आरोग्य कर) आकारला जात होता. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडूनच सदरचे कराची आकारणी होते, असा साईभक्तांचा गैरसमज निर्माण होतो त्यांच्या भावना दुखावतात करीता शिर्डी नगरपंचायतीने अशी कर आकारणी करु नये, यासाठी संस्थानने जा.नं. एसएसएस/ वशी-०२/१३२१०/ २००४ दि.३१/१२/२००४ चे पत्राने शिर्डी नगरपंचायतीस लेखी कळविले नतंर नगरपंचायतीने दि.११/०५/२००५ चे पत्राने टोल नाक्यापासून प्रतिवर्ष मिळणाऱ्या रक्कमे एवढी रक्कम त्यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत मिळावी असे कळविले. सन २००४-०५ साली रुपये-४५,६१,९९०/- एवढी रक्कम त्यांना मिळाली होती. त्याप्रमाणे प्रतिवर्षी रु. ४०,००,०००/- मिळावी व प्रतिवर्षी त्यात २०% वाढ करण्यात यावी, असे संस्थानला कळविण्यात आले होते.

याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन शिर्डी नगरपंचायतीने मागणी केलेली रक्कम प्रतिवर्षी रुपये- ४०,००,०००/- (अक्षरी रुपये- चाळीस लाख) मात्र म्हणजेच प्रति ३ महिन्यास रुपये- १०,००,०००/- (अक्षरी रु. दहा लाख) आगाऊ देण्यात यावे, असे मा.जिल्हाधिकारी, अ.नगर यांनी सांगितले व सर्वानुमते त्यांस मान्यता देण्यात आली.

**२)** त्यानंतर भक्तांच्या सोईसाठी अनुदान रक्कम रु.- ४०,००,०००/- (अक्षरी रु.-चाळीस लाख) मात्र शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना प्रतिवर्षी देण्यास मान्यता मिळणेकामी संस्थानने जा.नं.एसएसएस/वशी-०२/१३०५४/०५ दि.०९/११/२००५ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रस्ताव सादर केला होता. त्यावर महाराष्ट्र शासनाचे क्र. बैठक २०१०- प्र.क्र.१६/१०/का-सोळा विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई दि. ७/०४/२०१० रोजीचे पत्रा सोबतचे दि. २७/०१/२०१० रोजीचे बैठक इतिवृत्तात रक्कम रु. ५०,००,०००/- मात्र दर वर्षी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना अदा करणेबाबत मान्यता दिलेली आहे. परंतू त्याबाबत इतिवृत्ता शिवाय वेगळा आदेश आलेला नाही.

**३)** शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी दि. १३/०२/२०१३ रोजीचे पत्राने व दि. १७/१०/२०१३ रोजीचे पत्राने सन २०१२ - २०१३ कालावधीचे रक्कम रु. ५०,००,०००/- व सन २०१३ - २०१४ या कालावधीसाठी रक्कम रु. ५०,००,०००/- असे एकुण रक्कम रु. १,००,००,०००/- मिळणेस विनंती करण्यात आली होती. मा. त्रिसदस्य समितीचे दि. २७/०४/२०१३ व दि. १४/११/२०१३ रोजीचे सभेत त्यावर "शिर्डी नगरपंचायतीस अदा करावयाचे रक्कमेचा प्रस्ताव शासनास पाठवून शासन मान्यता प्राप्त झालेनंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील मान्यता घेऊन सदरची रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली ." प्रस्तुतचे ठरावास अनुसरुन १) जा.नं.एसएसएस /वशी-विधी /५९३५/२०१३ दि.२८/०३/२०१३. २) जा.नं.एसएसएस/वशी-विधी/१९१६/२०१३ दि.२२/०७/२०१३. ३) जा.नं. एसएसएस/ वशी-विधी/ ३५५४/ २०१३ दि.०७/११/२०१३. ४)जा.नं.एसएसएस/ वशी- विधी/ ४५३७/ २०१३ दि.०३/०१/२०१४ चे पत्राने मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांना शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना सन २०१२-२०१३ या कालावधीतील रु. ५०,००,०००/- व सन २०१३-२०१४ या कालावधीतील रु. ५०,००,०००/- असे एकुण १ कोटी रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती केली आहे.

**४)** कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग यांनी दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्राने श्री साईबाबा संस्थानकडून शिर्डी नगरपंचायतीस सदर करापोटी देण्यात येणाऱ्या रकमांचा वर्षनिहाय सविस्तर तपशील तसेच नगरपंचायतीकडून कोणत्या सवलती दिल्या जातात याचा सविस्तर तपशील शासनास सादर करावा तसेच याबाबींचा आढावा घेऊन यासंदर्भात निश्चीत धोरण ठरविण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर शासन स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. असे संस्थानला सुचीत केले होते. संस्थानचे सर्व विभागांनी सवलतीबाबत निरंक अहवाल पाठविला आहे. दि. १७/०५/२०१४ रोजीचे पत्राने सवलतीबाबत नगरपंचायतीने खालील प्रमाणे माहिती दिली आहे.

"शिर्डी नगरपंचायती मार्फत ड्रेनेज लाईन, मलनिस:रण व सांडपाणी प्रकल्प (एसटीपी प्लँट) तातडीच्या वेळी उपलब्ध पाण्यातून पाणी पुरवठा करणे, आरोग्य रक्षण सुखसोयी नगरपंचायत मार्फत पुरविले जातात, शिर्डी मध्ये साईबाबांच्या दर्शनासाठी देश विदेशातून लाखो साईभक्त येतात. आलेल्या साईभक्तांसाठी नगरपंचायत अनेक प्रकारच्या सुविधा पुरवित असते उदा. शहरातील रस्त्यांची साफसफाई करणे, विद्युत व्यवस्था करणे, रस्ते विकसीत करणे, आलेल्या साई भक्तांसाठी शहरातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे, देश विदेशातून येणाऱ्या साईभक्तांना शिर्डी शहर सुंदर व स्वच्छ दिसावे या कामी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करावी लागते. तसेच उत्सव काळामध्ये येणाऱ्या साई भक्तांच्या वाहनांची पुरेशी व्यवस्था करणे, सदर काळात साईभक्तांची, पालख्यांची होणारी गर्दी लक्षात घेता प्राथमिक सुविधा पुरविणेसाठी अतिरिक्त यंत्रणा राबवावी लागते. शहरातील वाहतुक व्यवस्था सुरळीत राहणेकरीता सुरक्षा यंत्रणेस मदत करणे, साईभक्तांना रस्त्यावरील अतिक्रमणांचा त्रास होऊ नये म्हणून शहरातील अतिक्रमणे नियंत्रीत करणे अतिक्रमण काढणे, अतिक्रमण होऊ नये म्हणून वारंवार लक्ष केंद्रीत करणे इ. सुविधा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या पुरविण्यात येत आहे . तसेच श्री साईबाबा संस्थान ,शिर्डी नगरपंचायतीस जो कर रुपाने कर भरीत आहे. तो कर भरणे व सुविधा देणे याचा प्रत्यक्षात कुठेही काहीही संबंध येत नाही. याबाबत ॲग्रिकल्चर प्रोसिजर मार्केट कमिटी, जि. अकोला विरुध्द महाराष्ट्र शासन यांच्या विरोधात अशाचप्रकारे याचिका दाखल केली होती सदर याचिकेवर मुंबई हायकोर्टाने निकाल दिलेला असून सदर निकालाची प्रत माहितीसाठी दिली आहे ."

शासनाचे दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्रास अनुसरुन शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे मार्फत संस्थानला देणेत येणाऱ्या सवलती बाबतचा सविस्तर तपशील/ माहिती उपरोक्त प्रमाणे जा.क्र. एसएसएस

वशी विधी/१००/२०१४ दि. २८/०५/२०१४ चे पत्राने कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग यांना पाठविण्यात आली आहे.

**५)** कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग यांनी दि. १८/०६/२०१४ रोजीचे पत्राने शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या कालावधीची विशेष स्वच्छता कर रक्कम अदा करणे कामी खालील मुद्यांची माहिती / प्रस्ताव शासनास उलट टपाली सादर करावा असे कळविले आहे.

१) संस्थानकडून नोव्हेंबर, २००५ पासून मार्च २०१२ पर्यंत शिर्डी नगरपंचायतीस विशेष स्वच्छता कर व आरोग्य कर म्हणून रक्कम अदा करण्यात आलेल्या रकमेस कार्योत्तर मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव छाननी समितीच्या मान्यतेसह सादर करावा.

२) सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या वर्षासाठी प्रत्येकी ५० लाख रुपये शिर्डी नगरपंचायतीस अदा करण्याबाबतचा प्रस्ताव छाननी समितीच्या मान्यतेसह सादर करावा.

३) दि. २७/०१/२०१० रोजी तत्कालीन मा. मंत्री (विधी व न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे शिर्डी नगरपंचायतीकडून संस्थानला मिळणाऱ्या सवलतीचा तपशिल घेऊन निश्चीत धोरण ठरविण्याबाबत दि. १५/०१/२०१४ च्या शासन पत्रान्वये कळविल्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात यावा. अशा आशयाच्या सुचना दिलेल्या आहेत.

**६)** उपरोक्त मुद्यांचे संदर्भात जा.क्र. एसएसएस वशी- विधी/२४५० /२०१४ दि. १८/०८/२०१४ रोजीचे पत्राने कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांना उपरोक्त मुद्यांस अनुसरुन कळविण्यात येते की मा.उच्च न्यायालयाचे दि. १३/०३/२०१२ रोजीचे आदेशान्वये शासनाने नियुक्त केलेले विश्वस्त मंडळाचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे, त्याच वेळी छाननी समितीही संपुष्टात आलेली आहे. दि. ०१/०४/२०१२ पासून संस्थानचा कारभार मा. जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर यांचे अध्यक्षते खाली पाहीला जात आहे. त्यामुळे सद्यस्थीतीत सदरचा विषय छाननी समितीचे मान्यते साठी सादर करता येणार नाही. छाननी कमिटी दि.०१/०४/२०१२ पासुन आस्थित्वात नाही. तसेच शिर्डी नगपंचायतीकडून संस्थानला मिळणाऱ्या सवलतीचा तपशिल लक्षात घेऊन शिर्डी नगरपंचायतीस विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर (पथकर ) अदा करावयाचे रक्कमे संदर्भात निश्चीत धोरण ठरविण्याबाबत मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे विषय सादर करुन निर्णय घेण्यात येत आहे. असे कळविलेले आहे.

आता शिर्डी नगरपंचायतीस विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर (पथकर) अदा करावयाचे रक्कमे संदर्भात शासनाने उपस्थीत केलेल्या खालील मुद्यांवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक वाटते.

१) दि. २७/०१/२०१० रोजी तत्कालीन मा. मंत्री (विधी व न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे शिर्डी नगपंचायतीकडून संस्थानला मिळणाऱ्या सवलतीचा तपशिल घेऊन निश्चीत धोरण ठरविण्याबाबत दि. १५/०१/२०१४ च्या शासन पत्रान्वये कळविल्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात यावा. अशा आशयाच्या सुचना दिलेल्या आहेत. ( अ.क्र. नं. ४ मध्ये शिर्डी नगरपंचायतीचे दि. १७/०५/२०१४ चे पत्राने सवलतीबाबत माहिती दिली आहे.)

**विभागाचे स्पष्ट मत:-** कार्यासन अधिकारी विधी व न्याय विभाग यांचे दि. १८/०१/२०१४ रोजीचे पत्रातील मुद्दा क्र. ०१ व ०२ छाननिसमितीच्या बाबत शासनास जा.क्र. एसएसएस वशी- विधी/२४५० / २०१४ दि. १८/०८/२०१४ रोजीचे पत्राने कळविले आहे. शासनाचे पत्रातील मुद्दा क्र. ३ प्रमाणे शिर्डी नगरपंचायतीकडून संस्थानला मिळणाऱ्या सवलतीचा तपशील घेवून निश्चीत धोरण ठरविणे आहे. संस्थानचे विविध खात्याने नगरपंचायतीकडून सवलती प्राप्त होत नसल्याचे कळविले असले तरी नगरपंचायतीकडून संस्थानला मिळणाऱ्या सवलतीबाबत नगरपंचायतीने दि. १७/०५/२०१४ रोजी (अ.क्र. नं. ४ ) उपरोक्त प्रमाणे माहिती पाठविली आहे. या सर्व बाबी विचारात घेवून नगरपंचायतीला रक्कम अदा करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेवून शासनास कळविणेचे मान्यतेसाठी सादर.

तरी उपरोक्त शासनाचे मुद्यांवर मा. समितीने त्यावर योग्य तो निर्णय घ्यावा.

**निर्णय क्र.७१० उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सध्याची समिती अस्थायी आहे, शासनाकडून स्थायी समिती नियुक्त झाल्यानंतर छाननी समितीही नियुक्त होईल, त्यावेळी याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.३५ ॲड.संजय चौकीदार यांची औरगांबाद खंडपीठात साईबाबा संस्थानचे वकील म्हणून झालेली नियुक्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री संजय भास्कर काळे यांनी मा. प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांना ॲड.संजय चौकीदार यांची औरंगाबाद खंडपीठात साईबाबा संस्थानचे वकील म्हणून झालेली नियुक्ती बेकायदा असल्याने रद्द व्हावी अशा आशयाचे दिलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे मार्फत संस्थानला प्राप्त झालेली आहे.

श्री संजय काळे यांनी त्यांचे पत्रात श्री साईबाबा संस्थानचे अनेक दावे मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात प्रलंबीत आहेत. सन १९९५ ते सन २००३ संस्थानने तीन वकील नियुक्त केलेत. सन २००५ मध्ये शासनाने नविन विश्वस्त मंडळ नियुक्त केले त्या विश्वस्त मंडळाने दि.०६/०८/२००५ रोजी पाच नविन वकीलांची नियुक्ती केली. सन २००८ व सन २०१० मध्ये प्रत्येकी एक वकीलांची नियुक्ती करण्यात आली सन २०१२ पर्यंत औरंगाबाद खंडपीठात संस्थानचे एकुण दहा वकील संस्थानच्या पॅनलवर होते. सदर विश्वस्त मंडळाने वकिल नियुक्तीसाठी निवड प्रक्रिया अवलंबली नाही. सरळ आपल्या मर्जितल्या वकिलांना एका ठरावाव्दारे नियुक्तीचे आदेश देण्यात आले. विश्वस्त मंडळ व व्यवस्थापनाच्या मनमानेल कारभाराच्या विरुध्द औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली व सदर विश्वस्तमंडळ बरखास्त करण्यात आले. उच्च न्यायालयाने त्रिसदस्य समितीची नियुक्ती केली. अहमदनगर जिल्हा न्यायालयाचे प्रधान न्यायाधिश यांची संस्थानचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. किमान जिल्हा न्यायाधिश कायद्याच्या चाकोरीत काम करतील अशी अपेक्षा होती. परंतू अपेक्षा भंग झाला. दरम्यानच्या काळात न्यायमुर्ती आंबादास जोशी हे अहमदनगर जिल्ह्याचे पालक न्यायाधिश होते. दि.२७/०३/२०१२ रोजी न्यायालयाने नियुक्त केलेल्या त्रिसदस्य समितीने आपले दि.२५/०९/२०१२ चे व्यवस्थापन समितीचे बैठकीत विषय क्र. १ व निर्णय क्र ७९९, अन्वये श्री ॲड.संजय चौकीदार यांची संस्थानचे वकिल म्हणुन नियुक्ती केली. संस्थानच्या पॅनलवर मुळात दहा वकिल असतांना नवीन वकीलाची गरज का पडली हा संशोधनाचा विषय संस्थानने वकिलांची नेमणुक करणेसाठी जाहीरात दिली नाही. उमेदवारी अर्ज बोलावले नाही, त्यांची मुलाखत घेतली नाही, कुठलीही कायदेशीर पध्दत न अवलंबता सरळ नियुक्ती करुन बेकायदा कृत्य केलेले आहे. ॲड संजय चौकीदार हे न्यायमुर्ती आंबादास जोशी (ते वकिल असतांना) यांचे सहकारी म्हणुण काम पहात होते. न्यायमुर्ती आंबादास जोशी हे अहमदनगर जिल्हयाचे पालक न्यायधिश असल्याने, प्रधान न्यायधिश व साईबाबा संस्थानचे अध्यक्ष यांनी न्यायमुर्ती जोशी यांना खुष करण्यासाठी व संस्थानचे व न्यायमुर्तीचे संबंध दृढ करण्यासाठी हि नियुक्ती केली असल्याचा संशय आहे. सदर प्रकरणाची तक्रार मी सर्वोच्च न्यायालयात करणार आहे. परंतु श्री साईबाबा संस्थान हि राज्य सरकारची अंगीकृत संस्था असल्याने झालेली बेकायदा नियुक्ती रद्द व्हावी. संस्थानला वकिल, डॉक्टर, अभियंता इ. कोणाची हि नियुक्ती करावयची असेल तर जाहिरात देणे, मुलाखत घेणे इ. प्रक्रियेचा अवलंब करणे जरुरी आहे. ते संस्थानने अवलंबले नाही, प्रधान न्यायाधिश यांनी आपल्या वरीष्ठांची मर्जी राखण्यासाठी, संस्थानच्या अध्यक्षपदाचा दुरुपयोग केलेला आहे. साईबाबा संस्थान राजकीय पुनर्वसनाचा अड्डा होता आता प्रशासकिय पुनर्वसनाचा अड्डा आहे असे स्पष्ट होत आहे. औरंगाबाद खंडपीठात अनेक उच्च शिक्षित, तज्ञ संस्थानचे काम मोफत साईसेवा म्हणुन करणारे वकिल अनंत आहेत. त्यांना संधी देऊन संस्थानचे हित साधने जरुरी होते व आहे. सदरची नियुक्ती त्वरीत रद्य ठरवण्यात यावी अगोदरचे असलेले दहा वकिल संस्थानच्या कामात उपयोगी नाही. असाच निष्कर्ष या ॲड. चौकीदारांच्या नियुक्तीने पुढे आला आहे .सर्व दहा वकिलांचे पॅनेल देखील रद्द करावे. संस्थानच्या कामासाठी किती वकिलांची गरज आहे, याचा आढावा व्हावा. संस्थान शासनाची अंगीकृत संस्था असल्याने सरकारी वकिलांनीच संस्थानचे कामकाज पहावे त्यामुळे संस्थानचा होणारा अतिरीक्त खर्च टळणार यात शंका नसावी. तरी सदर प्रकरणी त्वरीत कारवाई व्हावी, नियुक्ती रद्द व्हावी. स्पर्धात्मक परीक्षेव्दारे वकिलांची नियुक्ती व्हावी. झालेल्या नियुक्तीवर जबाबदारी निश्चित व्हावी असे नमुद केले आहे.

सध्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूका केलेल्या ॲडव्होकेटस्‌ची यादी खालील प्रमाणे आहे. सदरचे नेमणूका मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने / ठरावास अनुसरुन वेळोवेळी केलेल्या आहेत.

| अ.नं. | वकीलांचे नांव |
|---|---|
| ०१ | ॲड. श्री आर.एन.धोर्डे, औरंगाबाद. |
| ०२ | ॲड. श्री अनिल बजाज, औरंगाबाद. |
| ०३ | ॲड. श्री विनायक होन, औरंगाबाद. |
| ०४ | ॲड. श्री राजेंद्र रघुवंशी, औरंगाबाद. |
| ०५ | ॲड. श्री नितिन भवर, औरंगाबाद. |
| ०६ | ॲड. श्री बाबासाहेब वाघ, औरंगाबाद. |
| ०७ | ॲड. श्री संदीप एकनाथ गोंदकर, शिर्डी. |
| ०८ | ॲड. श्री संजय आर. चौकीदार, औरंगाबाद. |

ॲड. श्री संजय आर. चौकीदार यांची नियुक्ती मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०६/०९/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७९९ अन्वये केलेली आहे. त्यांचेकडे मा.उच्च न्यायालयाचे दि. १३/०३/२०१२ व दि. १६/१०/२०१२ रोजीचे आदेशास अनुसरुन मोठ्या रक्कमेचे खर्चास मान्यता मिळणेबाबतचे सिव्हील अर्ज मा.उच्च न्यायालयात दाखल केले आहे करण्यात येत आहे. तसेच नव्याने दाखल झालेल्या रिट पिटीशनचे काम त्यांना दिलेले आहे.

संस्थान पॅनलवर उपरोक्त तक्त्यातील ८ वकील आहेत, श्री चौकीदार यांची वकील म्हणून नेमणूक केलेबाबत श्री संजय काळे यांचे पत्र आहे. वकील नियुक्तीसाठी प्रक्रिया राबविणेत आली नाही, पालक न्यायाधिशांना खुश ठेवणेसाठी, झालेली नियुक्ती रद्द करावी अशी त्यांची मागणी आहे. परिक्षाव्दारे वकीलांची नियुक्ती व्हावी सरकारी वकीलाव्दारे संस्थानचे कामकाज पहाणेत यावे अशी त्यांची मागणी आहे.

मात्र संस्थानकडे वकील नियुक्ती मा. व्यवस्थापन समितीचे ठरावाने केलेल्या आहेत, तरी उपरोक्त विषयी समितीने त्यावर योग्य निर्णय घेणेसाठी सादर.

**निर्णय क्र.७११** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. पूर्वी मा.उच्च न्यायालयामध्ये फारसी प्रकरणे दाखल होत नसत, त्यामुळे वकील नेमणुकीबाबत विशिष्ट अशी निवड प्रक्रिया राबवली जात नव्हती, कुठलीही निवड प्रक्रिया न राबवता वकील नेमले गेलेले आहेत, असे निदर्शनास येते. त्यामुळे मा.उच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने कामकाज पाहण्यासाठी वकीलांच्या नेमणूकासंबंधीची निवड प्रक्रिया फेरविचारासाठी ठेवणेत यावी. यापुढे अशा वकिलांची नेमणूक ही तदर्थ Ad-Hoc अशी करावी व या वकिलांविषयी आक्षेपार्ह गोष्टी आढळून आल्यास त्यांची नेमणूक/ वकिलपत्र समिती केव्हाही रद्द करु शकेल, असा अधिकार संस्थानने राखून ठेवावा. मा.उच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने काम पहाण्याकरिता वकीलांचे पॅनल तयार करणेसाठी नियमावली तयार करुन, योग्य असा सविस्तर प्रस्ताव समिती समोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.३६** **स्वागत कक्ष येथे चालवत असलेल्या क्लोकरुमला पाच वर्षाकरीता मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने उपरोक्त विषयान्वये दि.२१/१२/२०१३ रोजीचे पत्राने सोसायटी साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी बसस्टॅंड समोरील जुने स्वागतकक्षाचे जागेत क्लोकरुम चालवत असून सदर क्लोकरुम फायबर कॅबीन मध्ये असून साधारण "१२ X ८" जागेत ठेवणेत आलेले आहे. क्लोकरुम मध्ये ठेवण्यात येणाऱ्या सामानाचे प्रति दिवशी प्रति सुटकेस/ बॅग/ इतर सामान ठेवणेसाठी प्रतीनग रु.१ प्रमाणे आकारण्यात येत आहे. सदर क्लोकरुमची मुदत दि. २१/०१/२०१३ रोजी संपुष्टात आली असून साई भक्तांचे बॅग, पिशवी व इतर सामान ठेवणेचे सुविधेसाठी व सोईसाठी बसस्टॅंड समोरील जुने स्वागतकक्षाचे जागेतील क्लोकरुम व्यावसायास पुढील पाच वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीचे पत्रास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे दि. १५/०३/२०१४ रोजीचे सभेत विषय नं. ७१ निर्णय क्रं. २४१ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को-ऑप सोसायटी लि. शिर्डी यांना त्यांची मुदत संपलेपासून पुढे पाच वर्ष कालावधीसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स फी मध्ये १० टक्के वाढ करुन मुदतवाढ देणेत यावी. मात्र त्यांचेबरोबरील करारनाम्याचे प्रत्येक वर्षी नुतणीकरण करुन घेणेत यावे. तसेच तत्पुर्वी याकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन जा.क्र. एसएसएस वशी विधी/ ७८९ /२०१४ दि. १५/०५/२०१४ ने ॲड. संजय आर. चौकीदार, औरंगाबाद यांना सिव्हल अर्ज मसुदा तयार करुन देणेस

विनंती केली असता, त्यावर ॲड.चौकीदार यांनी दि.२४/०६/२०१४ रोजी कायदेशीर मार्गदर्शन पत्र दिले आहे. त्यात खालील प्रमाणे नमुद केले आहे.

"In this respect, I have to opine that since the aforesaid decision does not fall in the category of major financial decision, therefore, the Committee need not approach Hon'ble High Court for the purposes of executing the contract/ agreement between Sansthan and the aforesaid Employees Co-operative Credit Society. Hence this opinion."

**विभागाचा अभिप्रायः-** प्रस्तुत प्रकरणी मा. कोर्टाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही असे ॲड.संजय आर. चौकीदार यांनी उपरोक्त कायदेशीर मार्गदर्शनाने कळविले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास व ॲड.संजय आर. चौकीदार यांचे कायदेशीर मार्गदर्शनास अनुसरुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को-ऑप सोसायटी लि. शिर्डी यांना स्वागतकक्ष येथील क्लोकरुम व्यवसायास दि. २२/०१/२०१३ पासून पुढील पाच वर्ष कालावधीसाठी म्हणजे दि. २१/०१/२०१८ पावेतो लिव्ह ॲन्ड लायसेन्स फी मध्ये (म्हणजे प्रथम वर्षी रु. ७७९/- आकारुन) प्रति वर्षी १० टक्के वाढ करुन, मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार आकारुन तसेच मागील अटी शर्ती प्रमाणे व भक्तांकडून आकारावयाचे दर पुर्वीप्रमाणेच आकारुन मुदतवाढ देता येईल.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.३७ ऑनलाईन प्रसाद डॉट कॉम मार्फत भक्तांची होत असलेल्या फसवणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना श्री साईबाबा संस्थान मार्फत लाडु प्रसाद, साईबाबांचा फोटो, उदी प्रसाद देण्याची सुविधा उपलब्ध आहे. श्री साईबाबा संस्थानचे ऊदी प्रसाद विभागामार्फत जे साईभक्त संस्थानचे सभासद आहेत. त्याच सभासदांना संस्थान मार्फत गुरुपोर्णिमा, रामनवमी, दसरा या ऊत्सवाच्या वेळी उत्सव निमंत्रण पत्रिका व साईबाबांची ऊदी प्रसाद पाठविणेत येते .तसेच देणगीदार भक्तांना उदी प्रसाद देण्यात येतो. संस्थानचे व्यतिरिक्त इतर कोणासही भक्तांना उदी प्रसाद देता येणार नाही .व त्याकामी (उदी वाटप कामी) इतर कोणासही भक्तांकडुन नेमणेत आले नाही. मात्र नुकतेच असे लक्षांत आलेले आहे की, इंटरनेटवरील ऑन लाईन प्रसाद डॉट काम या वेबसाईट वर श्री साईबाबा मंदीर शिर्डी च्या नावावर साईभक्तांना साईबाबांचा प्रसाद, फोटो, ऊदी प्रसाद, साईबाबांचे नांवाचा धागा, देणेत येत आहे. प्रस्तुत वेबसाईट कोणाची आहे, कोणाच्या नांवावर नोंदविणेत आलेली आहे. याबाबत काहीही माहिती नाही. फक्त मोबाईल नंबर, ईमेल, फेसबुक (Email:contact@onlineprasad.com), miss call-९१-९९३३-४२१-३४१, Toll free (india): १-८००-३०१०-०५०५, facebook: facebook.com/ onlineprasad, Twitter:@ onlineprasad) याबाबत माहिती दिलेली आहे. प्रस्तुत वेबसाईट abuse@bigrock.com या कंपनी अंडर चालविणेत येते, ज्या व्यक्तीचे नावांने नोंदणी केलेली आहे. त्यांचे नांव वेबसाईटवर ओपन करता येत नाही कारण कंपनी मार्फत प्राव्हेसी प्रोटेक्ट केलेले आहे .

प्रस्तुत वेबसाईट साईबाबा संस्थान शिर्डीचे नावांवर साईभक्तांना ऑन लाईन प्रसाद, ऊदीप्रसाद, धागा, साईबाबांचे फोटे देणेचे कामकाज करीत आहे. साईभक्तांची दिशाभुल व बेकायदा पैसे गोळा करीत असल्याचे दिसुन येते. श्री साईबाबा संस्थान मार्फत ऊदीप्रसाद देणेत येतो. इतर कोणाच्याही मार्फत साईबाबाची ऊदी प्रसाद देणेत येत नाही.

प्रस्तुतची वेबसाईट श्री साईबाबांचा प्रसाद ऊदी असा उल्लेख वेबसाईटवर करुन साईभक्तांमध्ये संभ्रम निर्माण होऊन लाखो साईभक्तांची फसवणुक करीत आहे. सदरील उदीप्रसाद हा फक्त आणि फक्त साईबाबा संस्थान मार्फतच साईभक्तास बाबाचे धुनीतुन मिळणा-या उदीतुन उदी प्रसाद म्हणुन दिला जातो.

परंतु सदरील वेबसाईट साईभक्तांच्या भावनाशी खेळ करुन त्यांचेकडुन गैरमार्गाने पैसे उकळण्याचे काम करत आहे व त्यांचे हे काम बेकायदेशीर आहे त्यामुळे साईसंस्थानची प्रतिमेस सुध्दा धोका उत्पन्न झाला आहे. त्यामुळे मा.पोलिस आयुक्त सायबर क्रिमीनल ब्रँच यांनी ताबडतोब सदरील होणा-या साईभक्ताच्या फसवणुकीस व साईबाबांचे प्रसादाचे नावाखाली साईभक्ताकडुन गैर व बेकायदेशीर मार्गाने गोळा होणारा पैसा विचारांत घेऊन, सदर बेकायदेशीररित्या चालविण्यास येणा-या वेबसाईट व ती बेकायदेशीर चालविण्यात येणा-या गुन्हेगारास सायबर क्राईम ॲक्ट तसेच I.P.C. अंतर्गत गुन्हा दाखल होऊन शासन व्हावे व त्याकामी योग्य ते Investingation व कार्यवाही करावी. सदर वेबसाईड ही आंतरराष्ट्रीय पातळीवर चालविण्यात येणारी वेबसाईड असलेचे प्रथमदर्शनी दिसुन येत असुन सदर पैसा हा वेगवेगळया गुन्हयासाठी व देशविघातक कृत्यासाठी वापरण्याची दाट शक्यता असल्यामुळे आपण या गुन्हयाचा शिघ्र गतीने तपास

करावा व सदरील गुन्हेगारावर गुन्हा दाखल करुन घ्यावेत / करावे अशी विनंती १) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र नाशिक, २) मा.पोलीस अधिक्षक, पोलीस कार्यालय, अहमदनगर, ३) मा.सुनिता ठाकरे साळुंके साहेब, अप्पर पोलीस अधिक्षक, श्रीरामपुर, भाग श्रीरामपुर ता-श्रीरामपुर, जिल्हा- अहमदनगर, ४) मा.उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी पोलीस स्टेशन कार्यालय, शिर्डी ता-राहाता, जिल्हा- अहमदनगर, ५) मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, ता-राहाता, जिल्हा-अहमदनगर,यांना विधी विभागामार्फत जा.नं.एसएसएस वशी विधी /५६४९/२०१४, दि.०८/०३/२०१४ रोजीचे पत्राने विनंती केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी संस्थानचे विधी अधिकारी व आय टी विभागाचे प्रतिनिधी हे समक्ष नाशिक येथे तक्रार देणेस गेले होते. त्यास अनुसरुन मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र नाशिक, यांनी त्यांचेकडे दाखल केलेले प्रकरण त्यांनी त्यांचेकडुन जा.क्र.का.पत्रक्र, पोमणि/ नाप/ तक्रार अर्ज/ अहमदनगर/ ३/ २०१४/२७२/ दि.२५/०३/२०१४ अन्वये एस.पी. अहमदनगर कार्यालयाकडे पाठविणेत आले आहे.

आता प्रस्तुत प्रकरणी संदर्भात शिर्डी पोलीस स्टेशनने पत्र क्र. गोजाक्र २०९/२०१४ दि. २९/०३/२०१४ चे पत्राने अहवाल पाठविलेला आहे. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी विभाग, शिर्डी यांनी पत्र क्र.शि.वि./आर/अर्ज/१३५९/२०१४ दि.२९/०४/२०१४ चे पत्राने आपले सायबर सेल मार्फतीने abuse@bigrock.com या कंपनीबाबत चौकशी व कार्यवाही चालु आहे. याबाबतचा अहवाल सादर केल्याचे विधी कार्यालयास कळविले आहे. प्रस्तुत प्रकरणी abuse@bigrock.com या कंपनीवर मा.पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर सायबर सेल यांनी त्यांचे मार्फत पुढील केलेल्या कार्यवाहीची माहिती संस्थानला कळविणेची विनंती ही करता येईल माहितीसाठी/ अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.७१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे संकेतस्थळावर प्रस्तावित प्रकारची कोणतीही वेबसाईट संस्थानने सुरु केलेली नाही व कोणा व्यक्ती/ संस्थेस उदी-प्रसाद वाटप करण्याचे अधिकार प्रदान केलेले नाहीत तसेच प्रस्तुत वेबसाईट शिवाय साईबाबा संस्थानची दुसरी कुठलीही वेबसाईट नाही, असे प्रसिध्द करुन त्याबाबत साईभक्तांना अवगत करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.३८** **श्रींना अर्पण करण्यात आलेल्या नारळ फळे न स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मध्ये १४(२) (ग) समितीच्या अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्य या बाबात असून त्या प्रमाणे "नाशवंत अर्पणवस्तुंची लिलावाव्दारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्तव्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणे." अशी तरतूद प्रस्तूत कलमामध्ये नमुद केलेली आहे.

साईभक्त फुले, हार, समाधीवर किंवा मुर्तीवर फेकतात. अनावधानाने नारळ फेकल्यास मुर्तीला इजा होऊ शकते. अथवा नाराळामध्ये बॉम्ब सारखी वस्तू घेवुन येऊ शकतात. या करिता दर्शन रांगेमध्ये लाडू वाटपाचे ठिकाणी नारळ जमा करुन घेणे बाबत कार्यवाही करणे. असे संरक्षण विभागाने कळविलेले आहे. सुरक्षेच्या दुष्टीने त्यानुसार बगीचा विभागा मार्फत श्रींना अर्पण केलेले नारळ व हार गोळा करण्यात येतात. जमा झालेल्या नारळ फळांची विक्री करण्यात येते व हार, फुले या निर्माल्याची विल्हेवाट लावण्यात येते. यापूर्वी साईभक्त हे दर्शनासाठी आले नंतर आपल्या बरोबर आणलेले नारळ मंदीर परिसरातील नारळ स्टॉलच्या खोलीत नारळ फळे अर्पण करत असे दिनांक ०२/११/२०१३ पासून संरक्षण विभागामार्फत प्रवेश व्दार नं ०१, ०२,०३,०४ या ठिकाणाहून साईभक्त दर्शनासाठी आत दर्शन रांगेत येतांना त्यांची संरक्षण विभागा मार्फत तपासणी करुन साईभक्तांकडील नारळ फळे प्रवेश व्दार नं ०१,०२,०३,०४ या ठिकाणी काढले जातात/ जमा केली जातात, त्यानंतर साईभक्तांना दर्शन रांगेत दर्शनासाठी सोडले जाते.

जमा झालेले नारळ फळांची जुने प्रसादालय इमारत या ठिकाणी साठवण करुन संस्थानच्या दैनंदिन वापरा व्यतरिक्त शिल्लक राहिलेले नारळ फळे विक्री करण्यात येत.

हार व फुले बंद करणे ही बाब भाविकांवर अन्याय करणारी आहे. अशा कृतीने मंदिर व्यवस्थापन भक्तांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करत आहे. मंदिर परिसरात हार फुलांची विक्री करणारे सुमारे २५० ते ३०० दुकाने आहेत. तसेच परिसरात अस्तगांव, नांदुर्खी, वाकडी, चोळकेवाडी, दुर्गापुर, दाढ या गावांमधील १३३ हेक्टर जमिनीवर फुल शेती आहे. या शेतीवर अनेक शेतकरी कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. केवळ सुरक्षा आणि मंदिरातील साफसफाईच्या नावाखाली वरील निर्णय झाला तर परिसरातील शेतकरी आणि व्यापारी वर्गाला याचा मोठा फटका बसणार आहेत. मंदिराच्या सुरक्षेसाठी वाटल्यास नारळ फळे स्विकारणे बंद करता येईल.

संरक्षण अधिकारी यांचा अभिप्राय घेतला असता, समाधी मंदिरात दर्शनासाठी आलेल्या साईभक्ताकडुन फुल, लाडु, सामाधीवर किंवा मुर्तीवर फेकतात तसेच नारळ फेकल्यास मुर्तीला/ समाधीला इजा होऊ शकते. नारळ फळांमध्ये तसेच फुल हारांमध्ये बॉम्ब सारखी वस्तु येवु शकते. म्हणुन कायदा व सुरक्षेच्या दृष्टीने नारळ फळ व फुल हार समाधी मंदिरात घेवुन येणेस बंदी घालणे बाबत योग्य ती कार्यवाही व्हावी असे आमचे नम्र मत आहे असे कळवीलेले आहे.

समाधी मंदीरात दर्शनासाठी दर्शन रांगेत प्रवेश करतांना साईभक्तां कडून प्रवेश व्दार नं ०१, ०२,०३,०४ या नारळ फळे काढून घेण्यात येतात/ जमा करण्यात येतात, साईभक्त फुल, लाडु, समाधीवर किंवा मुर्तीवर फेकतात. अनावधानाने नारळ फेकल्यास मुर्तीला इजा होवु शकते. तसेच नारळ फळांमध्ये बॉम्ब सारखी वस्तु येवु शकते. सुरक्षेच्या दृष्टीने नारळ फळे ही गेटवर घेण्याचे बंद करण्यात यावे.

प्रवेश व्दार नं ०१, ०२,०३,०४ येथे जमा झालेले नारळ फळे सुरक्षेच्या दृष्टीने गेटवर घेण्याचे बंद करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींना नारळ अर्पण करणे ही बाब भक्तांच्या भावनेशी निगडीत आहे. सुरक्षिततेच्या कारणास्तव मंदिर परिसराचे प्रवेशद्वारावरच असे नारळ स्वीकारण्यात यावेत. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.३९ मंदिर परिसरातील लेंडीबागेचे नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परिसरात मंदिराचे पश्चिम बाजुला श्री साईबाबांनी स्वहस्तेलेंडी नाल्याच्या कडेला बाग तयार केली होती. त्याच जागेवर त्याच बागेचे नुतनी करण करुन संस्थानने बाग बसविलेली आहे. यामुळे या लेंडीबागेस विषेश महत्व प्राप्त झालेले आहे. या बागेत बाबांच्या काळात बाबा ज्या बावडीचे पाणी झाडांना देत होते. ती बावडी पण लेंडीबागेत मध्येच आहे. तसेच सदर बागेत पाण्याचा धबधबा, २५ फुट व्यासाचे कमळे तळे असल्यामुळे या ठिकाणी मोठया प्रमाणात साईभक्तांचा येण्याचा कल असतो.

मा. श्री शशीकांत कुलकर्णी साहेब,अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांनी दि. १७/०७/२०१४ रोजी लेंडीबागेत राऊंड घेतला असता लॉनची नुतनीकरण तसेच बावडीजवळ ब्लॉक व लॉनच्या कडेने ग्रील बसविण्याचे सुचवीलेले आहे. लेंडीबागेत विभागामार्फत सन २००१ नुतनीकरण करण्यात आले आहे. या मध्ये शोभेची झाडे/रोपे व लॉन लावण्यात आलेली होती. परंतु गेट नं ४ ने आत दर्शनासाठी येणारे साईभक्त या लेंडीबागेतूनच जातात. त्यामुळे लेंडीबागेत साईभक्तांची नेहमीच वर्दळ असल्याने लॉनची तुडवा तुडव होते. लेंडीबागेचे नव्याने नुतनीकरण करण्यासाठी विद्युत विभागाद्ववारे लॉन,कमळतळे इ. ठिकाणी लोखंडी जाळी बसविता येईल. अशा जाळीमुळे झाडांचे तसेच लॉनचे संरक्षण होवुन बाग व्यवस्थित राहील.

सदर परीसरातील लॉनची तुडवा तुडव होऊ नये व साईभक्तांना बागेत फिरण्यासाठी बांधकाम विभागाद्ववारे बावडी व आवश्यक त्या ठिकाणी ब्लॉक बसवुन घेता येईल.लेंडीबागेमध्ये असणारी झाडे ही मोठया प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे सदरच्य झाडांची सावली खाली असलेल्या लॉनवर पडते. सावली पडत असल्यामुळे सदरच्या परीसरातील लॉन ही खराब झाल्याचे दिसुन येत आहे. तरी अशा झाडांची छाटनी करुन नविन लॉन तयार करता येईल.

लेंडीबागेत लॉन व शोभेची रोपे लागवड करण्यासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| तपशिल | | रक्कम |
|---|---|---|
| लॉन | १३५०० स्क्वे, फुट x रु.२० | २,७०,००० |
| पोयटा | ६० ब्रास x रु.१८०० प्रती ब्रास | १,०८,००० |
| पोयटा वाहतुक, लॉन लावणे व खोदाई करणेसाठी मजुरी | २०० x ६० | ७०,००० |
| लॉनच्या कडेने शोभेची रोपे | विविध प्रकारची रोपे | १,००,००० |
| खते, ओषधे | | २०,००० |
| | **एकुण-** | **५,६८,०००** |

सदरच्या लेंडीबागेचे नुतनीकरण करणेसाठी अंदाजे रु.५,६८,०००/- (पाच लाख अडुसष्ठ हजार) मात्र खर्च येईल. सदर कामाचे निवीदा बोलावुन काम करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे लेंडीबागेचे नुतनीकरण करणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या रु.५,६८,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, श्रींच्या बावडीमध्ये शेजारुन गेलेल्या ड्रेनेजचे पाणी पाझरणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.४० मौजे- कोऱ्हाळे येथील सर्व्हे नं.९७ मधील डाळींब बागेसाठी शेततळे करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मौजे- कोऱ्हाळे,तालुका राहाता येथील सर्व्हे नं ९७ पै. मधील खातेदार चौधरी यांचे मालकीचे एकुण ०१ हे ६२ आर क्षेत्र दिनांक १४/०१/२०११ रोजी संस्थानने खरेदी केलेले आहे. मूळ शेतमालक यांनी या क्षेत्रात डाळींब बाग बसविलेली होती. संस्थानने सदरचे क्षेत्र खरेदी केल्यामुळे या क्षेत्रावरील डाळींब बागेसह सर्व क्षेत्र संस्थानचे ताब्यात मिळालेले आहे. सदरच्या डाळींबापासुन ३ वर्षात ३,०६,००० (तीन लाख सहा हजार) मात्र चे उत्पन्न संस्थानला कोणताही खर्च न करता मिळालेले आहे.

सध्या चालु असणारी डाळींब बागेची खोती सप्टेंबर महिन्यात संपणार आहे तरी नविन खोती देण्यासाठी आपणास नविन टेंडरधारकास पाण्याची सुविधा ही उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे.

डाळींबाच्या बागेची लागवड करुन १२ वर्ष झालेली आहे. त्यामधील बरीच झाडे पाण्याची कमतरता व तेली नावाच्या रोगाने खराब झालेली आहे. साधारणताः डाळींब बाग लागवडीपासुन आठ वर्षा पर्यंत चांगल्या प्रतीचे डाळींबाचे उत्पन्न येते व त्यानंतर झाडे खराब होण्यास सुरुवात होते. साधारणताः डाळींब झाडाचे आयुष्यमान १२ ते १५ वर्षा पर्यंतचे असते.

उन्हाळ्याच्या दिवसात या विहीरीचे पाणी कमी पडत असल्यामुळे तेथील डाळींब बागेवर त्याचा परिणाम होतो. सध्या पावसाळयाचे दिवस सुरु आहे परंतु पाऊस पडत नसल्यामुळे पाण्याच्या अभावी सदर बागेतील झाडे ही वाळत चालली आहे. तरी सदरच्या डळींब बागेला मुबलक पाणी न मिळाल्यामुळे तेथील बाग ही नाशवंत होण्याच्या मार्गावर आहे.

डाळींब बागेतील झाडांना मुबलक पाणी मिळावे यासाठी बागेजवळच अर्धा एकराचे शेततळे तयार करता येईल व यापासुन उत्तम प्रकारे पाण्याची सोय उपलब्ध होईल. अशा शेततळ्यापासुन बागेतील झाडांना बाराही महिने मुबलक पाणीपुरवठा होऊन सदर बागेपासुन चांगल्या प्रकारे संस्थानला उत्पन्न मिळु शकेल. सदर कामासाठी अंदाजे रु.५,००,०००/- (पाच लाख) खर्च येईल व नविन रोपे लागवडीस रु.१,००,०००/- (एक लाख) असे मिळुन रु.६,००,०००/- (सहा लाख) मात्र खर्च येईल.

तपशिल खालील प्रमाणे-

| अ.नं | तपशिल | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| ०१ | खोदाई | १,५०,०००/- |
| ०२ | प्लास्टीक कागद | २,५०,०००/- |
| ०३ | कंपाऊंड जाळी व अँगल | ४०,०००/- |
| ०४ | फिनीशींग | २०,०००/- |
| | **एकुण-** | **४,६०,०००/-** |

सदर अं.नं.०१,०२ व ०४ चे खोदाई , प्लास्टीक कागद , फिनीशींग इ. काम बांधकाम विभागा मार्फत करुन घेता येईल. तसेच अ. नं ०३ कंपाउंड जाळी व अँगल चे काम विद्युत विभागा मार्फत करता येईल.तरी सदरचे काम हे सहा महिन्याच्या आत पुर्ण होईल.

सदरचे क्षेत्र शिर्डी पासुन दुर असल्यामुळे ते वहीवाटी ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे शेजारचे अतिक्रमण करणार नाही तसेच नविन डाळींबाची बाग केल्यास खोती देता येईल. तरी सदरच्या डाळींब बागेसाठी शेततळे करणेस ५,००,०००/- (रु. पाच लाख) मात्र व नविन रोपे लागवड करण्यासाठी अंदाजे रु.१,००,०००/- (एक लाख) मात्र खर्च येईल. शेततळे व नविन रोपांची लागवड यासाठी एकुण ६,००,०००/- (सहा लाख) मात्र खर्च येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१ श्री साईप्रसादालयाचे कार्यालयातील दरवाज्याकरीता एअर कर्टन (वायुविभाजक) खरेदी करणेसाठी अंदाजित रु.२,५०,०००/- इतक्या खर्चाचे व फेर प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक १५-०९-२०१२ चे सभेतील विषय क्र.४५ निर्णय क्र.७६६ अन्वये श्री साई प्रसादालयाचे कार्यालयाची ए.सी.यंत्रणा सुस्थितीत चालणेकामी व सदर ठिकाणचे तापमान नियंत्रीत राहावे यासाठी दरवाजांना एअरकर्टन (वायुविभाजक) बसविणे व याकामी अंदाजे रक्कम रुपये ९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक०८-१०-२०१३ चे सभेतील विषय क्र.१०१ निर्णय क्र.८०० अन्वये फेर कोटेशन मागविणेस मान्यता मिळाली होती. त्यानुसार जा.नं.एसएसएस/ विदयुत/ ५५६२/ २०१४ दिनांक ०५-०३-२०१४ अन्वये कोटेशन धारकांना पत्र पाठवून कोटेशन्स मागविण्यात आलेली होती. दिनांक १७-०७-२०१४ रोजीचे मा.उप समितीचे सभेमध्ये खालीलप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स उघडण्यात आले होते.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील दर रु. |
|---|---|---|
| ०१). | मे.अॅक्सेनिक सिस्टिम्स, बोरीवली (पुर्व), मुंबई | २,६३,४१९/- |
| ०२). | मे.रुसेल एअरफ्लो सिस्टिम्स प्रा.लि., सांताक्रुझ (प), मुंबई | २,०२,४३६/- |
| ०३). | मे.लकी रेफ्रिजरेशन, नाशिक | ४,२०,०००/- |

त्यानुसार या सभेमध्ये विषय क्र.३ निर्णय क्र.५६७ अन्वये प्राप्त झालेली कोटेशन्स उघडण्यात येऊन कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करणेत येऊन प्रत्येक कोटेशनमध्ये रुपये २,००,०००/- पेक्षा जास्त किमतीचे दर प्राप्त झाल्याने आणि मूळ मंजूरी रुपये ९०,०००/- इतक्या खर्चास असल्याने याकामी येणा-या रुपये २,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता घेण्यासाठी फेर प्रस्ताव सादर करण्यात यावा अशी उपसिमतीने शिफारस मान्य केली.

श्री साई प्रसादालयाचे दरवाज्याकरीता एअरकर्टन (वायुविभाजक) खरेदी करुन बसविणेकामी साधारणतः ३ ते ४ महिन्याचा कालावधी लागू शकतो. त्याकाळातील दरवाढ लक्षात घेऊन सुधारीत अंदाजे येणा-या रु.२,५०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन फेर कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयाच्या कार्यालयातील दरवाज्याकरीता एअर कर्टन (वायुविभाजक) खरेदी करुन बसविणेकामी वर्तमानपत्रामध्ये तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विहीत पध्दतीने फेर निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु२,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४२ श्री साईप्रसादालय स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविकः-** सन १९९९ पासून प्रसादालयात अन्न शिजविणेसाठी थरमॅक्स कंपनीच्या RXG-4 स्टीम बॉयलर वापरणेत येत आहे. माहे जानेवारी २००९ पासून नविन प्रसादालय सुरू करतांना थरमॅक्स कंपनीचा RXD 850 स्टीम बॉयलर बसविणेत आलेला आहे. त्याशिवाय श्री साईप्रसादालयातील मोतीचूर लाडु प्रसाद बनविणेकामी थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेसाठी थरमॅक्स कंपनीचा थर्मिक फ्ल्युड हिटर ऑगष्ट्र २००९ पासुन कार्यन्वित करणेत आलेला आहे.

सन १९९९ पासुन RXG-4 स्टीम बॉयलर करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट थरमॅक्स कंपनीने झोन प्रमाणे ठरवून दिलेला अधिकृत फ्रँचीसला द्यावे लागत असल्याने सन २०१० पासून दोन स्टीम बॉयलर

व थर्मिक फ्ल्युड हिटर चे वार्षिक कॉन्ट्रक्ट मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देण्यात आलेले आहे. सन २०१३- १४ या वर्षाचे RXG-4, RXD 850 या स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट हे ३०/०९/२०१४ रोजी संपणार आहे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी वार्षिक सर्व्हीसींगचे काम समाधानकारक व वेळेत पुर्ण करुन दिलेले आहे.

सन २०१४-२०१५ करीता दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटर सुस्थितीत ठेऊन कार्यान्वित राहणेसाठी वार्षिक सर्व्हीसींग कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे असल्यामुळे मॅक्सीथर्म वर्क्स औरंगाबाद यांनी उपरोक्त संदर्भिय कोटेशनद्वारे सन २०१४-२०१५ (दि.१.१०.२०११४ ते ३०.९.२०१५) या वर्षासाठी RXG-4, RXD 850 व थर्मिक फ्ल्युड हिटरसाठी खालीलप्रमाणे वार्षिक सर्व्हीसींगचे दर कळविलेले आहे. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट मध्ये दोन महिण्यांनी एक याप्रमाणे प्रत्येक युनिट साठी सहा सर्व्हिसींग करुन देणार आहे.

| **अ.नं.** | **बॉयलरचे नाव** | **२०१३-१४ मागील वर्षीचे दर** | **२०१४-१५ वार्षिक सर्व्हिसींग करीता दिलेले दर** |
|---|---|---|---|
| १. | RXG-4 | २७,५००/- + सर्व्हिस टॅक्स | २९,५००/- + सर्व्हिस टॅक्स |
| २. | RXD 850 | २७,५००/- + सर्व्हिस टॅक्स | २९,५००/- + सर्व्हिस टॅक्स |
| ३. | थर्मिक फ्ल्युड हिटर | २७,५००/- + सर्व्हिस टॅक्स | २९,५००/- + सर्व्हिस टॅक्स |
| | **एकुण** | **८२,५००/- + सर्व्हिस टॅक्स** | **८८,५००/- + सर्व्हिस टॅक्स** |

**मागणी:-** दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटर सुस्थितीत ठेऊन कार्यान्वित राहणेसाठी वार्षिक सर्व्हीसींग कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे असल्यामुळे थर्मॅक्स कंपनीचे अधिकृत डिलर मे. मॅक्सीथर्म वर्क्स औरंगाबाद यांना वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणे आवश्यक आहे.

मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी दिलेले दरपत्रक मध्ये ५०% ॲडव्हान्स व टेक्नीशियन यांना राहण्याची व्यवस्था होणेबाबतची मागणी केलेली आहे. परंतु संस्थान सर्व्हिस कॅान्ट्रक्टकामी ॲडव्हान्स देत नाही. कॉन्ट्रक्टची रक्कम दर दोन महिन्यांनी सहा हप्तात सर्व्हिसींग झालेनंतर आदा करणेत येते. सर्व्हिसींग साठी येणाऱ्या टेक्नीशियन यांना यापुर्वी आपण निवास व्यवस्था दिलेली नाही. त्यामुळे त्याबाबत त्यांना तसे कळविण्यात येईल. तसेच कॉन्ट्रक्ट दिनांक ३०.९.२०१४ रोजी संपणार असल्याने सदर प्रस्तावाची कार्यवाही दिनांक ३०/०९/२०१४ पुर्वी पुर्ण करावी लागणार आहे. त्याकामी श्री साईप्रसादालय सन २०१४-१५ अंदाज पत्रकात मशिनरी दुरुस्ती व देखभाल कामी रक्कम रु.८,२३,९८३/- शिल्लक आहेत.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार नुसार अनुमान :- तांत्रिक.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- तरी थरमॅक्स कंपनीचे अधिकृत फ्रॅंचीस मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना सन २०१४-२०१५ या वर्षाकरीता दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेस व त्याकामी सर्व्हीस फी रु.८८,५००/- + सर्व्हीस टॅक्स (लागू असेल तो) चे खर्चास मान्यता घेणेसाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन (त्रिसदस्यीय) समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७१८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे दि.०१/१०/२०१४ ते दि.३०/०९/२०१५ या कालावधीसाठी मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व याकामी येणाऱ्या रु.८८,५००/- + सर्व्हीस टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४३ डॉ.विजय माधवराव व्यवहारे यांचा श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये व्हिजीटींग परफ्युजनिस्ट म्हणून मुदतवाढ मिळणेबाबतचा दि.२९.०७.२०१४ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** डॉ. विजय माधवराव व्यवहारे यांनी दि. २९/०७/२०१४ रोजी अर्ज सादर करुन त्यात असे म्हटले आहे की, मी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये व्हिजीटींग परफयूजनिस्ट म्हणून कार्यरत आहेत. माझी मुदत संपुष्टात येत असल्याने मला मुदतवाढ मिळावी.

मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. ०७/०२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १०८ अन्वये डॉ. विजय माधवराव व्यवहारे यांची जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/ ९६९९/ २०१३ दि.३०/०३/२०१३ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये व्हिजीटींग परफयूजनिस्ट म्हणून प्रती शस्त्रक्रिया रु.२,०००/- मात्र या मानधनावर ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांचे सदरचे नेमणुकीचा कालावधी दि.२८/०२/२०१४ रोजी संपुष्टात आला आहे. श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी मंजूर असलेल्या आकृतीबंधात परफयूजनिस्ट या पदाच्या तीन जागा

मंजूर आहेत. त्यापैकी एक कामय व एक ११ महिने कालावधीसाठी असे दोन कर्मचारी कार्यरत आहेत. कामाचा वाढता व्याप विचारात घेता आणखी एक परफयूजनिस्ट ठेकेदारामार्फत घेणेबाबत मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.०३/०८/२०१४ रोजीचे सभेमध्ये निर्णय झालेला आहे. सदर निर्णयानुसार कामगार विभागामार्फत कार्यवाही करणेच्या मान्यतेस्तव दि.०५/०८/२०१४ रोजी टिपणी सादर करण्यात आलेली आहे. दरम्यानचे काळात श्री.अनेसिम प्रभाकर भिंगारे यांनी दि. ३१/०७/२०१४ रोजी व्हिजीटींग परफयूजनिस्ट म्हणून घेणेबाबत विनंती अर्ज सादर केला होता. त्यांचे अर्जावरील प्र. वैद्यकिय संचालक यांचे अभिप्रायानुसार श्री भिंगारे यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे व्हिजीटींग परफयूजनिस्ट म्हणून घेणेच्या निर्णयास्तव मा. त्रिसदस्यीय समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, इतर वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी आदि. पदे भरणेकामी अर्ज मागविणेसाठी संस्थान वेबसाईटवर व दि. ३०/०७/२०१४ रोजीचे वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरचे जाहिरातीमध्ये आकृतीबंधास अनुसरुन परफयूजनिस्टचे दोन पदाचा समावेश आहे. त्यानुसार अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि.१६/०८/२०१४ आहे. सदरच्या प्रक्रियेस २ ते ३ महिने अवधी लागण्याची शक्यता आहे.

उपरोक्त परिस्थितीनुसार सध्या कार्यरत असलेले दोन व नवीन घ्यावयाचे दोन असे चार परफयूजनिस्ट होत आहे. आकृतीबंधात तीन जागा मंजूर असून आणखी एका जागेचा समावेश करणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु असून त्यास काहीसा कालावधी लागणार आहे. श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये दोन कार्डीयाक ओ.टी. सुरु असून सर्जरींचे प्रमाण पाहता वैद्यकिय सेवेत अडथळा येऊ नये याकरीता डॉ. विजय माधवराव व्यवहारे यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे व्हिजीटींग परफयूजनिस्ट म्हणून सहा महिन्यांसाठी पूर्वीच्याच अटी-शर्तीनुसार नेमता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये असलेली परफ्यूजनिस्टची आवश्यकता विचारात घेता, डॉ.विजय माधवराव व्यवहारे यांची पुर्वीचेच अटी/शर्तीवर श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ०६ महिने कालावधीकरीता व्हिजीटिंग परफ्यूजनिस्ट म्हणून कंत्राटी पध्दतीने कुशल कामगार म्हणून तात्पुरती नेमणूक करणेत यावी.**

**तसेच दरम्यानचे कालावधीत जाहिरात प्रक्रियेव्दारे परफ्यूजनिस्ट या पदावर योग्य उमेदवार उपलब्ध झाल्यास व्हिजीटिंग परफ्यूजनिस्टची तात्पुरती करणेत आलेली नेमणूक संपुष्टात आणणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४४** **आर.एम.ओ. या पदावर ११ महिने कालवधीसाठी नेमणूक करणेबाबत.**
**निर्णय क्र.७२०** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४५** **रुग्णालये ॲब्युलन्ससाठी डॉक्टर, सिस्टर, वॉर्डबॉय यांना देण्यात येणाऱ्या अलाऊन्समध्ये वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी वापरात असलेल्या रुग्णवाहिकांचे दर रुग्णांकरीता कि.मी. प्रमाणे मा.व्य.स. च्या सभेमध्ये निश्चीत करण्यात आले आहेत. अत्यवस्थ रुग्णांची परीस्थिती पाहुन रुग्णवाहिकेत असलेली मशिनरी रुग्णांस योग्य पद्धतीने वापरण्यासाठी आरएमओ डॉक्टर, नर्स, वॉर्डबॉय यांना पाठविले जाते, निर्णय क्र.७९०/१९.११.२०११ अन्वये त्यांचे विशिष्ट दर ठरविण्यात आले आहेत. तथापि, सदर अलाऊन्समध्ये रु.२५०/- पासुन ते १,०००/- पर्यंत वाढ करणेबाबत डॉक्टरांची मागणी आहे. प्रवासात त्यांचे जेवण, चहापान इ. खर्च अनिवार्य असतो. त्यामानाने अलाऊन्स कमी असल्याने ते रुग्णवाहिकेबरोबर जाण्यास टाळाटाळ करतात. त्यांच्या मागणीस अनुसरुन व इतर रुग्णालयांचे तुलनेत आपले सध्याचे दर यावरुन वाढीचा प्रस्ताव खालीलप्रमाणे प्रस्तावित करत आहे.

| अ. नं. | रुग्णवाहिका प्रकार | आनंदऋषी हॉस्पिटलचा दर रु. | श्री साईबाबा हॉस्पिटलचे सध्याचे दर रु. | प्रस्तावित १२ तास व १५० ते २५० किमी पर्यंत दर रु. |
|---|---|---|---|---|
| १ | रुग्णवाहिका | Oxygen - Rs.**300**/- | Oxygen - Rs.200/- RMO-Rs.**250/-** | Oxygen - Rs.200/- RMO - Rs.**750/-** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (पेट्रोल) @ ६ km | RMO-Rs.**500/-** Nurse-Rs.**200/-** | Nurse-Rs.**100/-** Ward Boy- Rs.**50/-** | Nurse - Rs.**350/-** Ward Boy - Rs.**200/-** |
| २ | रुग्णवाहिका (डिझेल) @ ५ km | Oxygen - Rs.300/- RMO-Rs.500/- Nurse-Rs.200/- | Oxygen - Rs.200/- RMO - Rs250/- Nurse - Rs.100/- Ward Boy - Rs.50/- | Oxygen - Rs.200/- RMO-Rs.**750/-** Nurse-Rs.**350/-** Ward Boy- Rs.**200/-** |
| ३ | कार्डीयाक ॲब्युलन्स @ ७ km | Oxygen - Rs.300/- Pulse Oxymeter- Rs.200/- Portable Ventilator- Rs.500/- RMO-Rs.500/- Nurse-Rs.200/- | Oxygen - Rs.200/- Portable Ventilator - Rs.300/- Multipara Monitor - Rs.200/- Suction Machine - Rs. 50/- RMO-Rs.250/- Nurse-Rs.100/- Ward Boy- Rs.50/ | Oxygen - Rs.200/- Portable Ventilator - Rs.300/- Multipara Monitor - Rs.200/- Suction Machine - Rs. 50/- RMO-Rs.**750/-** Nurse-Rs.**350**/- Ward Boy- Rs.**200/** |

तसेच २५० कि.मी.चे पुढे उदा.पुणे, मुंबई इ. साठी आरएमओ रु.१,०००/-, नर्स रु.५००/- व वार्डबॉय रु.३००/- अशाप्रकारे इतर रुग्णालयाच्या तुलनेत श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटलमधील आरएमओ डॉक्टर्स, नर्स व वॉर्डबॉय यांना वाढ करण्यास मंजुरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यिय समितीच्या सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.७२१** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मागील आर्थिक वर्षामध्ये सदरहू अलाऊन्सकामी किती खर्च झालेला आहे, याच्या अहवालासह नवीन प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४६** **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.- II विभागाकरीता Fully Automated Horizontal Autoclave Machine Buyback करुन नविन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – १७ (२) ण.

प्रास्ताविक– श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी. II या विभागात वेगवेगळया प्रकारच्या ह्दय शत्रक्रिया होत असतात. सदर शत्रक्रियेकरिता लागणारे Surgical Instruments निर्जंतुक करण्यासाठी उपरोक्त Autoclave Machine चा वापर होत असतो. सध्या सी.व्ही.टी.एस. ओ. टी.– II या विभागात असलेले Autoclave Machine हे सन 2006 या वर्षात मे. एम. शहा अॅण्ड कंपनी, पुणे यांचेकडून खरेदी केले होते. परंतु सध्या ते नादुरुस्त झालेले आहे व ते दुरुस्त देखील होणार नाही, असा बायोमेडिकल विभागाचा अभिप्राय आहे. त्यामुळे सी.व्ही.टी.एस. ओ.टी. II या विभागाने नविन मशिनची मागणी केलेली आहे. सदर मशिनची घसारा वजा जाता किंमत रु. 12,147/- इतकी आहे. सदर Fully Automated Horizontal Machine खरेदीकामी **M/s. M. Shah & Co., Pune** यांचेकडून अंदाजे खर्चासाठी ईमेलद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि. 19/06/2014 चे ईमेलद्वारे सदर Fully Automated Horizontal Autoclave Machine चे खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Fully Automated Horizontal Autoclave Machine | 1 | 4,95,000.00 | 4,95,000.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 4,95,000.00 |

उपरोक्त 01 नग Fully Automated Horizontal Autoclave Machine खरेदीकामी अंदाजे रु. 4,95,000/- इतका खर्च अपेक्षित आहे.

मागणी– श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. II यांचे दि. 14/03/2014 रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार प्राप्त दि. 03/04/2914)

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)

अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत– सी.व्ही.टी.एस. ओ.टी II या विभागात असलेले **Autoclave Machine** हे सन **2006** या वर्षात मे. एम. शहा अॅण्ड कंपनी, पुणे यांचेकडून खरेदी केले होते. परंतु सध्या ते नादुरुस्त झालेले आहे व ते दुरुस्त होणार नाही, असा बायोमेडिकल विभागाचा अभिप्राय आहे. सध्या सदर मशिनची घसारा वजा जाता किंमत रु. 12,147/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रु. 50,000/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम, 2004 मधील कलम 17(04) अन्वये खरेदीपूर्वी शासनाची मान्यता घ्यावी लागणार नाही. त्यामुळे नवीन मशिन खरेदी करणेस व जुने मशिन **buyback** करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे **Fully Automated Horizontal Autoclave Machine** विहीत पद्धतीने निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणा-या पुर्णांकित रक्कम रु.4,95,000/- चे खर्चास व जुने मशिन **buyback** करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.- II विभागाकरीता Fully Automated Horizontal Autoclave Machine Buyback करुन नवीन मशिन खरेदी करणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु४,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४७ श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT-I करीता Surgical Instrument खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – १७ (२) ण.

प्रास्ताविक– श्री साईबाबा रुग्णालयातील **CVTS OT I** या विभागाने दि.१३/०६/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये खालीलप्रमाणे **Surgical Instrument** ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले **Instrument** हे वापरुन खराब झालेले असुन कार्डियाक शत्रक्रियेकरिता सदरहू **Instrument** आवश्यक असतात त्यामुळे सदरचे **Instrument** खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी **M/s. Kalelkar Surgical Industries, Mumbai** यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी रक्कम रु. ७१,०५०/- इतका खर्च अपेक्षित आहे, त्याच तपशील खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Instrument | Qty. | App. Rate in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Wire Holder 7” | 15 Pc | 1330.00 | 19950.00 |
| 02. | Wire Twister with T/C Jaws, 18 cm/7” | 4 Pc | 6730.00 | 26920.00 |
| 03. | Wire Twister with T/C Jaws, 20 cm/8” | 2 Pc | 8020.00 | 16040.00 |
| 04. | Needle Holder Mayo-Heger 20 cm/8” | 6 Pc | 630.00 | 3780.00 |
| 05. | Needle Holder Mayo-Heger 15 cm/6” | 6 Pc | 530.00 | 3180.00 |
| 06. | Scalpel / B.P. Handle No. 7 18 cm | 4 Pc | 155.00 | 620.00 |
| 07. | Scalpel / B.P. Handle 14 cm No. 4 | 4 Pc | 140.00 | 560.00 |
| | | | Total Rs. | 71050.00 |

मागणी– श्री साईबाबा रुग्णालय सी.व्ही.टी.एस. ओ.टी. १ यांचे दि.१३/०६/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि.०४/०७/२०१४)

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत– **CVTS OT- I** या विभागातील सध्या असलेले **Surgical Instrument** हे वापरुन खराब झालेले आहे व ते कार्डियाक शत्रक्रियेकरिता आवश्यक असतात. त्यामुळे नवीन खरेदी करणे गरजेचे आहे.

तरी वरीलप्रमाणे Surgical Instrument विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. ७१,०५०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT-I करीता Surgical Instrument खरेदी करणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु७१,०५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४८ श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाकरीता फर्निचर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद– १७ (२) ण.

प्रास्ताविक– श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाने विविध प्रकारच्या हॉस्पिटल/ कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढल्यामुळे कॉटची संख्या देखील वाढत आहे. त्यामुळे तेथे नविन फर्निचरची मागणी कलेली आहे तसेच ब-याच वॉर्ड/ विभागातील फर्निचर हे वापरुन खराब झालेले आहे, त्यामुळे त्यांनी नवीन फर्नीचर मिळणेबाबत मागणी केलेली आहे. विविध वॉर्ड/ विभागाने मागणी केलेल्या फर्नीचरचा तपशिल सोबतच्या तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

उपरोक्त फर्निचर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.७,९९,४२१/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी ही मा. त्रिसदस्य समिती सभेची मान्यता मिळाल्यानंतर विहित पद्धतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदी करता येईल.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान– अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत– तरी सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे फर्नीचर विहित पद्धतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.७,९९,४२१ चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाकरीता फर्निचर खरेदी करणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु७,९९,४२१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच याठिकाणच्या जुन्या निरुपयोगी फर्निचरची विहीत पध्दतीने विक्री करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४९ श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सेंट्रल मेडीकल गॅस प्लँट विभागाकरीता एअर कॉम्प्रेसर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध एकूण ६ ऑपरेशन थिएटर्स, एकूण ४ सी. आर. यु., जी. आय. सी. यु आणि आय. सी. सी. यु. तसेच विविध वॉर्डस करिता सन २००५ यावर्षी सेंट्रल मेडिकल गॅस सिस्टीम मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांचेकडून एकूण रु. २७,५१,६८८/- इतक्या रकमेत बसवून घेण्यात आली आहे. सदर सिस्टीमच्या मेडिकल गॅस प्लँट मध्ये एकूण दोन व्हॅक्युम पंप, दोन एअर कॉम्प्रेसर, कंट्रोल पॅनल इ. विविध अॅक्सेसरीजसह बसविणेत आले आहेत.

मेडिकल गॅस प्लँट मध्ये एकूण दोन व्हॅक्युम पंप, दोन एअर कॉम्प्रेसर, कंट्रोल पॅनल इ. मशिनरी बसविणेत आले पासुन (६ वर्षापासून) २४ तास सतत सुरु असतात. ऑपरेशन थिएटर्स व आय. सी. सी. यु. येथे अत्यवस्थ रुग्णांना कृत्रीम श्वासोच्छवास देणेसाठी व्हेंटिलेटर्स करीता

एअर कॉम्प्रेसर द्वारे कॉम्प्रेसड एअरचा पुरवठा पाईपलाईन द्वारे केला जातो. त्यामुळे सदर कॉम्प्रेसरवर कामाचा बोजा हा खूपच वाढलेला आहे.

सध्या ऑक्सिजन प्लँटमध्ये दोन कॉम्प्रेसर आहेत. त्यापैकी एक Kirloskar कंपनीचा कॉम्प्रेसर असुन तो सन २००५ या वर्षात खरेदी केलेला आहे. तो सध्या खराब झालेला असुन कंपनीने त्याचे उत्पादन देखील बंद केलेले आहे, त्यामुळे बाजारात त्याचे स्पेअर पार्टस् उपलब्ध होत नाहीत. त्यानंतर २०१२ मध्ये Screw Type 15 HP क्षमतेचा एक कॉम्प्रेसर खरेदी केला होता. सध्या सदर कॉम्प्रेसरवर पुर्ण लोड आहे. तो जर ऐनवेळेस बिघडला तर मोठी अडचण निर्माण होईल, त्यामुळे एक पर्यायी (Stand By) त्याच मॉडेलचा कॉम्प्रेसर खरेदी करणे गरजेचे आहे असे बायोमेडिकल विभागाचे म्हणणे आहे त्यामुळे बायोमेडिकल विभागाने (Oxygen Plant) दि. १८/०४/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये नवीन 15 HP क्षमता असलेल्या Compressor एक नगाची मागणी केलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सेंट्रल मेडिकल गॅस सिस्टीम करीता एक नवीन एअर कॉम्प्रेसर तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पेशंटची संख्या व त्या अनुषंगाने व्हेंटिलेटर्स ची संख्या सन २००५ पेक्षा दुप्पटीपेक्षा अधिक प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे नवीन एअर कॉम्प्रेसर हा १५ एच. पी. क्षमतेचा घेणे योग्य राहील. १५ एच. पी क्षमतेच्या एअर कॉम्प्रेसर (सर्व अॅक्सेसरीज सह) करीता अंदाजे खर्चाकरिता M/s. Almed Equipments, Mumbai यांचेकडून ई-मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरानुसार सदरचे खरेदकामी अंदाजे रक्कम रु.३,६५,६२५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सेंट्रल मेडिकल गॅस सिस्टीम करीता एक नवीन १५ एच. पी. क्षमतेचा एअर कॉम्प्रेसर विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.३,६५,६२५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सेंट्रल मेडीकल गॅस प्लँट विभागाकरीता एअर कॉम्प्रेसर खरेदी करणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,६५,६२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५०** **श्री साईबाबा रुग्णालयातील CRU- I या विभागाकरीता Defibrillator Machine खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४मधील तरतुद**:- १७ - २ (ण)

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I या विभागाने दि.०५/०५/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग Defibrilator Machine ची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे २० खाटांचे ICCU आहे त्यामध्ये काही रुग्ण हे कार्डियाक व कार्डिओलॉजी अशा दोन्ही शस्त्रक्रियेचे असतात. सदर मशिन हे रुग्ण अत्यावस्थेत असल्यावर जेव्हा त्याचे ह्दय बंद पडण्याचे स्थितीत असते त्यावेळेस अशा रुग्णांना सदर मशिनने शॉक देऊन ते पुन्हा कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करणेकामी वापरण्यात येते. सदर विभागात असलेले १ नग Defibrillator मशिन कमी पडत आहे, त्यामुळे त्यांनी नवीन एक नग मशिनची मागणी केलेली आहे.

वरीलप्रमाणे Defibrillator Machine खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी त्यांचे दि. १८/०७/२०१४ रोजीचे ई-मेल द्वारे खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Item Description | Qty. | App. Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | DEFIBRILLATOR (Biphasic with recorder) Biphasic with 24 event recording, synchronized cardion version, thermal printing. | 1 | 2,08,125.00 | 2,08,125.00 |
| | | | **Total In Rs.-** | **2,08,125.00** |

वरीलप्रमाणे खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २,०८,१२५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी:-** श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I विभागाकडील मागणीपत्र दि. ०५/०५/२०१४ (औषध भांडार प्राप्त दि. ०४/०६/२०१४).

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I या विभागात सध्या असलेल्या २० खाटांवर कायम रुग्ण असतात, त्यामुळे सध्या असलेले ०१ नग Defibrillator Machine रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे कमी पडत आहे, त्यामुळे त्यांनी नवीन मशिनची मागणी केलेली आहे, तरी नवीन मशिन घेण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी CRU I विभागाकरिता Defibrillator Machine विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. २,०८,१२५/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.७२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CRU- I या विभागाकरीता Defibrillator Machine खरेदी करणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु २,०८,१२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.५१ **सन २०१२-१३ मधील वार्षीक खरेदीमधील मंजुर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** १७-२(ण)

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक :-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात लागणारे वार्षिक औषधे सन २०१३-१४ करिता मा. त्रिसदस्य समिती सभा दि.२६/०७/२०१३ निर्णय क्र. ५६४ अन्वये तर मा. उच्च न्यायालयाचे दि.२५/१०/२०१३ रोजी मान्यता मिळालेली आहे. मा. उच्च न्यायालयाने निविदेवर निर्णय घेणेकामी नियुक्त केलेल्या खरेदी समितीने पुरवठा धारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन मा. त्रिसदस्य समिती सभा दि. १५/०३/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. २५४ अन्वये दि. १९/०३/२०१४ रोजी एकूण ६६ पुरवठाधारकांना एकूण रु. ३०,५२,८८,३५८/- रक्कमेचा वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

सोबतच्या यादीतील औषधे/ सर्जिकल साहित्य इत्यादींची वार्षिक खरेदी मध्ये मागणी केलेली होती, परंतु त्यासाठी एकाही निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले नाही तर औषधांची निवड करत असताना ज्या ठिकाणी काही औषधांसाठी एकाच कंपन्यांचे दर आलेले आहे परंतु ते नामांकित कंपन्यांचे किंवा मागणी प्रमाणे नाहीत अशा औषधांच्या फेरनिविदा मागविण्यात यावेत असे ठरले, तेव्हा निविदा न आलेले व फेर निविदा मागविण्याची शिफारस केलेली अशी एकुण ६०५ औषधांकरिता पुन्हा दि. १५/०७/२०१४ अखेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

सदर निविदा उघडून त्यावर समितीचा निर्णय होऊन अंतिम निर्णय घेणेकामी अंदाजे १ ते २ महिन्यांचा कालावधी लागेल तो पर्यंत सोबतच्या यादीतील औषधे जी दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे, ती मागील वर्षाचे (सन २०१२-१३) मंजूर दराने खरेदीचा प्रस्ताव आहे.

कारण दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर एक वर्षाची औषधे मोफत दयावी लागतात. त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहे.

सदर औषधे व सर्जिकल साहित्य मागील वार्षिक मंजुर दरानुसार (सन २०१२-१३) वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ५,६७,२७०/- इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय/ इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत एक वर्षासाठी मोफत उपचार घेणारे रुग्णांकरीता दयावयाची औषधे खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे औषधे खरेदी करुन याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ५,६७,२७०/- चे खर्चास मान्यता असावी हि विनंती.

**निर्णय क्र.७२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे रु.५,६७,२७०/- मात्र झालेल्या खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५२ सन २०१२-१३ मधील वार्षीक खरेदीमधील मंजुर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद :-** १७-२(ण)

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक :-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात लागणारे वार्षिक औषधे सन २०१३-१४ करिता मा. त्रिसदस्य समिती सभा दि.२६/०७/२०१३ निर्णय क्र.५६४ अन्वये तर मा. उच्च न्यायालयाचे दि.२५/१०/२०१३ रोजी मान्यता मिळालेली आहे. मा. उच्च न्यायालयाने निविदेवर निर्णय घेणेकामी नियुक्त केलेल्या खरेदी समितीने पुरवठा धारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन मा. त्रिसदस्य समिती सभा दि. १५/०३/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. २५४ अन्वये दि. १९/०३/२०१४ रोजी एकूण ६६ पुरवठाधारकांना एकूण रु. ३०,५२,८८,३५८/- रक्कमेचा वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

सोबतच्या यादीतील औषधे/ सर्जिकल साहित्य इत्यादींची वार्षिक खरेदी मध्ये मागणी केलेली होती, परंतु त्यासाठी एकाही निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले नाही तर औषधांची निवड करत असताना ज्या ठिकाणी काही औषधांसाठी एकाच कंपन्यांचे दर आलेले आहे परंतु ते नामांकित कंपन्यांचे किंवा मागणी प्रमाणे नाहीत अशा औषधांच्या फेरनिविदा मागविण्यात यावेत असे ठरले, तेव्हा निविदा न आलेले व फेर निविदा मागविण्याची शिफारस केलेली अशी एकुण ६०५ औषधांकरिता पुन्हा दि. १५/०७/२०१४ अखेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

सदर निविदा उघडून त्यावर समितीचा निर्णय होऊन अंतिम निर्णय घेणेकामी अंदाजे १ ते २ महिन्यांचा कालावधी लागेल तो पर्यंत सोबतच्या यादीतील औषधे जी दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे, ती मागील वर्षाचे (सन २०१२-१३) मंजूर दराने खरेदीचा प्रस्ताव आहे.

कारण दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर एक वर्षाची औषधे मोफत दयावी लागतात. त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहे.

सदर औषधे व सर्जिकल साहित्य मागील वार्षिक मंजुर दरानुसार (सन २०१२-१३) वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ६,५२,१४२/- इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे / सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत एक वर्षासाठी मोफत उपचार घेणारे रुग्णांकरीता दयावयाची औषधे खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे औषधे खरेदी करुन याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.६,५२,१४२/- चे खर्चास मान्यता असावी हि विनंती.

**निर्णय क्र.७२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे रु.६,५२,१४२/- मात्र झालेल्या खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५३ सन २०१३-१४ मधील वार्षीक खरेदीमधील मंजुर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७-२(ण)

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०७/२०१३ निर्णय क्रमांक ५६४ Clause No.९ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु.२५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ६६ पुरवठाधारकांना एकुण रक्कम रु. ३०,५२,८८,३५८/- चे दि.१९/०३/२०१४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे. तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यांचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. वार्षीक मागणी पुर्ण झालेली आहे. व ती औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना दि.१६/११/२०१३ रोजी कार्यान्वित झालेली आहे. तर वार्षीक मागणी प्राप्त होऊन त्यावर मा. त्रिसदस्य समिती सभा दि.२६/०७/२०१३ चे निर्णय क्र.५६४ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे वार्षीक मागणी मधील संख्या कमी पडेल म्हणून जी औषधे/ सर्जिकल साहित्य हे सदर योजने अंतर्गत रुग्णालयासाठी लागतील त्याची अतिरिक्त मागणी वाढवण्यात आलेली आहे अशा एकुण ५८ औषधांसाठी एकुण रक्कम रु.१,३८,४७,४१२ चे खर्चास मा. त्रिसदस्य समिती ची दि.१२/०४/२०१४ रोजी मान्यता मिळालेली असून प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्यास मान्यता मिळणे आहे.

त्यास मान्यता मिळालेनंतर अंतिरिक्त मागणी वार्षीक मंजुर दराने खरेदी करता येईल. परंतु तो पर्यंत रुग्णांना उपचार चालू ठेवणेसाठी सोबतच्या यादीतील औषधांची गरज आहे.

सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा अचानक वाढलेला आहे, राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळतो. त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य वार्षीक मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहे. ती एकाच वेळी खरेदी करुन ठेवता येत नाही जर असे केले तर ती मुदत बाह्य होण्याची शक्यता जास्त असते. व त्यामुळे संस्थानचे मोठे आर्थिक नुकसान होईल.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळया मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ३१६२८१/- इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत एक वर्षासाठी मोफत दयावयाची औषधे उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी वार्षीक मंजुर दराने आहे. सदरचे दर विहीत पध्दतीचा अवलंब करुन एक वर्षाकरिता निश्चित केलेले आहे. व त्यास मा. व्यवस्थापन सभा दि.१५/०३/२०१४ निर्णय क्र. २५४ अन्वये मान्यता देखील आहे. त्यामुळे त्याच मंजुर दराने खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदरचे औषधे खरेदी करुन याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.३,१६,२८१/- चे खर्चाची नोंद घेण्याास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.७२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व झालेल्या खर्चाची नोंद घेणेत येऊन, त्यास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५४ श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.नं.१ करीता Paediatric Warmer Blanket खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** १७-२ (ण)

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं १ विभागात Heater Cooler मशिन सन २००५ मध्ये खरेदी करण्यात आले होते. सदर मशिनचा उपयोग रुग्णाचे ऑपरेशन चालू असतांना रुग्णाच्या शरीरातील तापमान कमी झाल्यावर त्यांचे तापमान वाढवणेसाठी उपरोक्त Blanket वापरण्यात येते. सदर Heater Cooler मशिनसाठी लागणारे Paediatric Warmer Blanket हे मशिनसोबत खरेदी केलेले होते. परंतु ते वापरुन लीक (Puncture) झालेले Blanket हे ९ वर्ष वापरलेले आहेत. तेव्हा त्यांनी दि.२८/०६/२०१४ चे मागणीपत्रान्वये एक नग Paediatric Warmer Blanket ची मागणी केलेली आहे.

सदर Heater Cooler मशिन हे Maquet कंपनीचे असल्यामुळे सदर मशिनकरिता Maquet कंपनीचेच Blanket खरेदी करावे लागणार आहे. त्यामुळे सदरचे Blanket खरेदीकामी M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai. यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai. यांनी पत्र क्र.MCC-WR/ABD१४-००७ दि.२२/०७/२०१४ चे पत्रान्वये सदर Warmar Blanket चे दर कळविलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | Rate Per in Rs | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Paediatric Warmer Blanket | 1 | 42289.00 | 42289.00 |
| | | | Tax @ 12.5 % | 5286.13 |
| **Total (All Inclusive) in Rs.-** | | | | **47575.13** |

उपरोक्त १ नग Heater Cooler मशिनसाठी लागणारे Blanket खरेदीकामी अंदाजे रु. ४७५७५.१३ इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणीः-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. १ या विभागाचे दि.२८/०६/२०१४ (औषध भांडार प्राप्त दि.०४/०७/२०१४) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्रायः-** Heater Cooler मशिन हे M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai कंपनीचे असल्यामुळे त्याच कंपनीचे Blanket खरेदी करावे लागणार आहे. त्यामुळे सदर १ नग Blanket हे M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai यांचेकडुनच खरेदी करावे लागणार आहे.

तरी M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून ०१ नग Paediatric Warmer Blanket खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.४७५७५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७३० यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील Heater Cooler मशिन हे Maquet कंपनीचे असल्यामुळे सदर मशिनकरिता Maquet कंपनीचेच Blanket खरेदी करावे लागणार आहे. यासाठी सदरचे Blanket हे M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai यांचेकडुन**

**खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४७,५७५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५५** **श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Elisa Plate Reader with UPS With Printer खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – १७ (२) ण

प्रास्ताविक – श्री साईनाथ रक्तपेढी विभागाने दि. २५/११/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग Elisa Plate Reader with UPS With Printer ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे एक Ranbaxy कंपनीचे Elisa Plate Reader असुन ते सन २००७ या वर्षात खरेदी केलेले असुन त्या मशिनचा Display खराब झालेला आहे व कंपनीकडून दुरुस्तीकामी Service देखील मिळत नाही. त्यामुळे त्यांनी नवीन Elisa Plate Reader with UPS With Printer ची मागणी केलेली आहे.

सदरहू एक नग Elisa Plate Reader with UPS with Printer खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

मागणी– श्री साईबाबा रुग्णालयातील Blood Bank विभागाचे दि. २५/११/२०१३ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ०६/०६/२०१४).

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान– अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत– सध्या रक्तपेढी विभागाकडे एक Ranbaxy कंपनीचे Elisa Plate Reader असुन ते सन २००७ या वर्षात खरेदी केलेले असुन त्या मशिनचा Display खराब झालेला आहे व कंपनीकडून दुरुस्तीकामी Service देखील मिळत नाही. त्यामुळे त्यांनी नवीन Elisa Plate Reader with UPS with Printer ची मागणी केलेली आहे, तरी नवीन खरेदी करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे ०१ नग Elisa Plate Reader with UPS with Printer विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करता येईल तेव्हा याकामी येणा-या अंदाजे रु. २,५०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Elisa Plate Reader with UPS With Printer खरेदी करणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु २,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५६** **श्री साईनाथ रुग्णालयातील कर्ण तपासणी शिबीराकामी श्रवणयंत्र खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयात दि. १४/०५/२०१४ रोजी श्री साईनाथ रुग्णालयाच्या रुग्ण सेवेस ५० वर्ष पुर्ण झाले असल्याने सुवर्ण जयंती उत्सव साजरा करणेसाठी विविध मोफत शिबीरे घेणेबाबत मा. त्रिसदस्य समितीच्या सभेतील विषय क्र. १९ निर्णय क्र. ९५१ दिनांक १३/०१/२०१४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

तसेच शिर्डी परिसरातील गरीब व गरजू ज्येष्ठ नागरिकांसाठी दिनांक १९ मे ते २१ मे २०१४ रोजी रुग्णांची ऑडीओमेट्रिद्वारे कर्ण तपासणी करण्यात आली, यात अंदाजे ३०० रुग्णांना श्रवण यंत्र देण्यात आले आहेत. तथापि, रुग्णांची संख्या जास्त असल्याने साधारणतः २०० रुग्ण हे श्रवण यंत्र मिळण्यापासुन वंचित राहिले आहेत. त्यांची प्रतिक्षा यादी तयार करुन ठेवली आहे. सदरचे रुग्ण वेळोवेळी मशिन आले किंवा नाही याबाबत विचारणा करीत आहेत. सदर रुग्णांना मशिन द्यावयाचे असल्याने यापूर्वी ज्या कंपनी कडून सदरचे श्रवण यंत्र घेतले आहेत, त्या कंपनीला पुर्वीच्याच दराने मशिन देणार का अशी चौकशी केली असता, त्यांनी संस्थानसाठी पूर्वीच्याच दराने श्रवण यंत्र पुरविण्याची तयारी दर्शवली आहे.

परंतु दि. ०७/०७/२०१४ चे टिपणीवर मुख्यलेखाधिकारी साहेब यांनी सदरचे श्रवणयंत्र खरेदीबाबत वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करुन श्रवणयंत्र खरेदी करणे योग्य होईल, असे आदेश दिलेले आहेत. मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी सदर आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. उपरोक्त मशिन खरेदीकामी २०० रुग्ण x रुपये ८५०/- = १,७०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यास मा. त्रिसदस्य समितीची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करता येऊ शकेल.

तरी श्रवणयंत्र विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदीस येणा-या रक्कम रु. १,७०,०००/- चे खचार्स मान्यता असावी.

**निर्णय क्र.७३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील कर्ण तपासणी शिबीरासाठी श्रवणयंत्र खरेदी करणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु १,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५७ श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I विभागाकरीता Syringe Pump खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – १७ (२) ण

प्रास्ताविक– श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I या विभागाने दि.०५/०५/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये १० नग Syringe Pump ची मागणी केलेली आहे. सदर Syringe Pump हे अत्यवस्थ रुग्णांना इंजेक्शनची मात्रा (प्रमाण) नियंत्रित करुन देणेकामी उपयोग होतो. सध्या CRU I विभागात २८ Syringe Pump असुन ते त्यांना कमी पडत आहेत, त्यामुळे त्यांनी नवीन १० नग Syringe Pump ची मागणी केलेली आहे.

सदर Syringe Pump खरेदीकामी अंदाजे प्रती नग रु. ५१,०००/- याप्रमाणे १० नग Syringe Pump खरेदीकामी अंदाजे एकूण रक्कम रु. ५,१०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

मागणी– श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I या विभागाचे दि.०५/०५/२०१४ रोजीचे मागणपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २४/०७/२०१४).

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान– अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत– श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I या विभागात सध्या २८ Syringe Pump आहेत, परंतु रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे Syringe Pump कमी पडत आहे, त्यामुळे त्यांना अजुन १० नग Syringe Pump खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी CRU I विभागाकरिता १० नग Syringe Pump विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ५,१०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७३३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CRU- I विभागाकरीता Syringe Pump खरेदी करणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५८ ई.डी.पी.विभागाकरीता नविन टोनर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील वॉर्ड व इतर विभागांत वेगवेगळया प्रकारच्या प्रिंन्ट काढण्यासाठी टोनर व कार्टेज ची आवश्यकता असते. सध्या त्यांच्याकडे असलेले टोनर हे वापरुन खराब झालेले आहे.

सदर टोनरची मागणी वार्षिक सन २०१३-१४ मध्ये केलेली नव्हती. कारण ई.डी.पी. विभाग हा माहिती तंत्रज्ञान विभागाकडे दि. २५/१२/२०१२ रोजी वर्ग करण्यात आले होते. त्यानंतर दि. २८/०१/२०१४ रोजी ई.डी.पी. विभाग पुन्हा स्वतंत्र करण्यात आलेला आहे. त्यामुळे

त्यांनी वार्षिक सन २०१३-१४ चे खरेदीमध्ये मागणी केलेली नव्हती. म्हणून सदर खरेदी करणे गरजेचे आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | कंपनी | खरेदी नग | अंदाजे किंमत प्रति नग | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | HP 1020 Laserjet – Toner Q2612A /12A | HP | २५ नग | ४,५००.०० | १,१२,५००.०० |
| २ | HP Laserjet CP 1025 Color – Toner CE310 A Black | HP | ०१ नग | ५,०००.०० | ५,०००.०० |
| ३ | HP Laserjet CP 1025 Color – Toner CE311 A Cyan | HP | ०१ नग | ५,०००.०० | ५,०००.०० |
| ४ | HP Laserjet CP 1025 Color – Toner CE312 A Yellow | HP | ०१ नग | ५,०००.०० | ५,०००.०० |
| ५ | HP Laserjet CP 1025 Color – Toner CE313 A Magenta | HP | ०१ नग | ५,०००.०० | ५,०००.०० |
| ६ | HP Laserjet 3392 – Toner 49A | HP | ०२ नग | ३,५००.०० | ७,०००.०० |
| ७ | HP Laserjet M 1136 MFP – Toner CC 388 A / 88A | HP | १० नग | ३,०००.०० | ३०,०००.०० |
| ८ | EPSON LQ 2090 – Reboun Cartridge | EPSON | ०५ नग | १,०००.०० | ५,०००.०० |
| ९ | EPSON FX 2090 – Reboun Cartridge | EPSON | ०५ नग | १,०००.०० | ५,०००.०० |
| १० | Canon LBP 2900 B – Toner 103/303/703 | Canon | १० नग | ४,०००.०० | ४०,०००.०० |
| (अक्षरी रक्कम रु. दोन लाख एकोणावीस हजार पाचशे मात्र) | | | | एकूण रक्कम रु. | २,१९,५००.०० |

उपरोक्त टोनर व कार्टेज खरेदीकामी अंदाजे रु.२,१९,५००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

मागणी:- श्री साईबाबा रुग्णालयातील ई.डी.पी. विभाग यांचे दि. २५/०२/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार प्राप्त दि. ०३/०३/२०१४)

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- सदर टोनरची मागणी वार्षिक सन २०१३-१४ मध्ये केलेली नव्हती. कारण ई.डी.पी. विभाग हा माहिती तंत्रज्ञान विभागाकडे दि. २५/१२/२०१२ रोजी वर्ग करण्यात आले होते. त्यानंतर दि. २८/०१/२०१४ रोजी ई.डी.पी. विभाग पुन्हा स्वतंत्र करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यांनी वार्षिक सन २०१३-१४ चे खरेदीमध्ये मागणी केलेली नव्हती. त्यामुळे खरेदी करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे टोनर व कार्टेज विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. २,१९,५००/- इतक्या रक्कमेच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ई.डी.पी.विभागाकरीता आवश्यक असलेले प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नवीन टोनर व कार्टेज विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु२,१९,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५९** **राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत उपचार घेणाऱ्या रुग्णांकरीता औषधे खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – १७ (२) ण.

प्रास्ताविक– श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात लागणारे वार्षिक औषधे सन २०१३-१४ करिता मा. त्रिसदस्य समिती सभा दि. २६/०७/२०१३ निर्णय क्र. ५६४ अन्वये तर मा. उच्च न्यायालयाचे दि. २५/१०/२०१३ रोजी मान्यता मिळालेली आहे. मा. उच्च न्यायालयाने निविदेवर निर्णय घेणेकामी नियुक्त केलेल्या खरेदी समितीने पुरवठा धारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन मा. त्रिसदस्य समिती सभा दि. १५/०३/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. २५४ अन्वये दि.

१९/०३/२०१४ रोजी एकूण ६६ पुरवठाधारकांना एकूण रु. ३०,५२,८८,३५८/- रक्कमेचा वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर एक वर्षाची औषधे मोफत द्यावी लागतात. विविध वॉर्ड विभागातुन वार्षिक औषधे खरेदी व्यतिरिक्त वेगवेगळया प्रकारची औषधांची मागणी केली जाते. परंतु ती वार्षिक खरेदीमध्ये मागणी नसल्यामुळे वेळोवेळी खरेदी करावी लागतात. त्यामुळे दि. ०२/०५/२०१४ रोजीचे परिपत्रकान्वये वार्षिक मागणी व्यतिरिक्त राजीव गांधी जीवनदायी योजना रुग्णांसाठी लागत असेल त्याची मागणी करावी असे कळविण्यात आले होते. त्यानुसार सोबतच्या यादीप्रमाणे सध्या औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झुमेबल साहित्याची नविन मागणी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार मा. त्रिसदस्य समिती दि. १७/०७/२०१४ रोजीचे सभेत थोडी थोडी औषधे खरेदी करण्याऐवजी डॉक्टरांकडून मागणी घेऊन रु. ९०००००/- (अक्षरी रक्कम रु. नऊ लाख मात्र) पर्यंत लागतील ती औषधे खरेदी करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार सदरची खरेदी करता येईल.

सदर औषधे व सर्जिकल साहित्य सोबतच्या यादीप्रमाणे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु ५०४१३१/- (अक्षरी रक्कम रु. पाच लाख चार हजार एकशे एकतीस मात्र) इतका खर्च येणार आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–

अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात. सदर रुग्णालयाकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत – रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजनेअंतर्गत एक वर्षासाठी मोफत उपचार घेणारे रुग्णांकरिता द्यावयाची खरेदी करणे आवश्यक आहे.

सदरची औषधे वर्तमान पत्रात जाहिरात देऊन विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या पुर्णाकिंत रक्कम रु. ५,०४,१३१/- (अक्षरी रक्कम रु. पाच लाख चार हजार एकशे एकतीस मात्र) चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.७३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत उपचार घेणाऱ्या रुग्णांकरीता औषधे खरेदी करणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु५,०४,१३१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६० सी.टी.स्कॅन (६४ Slice) मशिनचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागात मे.सिमेन्स लि. मुंबई या कंपनीचे Somatom Sensation ६४ CT Scanner हे मशीन पुरवठा आदेश क्र. २८३३/२००५, दि. १५/०३/२००५ अन्वये एकुण रू. ३,९८,३७,८३५/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले असुन सदर मशिन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. १६/०७/२००६ रोजी पूर्ण झालेला आहे. सदर सि. टी. स्कॅन मशिनची दि. ३१/०३/२०१३ रोजी घसारा वजा किंमत रू. ४६,५२,९९५.४२ इतकी आहे. सदर मशीन खरेदी करतेवेळी मा. व्यवस्थापन समितीच्या दि. १६/०२/२००५ च्या सभेतील निर्णय क्र.९५ अन्वये पुढील कालावधीतील सि. टी. स्कॅन मशिनसह खरेदी करण्यात आलेल्या Medrad Pressure Injector, Colour Printer, १५० KVA Stabilizer यांचे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार कंपनीस देण्यात आलेल्या दि.१५/०३/०५ च्या पुरवठा आदेशातील अ.क्र.१५ अन्वये-

Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the second year is Rs.30 Lacs. For subsequent years the escalation of 5% will be applicable. The service tax will be extra.

The CMC includes even the Tube of the CT. Under this contract all parts & labor will be given free of cost. Payment for CMC to be done at start of each year after the demand of company.

मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेशी पुरवठा आदेशानुसार वॉरंटी कालावधी संपलेनंतर आजपावेतो आठ वर्षात CMC चा करार करून वरील निर्णयाप्रमाणे रक्कम अदा करण्यात आली आहे.

कंपनीने मागिल वर्षी नियमीत व तातडीच्या दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण ४१ वेळा भेटी देउन मागील एक वर्षांत अंदाजे रु. ६६,४१,०००/-इतक्या रकमेचे स्पेअर पार्ट बदलले आहेत.

सध्या दि. १७/०७/२०१४ ते दि. १६/०७/२०१५ या कालावधीसाठी CT Scan मशीनचे CMC करणेकरीता करारनाम्यानुसार मे. सिमेन्स ली. मुंबई यांना (+५% वाढ व सर्व्हीस टॅक्स १२.३६%सह) एकुण रू. ४८,९७,६२३/- इतकी रक्कम देय होत आहे. कंपनीने त्यानुसार करारनामा पाठविला आहे.

सदर कालावधीमध्ये कंपनी इंजिनीअर एकुण ४ वेळा नियमित सर्व मशिन्सची सर्व्हीसींग करून मशिन ब्रेकडाऊनचे वेळी दुरूस्ती करीता आवश्यक असणारे सर्व स्पेअर पार्ट (एक्स-रे टयुबसह) बदलणार आहेत आणि त्याकरीता आवश्यक तितक्या वेळा भेटी देणार आहेत. सॉफ्टवेअर व सेफ्टी अपडेट प्रत्येकी ३ वेळा करणार आहेत.

पुढील काळात ते व्यवस्थित कार्यान्वित राहणे कामी तसेच मागील सात वर्षात कंपनीस अदा केलेली रक्कम व त्यांनी केलेला अंदाजे खर्च या बाबींचा विचार करता संस्थानला सद्यस्थितीत मशिनचे कॉम्प्रेहेसीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे जास्त फायदेशीर राहील. कारण जसजसे मशिन जुने होत जाते तसतसे दुरूस्तीचा खर्च देखील वाढत जातो. कंपनीने वरील पुरवठा आदेशातील अटीनुसार CMC करणेसाठी एकूण १०० % रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

सी.टी. स्कॅन मशिन नियमित वापरात असून दररोज अंदाजे २६ रूग्णांची तपासणी करण्यात येते. यानुसार सदर मशीनवर मागीलवर्षी एकुण ९,४४१/- पेशंटचे सी. टी. स्कॅन करण्यात आले आहे. त्याकरीता सदरचे मशीन नेहमी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

तरी CT Scan मशीनचे मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडे दि. १७/०७/२०१४ ते दि. १६/०७/२०१५ या कालावधीसाठी कॉम्प्रेहेसीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु.४८,९७,६२३/- (अक्षरी रु. अठ्ठेचाळीस लाख सत्यान्नव हजार सहाशे तेवीस मात्र) इतक्या रक्कमेच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागातील CT Scan मशीनचे दि.१७/०७/२०१४ ते दि.१६/०७/२०१५ या कालावधीसाठी मे.सिमेन्स लि. मुंबई यांचेकडून कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करुन घेणेस व याकामी येणाऱ्या सर्व करांसहीत एकुण रु.४८,९७,६२३/- मात्रचे खर्चास तसेच, सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६१** **एम.आर.आय.मशिन (Magnetom Avanto) चे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. १५८९५/२००६, दि.१३/११/०६ अन्वये मे. सिमेन्स लि. मुंबई, यांचेकडून Magnetom Avanto मशीन एकुण रू. ५,०५,००,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदरचे मशिन दि. १/०६/०७ रोजी कार्यान्वित करण्यात आले असून कंपनीने मशीनकरीता दिलेला वॉरंटी कालावधी दि. ३१/०५/२००९ रोजी संपला आहे. मशीन खरेदी करणेसाठी दि.१४/१०/२००६ चे व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्र.१३, निर्णय क्र.८६० अन्वये पुढील कालावधीतील दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

'मे. सिमेन्स लि.,मुंबई यांनी मशिनची किंमत रूपये ५.०५ कोटी इतकी दिलेली आहे.याशिवाय कंपनी दोन वर्षाची वॉरंटी देणार असून त्यानतंर तिसऱ्या वर्षापासून कंपनीस (CMC) चार्जेस रूपये २० लाख तर त्यापुढील वर्षासाठी ५% वाढ (Escalation) + सर्व्हीस टॅक्स वेगळा देण्यात यावा .सदर CMC चे दर हे एम.आर.आय.या मशिनसाठी लागणारे Helium gas सह आहे.'

मे. सिमेन्स लि.,मुंबई,यांचेशी वरील निर्णयानुसार वॉरंटी कालावधी संपलेनंतर आजपावेतो दरवर्षी CMC चा करार करून वरील निर्णयाप्रमाणे रक्कम अदा करण्यात आली आहे. कंपनीने मागील वर्षी नियमीत व तातडीच्या दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण २८ वेळा भेटी देउन संपूर्ण एक वर्षांत अंदाजे रु.२३,६२,५००/- इतक्या रकमेचे स्पेअर पार्ट बदलले आहेत (संदर्भ:परीशिष्ट "अ").

एम.आर.आय. मशिन नियमित वापरात असून दररोज अंदाजे ३६ रूग्णांची तपासणी करण्यात येते. यानुसार सदर मशीनवर मागील वर्षी एकुण १३४४९ पेशंटचे एम.आर.आय. स्कॅन झाले आहे. (संदर्भ:परीशिष्ट "ब") त्याकरीता सदरचे मशीन नेहमी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

सध्या दि.०१/०६/२०१४ ते दि. ३१/०५/२०१५ या कालावधीसाठी MRI मशीनचे CMC करणेकरीता करारनाम्यानुसार मे. सिमेन्स ली. मुंबई यांना (+५% वाढ व सर्व्हीस टॅक्स १२.३६%सह) एकुण रू.२८,६८,०६०/- इतकी रक्कम देय होत आहे. कंपनीने त्यानुसार करारनामा पाठविला आहे.

सदर कालावधीत कंपनीचे इंजिनिअर वर्षातून ०४ नियमित भेटी देणार असून जेव्हा जेव्हा मशिन नादुरूस्त होईल तेव्हा तेव्हा येऊन दुरुस्ती व देखभाल आणि आवश्यकतेनुसार सॉफ्टवेअर/हार्डवेअर सेफ्टी अपडेट करणार आहेत. वरील कॉन्ट्रक्टमध्ये मशिनचे हेलीयम गॅस रिफीलींग व कोल्ड हेड सारख्या महागडया पार्टसह सर्व स्पेअर पार्टचा तसेच मशिनसोबत पुरविण्यात आलेल्या यु.पी.एस, चिलर प्लांट यांची देखील सर्व स्पेअर पार्टसह दुरूस्ती व देखभाल करणार आहे.

पुढील काळात सदर मशिन व्यवस्थित कार्यान्वित राहणे कामी तसेच मागील चार वर्षात कंपनीस अदा केलेली रक्कम व त्यांनी केलेला अंदाजे खर्च या बाबींचा विचार करता संस्थानला सद्यस्थितीत मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे जास्त फायदेशीर राहील. कारण जसजसे मशिन जुने होत जाते तसतसे दुरूस्तीचा खर्च देखील वाढत जातो.कंपनी CMC कालावधी संपण्याच्या एक महिना अगोदर करारनामा पाठविते व त्यानंतर मंजुरी घेण्यात येते. कंपनीने वरील पुरवठा आदेशातील अटीनुसार CMC करणेसाठी एकूण १०० % रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

तरी Magnetom Avanto MRI मशीनचे मे. सिमेन्स लि. मुंबई यांचेकडे दि.०१/०६/२०१४ ते दि.३१/०५/२०१५ या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्व करांसहीत एकुण रु. २८,६८,०६०/-च्या खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Magnetom Avanto MRI मशीनचे दि.०१/०६/२०१४ ते दि. ३१/०५/२०१५ या कालावधीसाठी मे.सिमेन्स लि. मुंबई यांचेकडे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्व करांसहीत एकुण रु.२८,६८,०६०/- मात्रचे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **संस्थानचे मंदिर परिसर प्रवेशद्वार क्रं.२ मधून व्ही.आय.पी.व्यक्तींना श्रींचे दर्शनासाठी प्रवेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे गुरुपौर्णीमा उत्सव २०१४ निमित्त करावयाचे नियोजनाबाबत मा.जिल्हाधिकारी यांचे दालानात मा.नामदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांचे अध्यक्षतेखाली बैठक झाली असून सदरहू बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा झालेली आहे.

गर्दीचे कालावधीत बरेचशे व्ही.आय.पी. साईभक्त हे आपली वाहने ही नगर-मनमाड या राष्ट्रीय महामार्गावर पार्कींग करुन श्रींचे दर्शनासाठी गेट नंबर ०१ मधून प्रवेश करतात. त्यामुळे या महामार्गावरुन इतर खाजगी, सरकारी, बस तसेच रुग्णवाहीका यांना जाणे येणेसाठी मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण होऊन वहातुकीची कोंडी निर्माण होते.

करीता सदरहू सभेमध्ये व्ही.आय.पी. साईभक्तांना समाधी मंदिराचे उत्तरेस असलेल्या गेट नं.०२ मधून प्रवेश दयावा व त्यांचे वाहनांना पार्किंग करीता हॉटेल तीर्थप्रसाद शेजारी असलेला रस्ता वापरणे सोयीचे होईल त्यानुसार कार्यवाही प्रस्तावीत करावी अशी चर्चा झाली.
मा. अध्यक्ष यांनी दि.१७/०७/२०१४ रोजी व्ही.आय.पी. साईभक्तांना गेट नं.२ मधून प्रवेश देणेसाठी दर्शन रांगेची पहाणी केली व याबाबत प्रस्ताव सादर करणेबाबत सूचना केली आहे.

गेट नं. २ च्या बाजुने सध्या समाधी मंदिर परिसराचे उत्तरेस साईभक्तांना उन वारा पाऊस यापासून संरक्षण व्हावे याकरीता पॉलीकार्बोनेट शेड करुन त्यातून दर्शन रांग तयार करण्यात आलेली आहे.

व्ही.आय.पी. साईभक्तांना गेट नं.२ मधून प्रवेश दयावयाचा झाल्यास सध्या सुरु असलेली दर्शन रांग ही वारंवार बंद करावी लागेल त्यामुळे सदरहू रांगेत गोंधाळाचे वातावरण निर्माण होऊ शकते. तसेच साईभक्तांचे गर्दीचे काळात दर्शन रांग छेदून व्ही.आय.पी.ना प्रवेश देणे अडचणीचे होऊ शकते. दर्शन लाईन मधील भक्तांना सुरळीत दर्शन होण्याचे दृष्टीने सोबत जोडलेले नकाशाप्रमाणे गर्दीच्या काळात व्ही.आय.पी. ना गेट नं.१ मधून व इतर वेळी गेट नं.२ मधून दर्शनांसाठी प्रवेश देता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, याबाबत समक्ष पाहणी करुन निर्णय घेण्यात येईल, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ लेंडीबागेतील बाबांचे काळातील बावडीचे भोवती तसेच पणत्या दिवे लावण्याच्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुद-

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

प्रस्तावना– श्री साईबाबांचे काळातील विहीरीचे (बावडी) पाण्याचा वापर बागेतील फुलझाडांना देण्याचे काम बाबा स्वत: करीत असत. शिर्डी येथे श्रींचे दर्शनाकरीता येणारे साईभक्त हे लेंडीबागेतील बावडीचे ठिकाणी आवर्जुन भेट देत असतात. तसेच सदर बावडीमध्ये नाण्यांचे स्वरुपात दक्षिणा टाकतात. लेंडीबागेमध्ये संपुर्ण भागात लॉन लावलेली असुन भक्तांना बागेत फिरण्याकरीता पेव्हींग ब्लॉकचे पाथवे केलेले आहे. दि. १७/०७/२०१४ रोजी मा.अध्यक्ष साहेब यांनी लेंडीबाग परिसराची पाहणी केली असता लेंडीबागेतील बावडीचे बाजूने ब्लॉक बसविण्याच्या सुचना दिलेल्या असल्याचे बगीचा विभाग प्रमुख यांनी दि.१८/७/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. तसेच दि.११/८/२०१४ रोजीचे पत्रान्वये लेंडीबागेत नंदादिपच्या बाजुला पणत्या दिवे लावण्यासाठी बसविण्यात आलेल्या स्टॅन्डचे ठिकाणी मातीचा भाग असल्यामुळे तिथे चिखल तयार होऊन भक्तांना पणत्या दिवे लावण्यासाठी अडचण्येत असल्यामुळे सदरचे भागात ब्लॉक बसवुन मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रस्ताव– लेंडीबागेतील बावडीचे कडेने तसेच पणत्या दिवे लावण्यासाठी बसविण्यात आलेल्या स्टॅन्डच्या ठिकाणी चिखलामुळे अडचण होऊ नये याकरीता साईभक्तांचे सोईसाठी या भागात ६० एम.एम. जाडीचे पेव्हींग ब्लॉक बसविता येईल. याकामी सोबतचे अंदाजपत्रकानुसार रक्कम रु.३,१०,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी लेडीबागेतील बाबांचे बावडी भोवती तसेच पणत्या व दिवे लावतात या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी येणारे रक्कम रु.३,१०,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता मिळणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.७३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, लेंडीबागेतील बाबांचे काळातील बावडीचे भोवती तसेच पणत्या/ दिवे लावण्याच्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या रु.३,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ शासनाने जाहीर केलेले मराठा व मुस्लिम आरक्षण तसेच सुधारीत बिंदुनामावली लागू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मध्ये संस्थन आस्थापनेवर कार्यरत असणा-या/ संस्थान सेवेत समाविष्ट होणारे कर्मचा-यांसाठी अधिनियम क्रं.०८ हा खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती, निरधीसुचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि नागरीकांच्या इतर प्रवर्ग मधील इतर व्यक्तीसाठी लोकसेवा मधील पदांमधील रिक्त जागांच्या आरक्षणाकरीताआणि तत्संबंधीत व तदनुशंगीक बाबीसाठी तरतुद करण्याकरीता अधिनियम-

या अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७ डिसेंबर२००४ रोजी सभेत विषय नं.४३ निर्णय क्रं.१७० अन्वये मागास व इतर मागास वर्गातील कर्मचा-यांना संस्थान सेवेत आरक्षण देणेबाबत अधिनियम क्रं.०८ चे अनुपालन करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील रिक्त पदे भरतांना पदोन्नती देतांना सदर अधिनियमातील मागासवर्गीयांचा अनुशेष विचारात घेवून पदे भरावी लागतील. यास महाराष्ट्र अधिनियम क्रं.०८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे असा निर्णय पारीत झालेला आहे. त्यानुसार शासकीय कार्यालयामध्ये ठेवण्यात आलेल्या रेकॉर्ड प्रमाणे १०० बिंदुनामावलीनुसार सरळसेवा व पदोन्नतीबाबतची कार्यवाही करणे, तत्संबंधी शासकीय विहीत नमुन्यात कार्यालयीन रेकॉर्ड तयार करणे याकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१ जुन,२०१३ चे सभेतील विषय क्रं.८८ निर्णय क्रं.५२१ अन्वये, मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार स्थापन केलेल्या मागासवर्ग कक्षाकडे अभिलेख तयार करण्याचे काम सुरु आहे.

अ) आता महाराष्ट्र राज्य शासनाचे त्यांचे निर्णय क्रं. सीबीसी -१०/२०१३/ प्र.क्रं.३५/ मावक दि.१५ जुलै,२०१४ अन्वये, राज्यातील शैक्षणिक व सामाजिक मागासलेल्या समाजासाठी भारतीय राज्य घटनेतील तरतुदी नुसार शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (Educationally and Socially Backward Category (ESBC) असा नवीन प्रवर्ग तयार करुन या प्रवर्गात मराठा समाजाचा समावेश केलेला आहे. यानुसार शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्गांतर्गत मराठा समाजास शासकीय/ निमशासकीय सरळ सेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामध्ये १६ टक्के आरक्षण लागु केलेले आहे.

ब) महाराष्ट्र राज्य शासनाचे त्यांचे निर्णय क्रं. अविवासी-२०१४/प्र.क्रं.८१/का.-०७ दि.१९ जुलै,२०१४ अन्वये, राज्यातील शैक्षणिक व सामाजिक मागासलेल्या समाजासाठी भारतीय राज्य घटनेतील तरतुदी नुसार विशेष मागास प्रवर्ग-अ निर्माण करुन त्यामध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासप्रवर्ग (Special Bakward Category-A) असा नवीन प्रवर्ग तयार करुन या प्रवर्गात मुस्लिम गटाचा समावेश केलेला आहे. यानुसार शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्गांतर्गत मुस्लिम समाजास शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण लागू केलेले आहे.

क) महाराष्ट्र राज्य शासनाचे उक्तप्रमाणे, मराठा व मुस्लिम समाजास अनुक्रमे १६ व ५ टक्के सरळसेवेसाठी आरक्षण लागू केल्याने सरळबिंदू नामावली मध्ये सुध्दा बदल झालेला आहे. यापुर्वी शासन निर्णय क्रं.बीसीसी-१०९७/प्र.क्रं२/९७/१६-ब दिनांक २९ मार्च,१९९७ अन्वये विहीत केलेली सरळबिंदु नामावली सुधारीत शासन निर्णय क्रमांक २०१३/ प्र.क्रं.३५४/ भाग-२/ २०१३/ १६-ब दिनांक २४ जुलै, २०१४ अन्वये अध्यादेश प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासुन लागु केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेस आरक्षण विषयक कायदा लागू असल्याने शासनाने नव्याने जाहीर केलेल्या शैक्षणिकव सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (१६ टक्के) व विशेष मागास प्रवर्ग (अ) (०५ टक्के) आरक्षण लागु केल्याने संस्थानला लागु करणे आवश्यक आहे. सदरचे आरक्षण लागु केल्यास भविष्यात संस्थानचेकोणत्याही संवर्गपदाचे सरळसेवेव्दारे करण्यात येणा-या नियुक्त्या वरील सुधारित आरक्षणाप्रमाणे कराव्या लागतील. तसेच यापुर्वी संस्थान सेवेत सरळसेवेव्दारे नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची सरळसेवा बिंदुनोंदवही तयार करण्यात येत

आहे. आता सरळसेवा बिंदुनामावली सुधारित झाल्याने झालेल्या बदलानुसार बिंदुनोंदवही तयार करता येईल.

तरी उपरोक्त अ, ब, व क प्रमाणे मान्यता मिळणेकामी आजचे मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेमध्ये निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७४० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, आरक्षण कक्ष)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ सामान्य प्रशासन विभागाकरीता काट्रेज व इंकटँक खरेदीबाबत...**

**प्रस्ताव-** सन २०१३-१४ करीता आवश्यक असणारी कार्यालयीन व संगणकीय स्टेशनरी (वार्षिक साहित्य) खरेदीकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस तसेच सदरचे खरेदीसाठी येणा-या रक्कम रु.२४,५०,०००/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७.०२.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१ नुसार मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी **Civil Application No.3827 Of 2013** दि.०५.०४.२०१३ रोजी उपरोक्त कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा दिनांक २६.०६.२०१३ ते दिनांक ०८.०७.२०१३ अखेर प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्यानंतर मुदतीअंती प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे दिनांक १२.०७.२०१३ रोजी उघडण्यात आले, त्यामध्ये पात्र झालेल्या निविदाधारकांच्या मुळ निविदा (Financial Bid) दिनांक २६.०७.२०१३ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडण्यात आल्या. मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६०६ नुसार न्युनतम दरधारक यांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. व "ज्या साहित्याचे दर आलेले नाहीत, अशा साहित्याकरीता फेरनिविदा/ कोटेशन मागविण्यात यावीत, असे ठरले."

त्यानुसार संस्थानचे नियमीत (दहा) पुरवठाधारकांना इकडील जा.नं.एसएसएस/ खरेदी/ ३५३० दि.०५.११.२०१३ अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून CARTAGE FOR DIGITAL FRANKING MACHINE IJ-९० व INK TANK FOR DIGITAL FRANKING MACHINE IJ-९० खरेदीकामी दिनांक १८.११.२०१३ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार मुदतीअंती तीन व मुदतीनंतर एक अशी एकुण चार पुरवठाधारकांनी दरपत्रके पाठविलेली होती.

प्राप्त दरपत्रके मा.व्यवस्थापन उपसमितीचे दिनांक०६.०१.२०१४ रोजीचे सभेत उघडून त्याबाबत दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला होता. तुलनात्मक तक्त्यानुसार मे.कॉम्प्युलिंक्स कॉम्प्युटर कंझुमेबल्स, मुंबई यांना न्युनतम दराने पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. परंतु त्यांनी आज अखेर साहित्याचा पुरवठा केलेला नाही. त्यांना साहित्याचा पुरवठा करणेबाबत दुरध्वनीद्वारे वारंवार कळविलेले आहे. मात्र त्यांचेकडून कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे त्यांना यापुढे संस्थानचे कुठल्याही खरेदी प्रक्रियेमध्ये सहभाग घेता येणार नाही, असे दुरध्वनीद्वारे कळविण्यात आलेले आहे.

रामनवमी उत्सव २०१४ जवळ आलेने देणगीदार साईभक्तांना, भक्तमंडळ सभासदांना निमंत्रण पत्रिका पाठविणेस अडचण येऊ नये याकरीता फ्रॅकिंग मशिनकरीता आवश्यक कार्ट्रेज व इंकटँक बाजारभावाने इतर पुरवठाधारकांकडून खरेदी करणे आवश्यक असल्याने **CARTAGE FOR DIGITAL FRANKING MACHINE IJ-९०** करीताचे द्वितीय न्युनतम दरधारक मे.कोरस (इंडीया) लि., पुणे व **INK TANK FOR DIGITAL FRANKING MACHINE IJ-९०** करीताचे द्वितीय न्युनतम दरधारक मे.यश एंटरप्रायझेस, नाशिक यांना दुरध्वनीद्वारे त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये उपरोक्त माल पुरविणेबाबत विचारणा केली असता, मे.यश एंटरप्रायझेस, नाशिक यांनी माल पुरविणेबाबत नकार दिलेला आहे. तसेच मे.कोरस (इंडीया) लि., पुणे यांनी मंजुर दरामध्ये उपरोक्त दोन्हीही

साहित्य पुरविणेस संमती दर्शविलेली होती. त्याबाबत त्यांनी त्यांचेकडील दिनांक २५.०३.२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविलेले होते.

मे.कोरस इंडीया लि., पुणे हे सदरचे साहित्याचे अधिकृत उत्पादक आहे. त्यामुळे रामनवमी उत्सव २०१४ करिता तातडीची आवश्यकता म्हणून खरेदी विभागाकडील दि.१५.०३.२०१४ रोजीचे मंजुर टिपणीन्वये मे.कोरस इंडीया लि., पुणे यांचेकडून CARTAGE FOR DIGITAL FRANKING MACHINE IJ-९० प्रती नग रु.१७,३८८/- (द्वितीय न्युनतम) मात्र प्रमाणे १२ नग (एकुण रु.२,०८,६५६/- व INK TANK FOR DIGITAL FRANKING MACHINE IJ-९० प्रती नग रु.१८,९००/- (तृतीय न्युनतम) मात्र प्रमाणे ६ नग (एकुण रु.१,१३,४००/-) खरेदी करण्यात आलेले आहे. सदर खरेदीस एकुण रु.३,२२,०५६/- मात्र् इतका खर्च आलेला आहे. सदरचे साहित्य खरेदीकामी सन २०१३-१४ चे वार्षिक कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदीचे अंदाजपत्रकातून रक्कम रु.३,६०,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख साठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

तरी मे.कोरस इंडीया लि., पुणे यांचेकडून श्री रामनवमी उत्सव २०१४ करिता तातडीची आवश्यकता म्हणून कोरस कंपनीचे CARTAGE FOR DIGITAL FRANKING MACHINE IJ-९० प्रती नग रु.१७,३८८/- (द्वितीय न्युनतम) मात्र प्रमाणे १२ नग (एकुण रु.२,०८,६५६/-) व INK TANK FOR DIGITAL FRANKING MACHINE IJ-९० प्रती नग रु.१८,९००/- (तृतीय न्युनतम) मात्र प्रमाणे ६ नग (एकुण रु.१,१३,४००/-) प्रमाणे खरेदीस व त्याकामी आलेल्या एकुण रु.३,२२,०५६/- (अक्षरी रुपये तीन लाख बावीस हजार छपन्न) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती. सदरचा खर्च हा सन २०१३-१४ चे वार्षिक कार्यालयीन व संगणक स्टेशनरीचे अंदाजपत्रकातून करता येईल.

**निर्णय क्र.७४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यवाहीस व झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव- २०१४ निमित्ताने मंदीर व मंदीर परिसरात फुलांची सजावट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत श्रीं ची ९६ वी पुण्यतिथी उत्सव दि. २/१०/२०१४ ते ४/१०/२०१४ या काळात साजरा होणार आहे. या निमित्ताने श्री साईबाबा मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करण्यात येणार आहे. संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०५/०६/२०१४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४१४ अन्वये पुढील प्रत्येक उत्सवापुर्वी, उत्सव निमीत्ताने मंदिर व मंदिर परिसरामध्ये फुलांची सजावट करणेकामी नावनोंदणी चालु आहे. या आशयाचे संस्थानचे संकेत स्थळावर व ठिक- ठिकाणी फलक लावणेत यावे त्याकरीता जास्त भक्तांनी नावनोंदणी केलयास सर्वांना संधी देणेसाठी मंदिर व मंदिर परिसराचा भाग फुलांची सजावट करणेसाठी विभागुन देणेत यावा, असे ठरले. सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी स्वरुपात सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते. तरी पुण्यतीथी उत्सव निमीत्ताने साईभक्त देणगी स्वरुपात सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवाणगी दिली जाते.

त्यानुसार फुलांची सजावट करणेसाठी पाच साईभक्तांची नावे आलेली आहे. त्यामध्ये ०१) शालीन गठाणी- कलकत्ता, ०२) कविता सक्सेना- दिल्ली ०३) अर्चना दावे- शिर्डी, ०४) रघुराम व्यंकटेश- चेन्नई, ०५) सरवना- बेंगलोर इ. साईभक्तांचे ई-मेल आलेले आहेत. सदर साईभक्तांशी फोनद्वारे संपर्क साधला असता श्री व्यंकटेश-चेन्नई यांनी संस्थानला टि.व्ही. देण्याचे सांगीतले तसेच शालीन गठाणी- कलकत्ता यांनी रु.१०,०००/- देऊ करण्याचे कळविलेले आहे. श्री सरवना बेंगलोर यांनी मंदिर परिसरामध्ये फुलांची सजावट करण्याचे कळविलेले आहे. अ.नं. ०१) चे साईभक्त शालीन गठाणी यांनी श्री पुण्यतिथी उत्सव २०१४ निमित्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करणेसाठी त्यांनी रु. १०,०००/- (दहा हजार) मात्र ची देणगी देऊ केलेली आहे. तसेच अ. नं. ०२) चे साईभक्त कविता सक्सेना व अ.नं. ०३) चे साईभक्त अर्चना दावे यांनी जर कोणी कामगार, कारागीर फुलांची सजावट करणेस इच्छुक

असेल तर अशा कामगारांना किंवा कारागीरांना फुल साजवटीसाठी सहाय्य करण्याची परवानगी देण्यात यावी असे कळवीलेले आहे. तसेच अ.नं ०४) चे साईभक्त श्री रघुराम व्यंकटेश चेन्नई व श्री सरवना बेंगलोर यांनी श्री पुण्यतिथी उत्सव २०१४ साठी मोफत फुलांची सजावट करणेस तयार आहे.

श्री साईबाबांच्या ९६ व्या पुण्यातिथी निमीत्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान व अन्य महत्तवाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणेसाठी इच्छुक असलेल्या श्री सरवना बेंगलोर व श्री व्यंकटेश चेन्नई हे दोन साईभक्त इच्छुक आहे. परंतु यामध्ये श्री व्यंकटेश यांना संस्थानला टि.व्ही.चे संच (१० x १०) फुट किंवा त्या किंमतीचे इतर देणगी देणार आहे. त्यामुळे बेंगलोरचे साईभक्त श्री सरवना यांच्याकडुन फुलांची सजावट करुन घेता येईल. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०७/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६०९ अन्वये देणगीदार यांना राहण्यासाठी AC रुम, दर्शन, आरती, भोजन पास व फुल सजावट करणारे कारागीर यांना सामान ठेवणेसाठी हॉल व जेवणाची व्यवस्था संस्थान मार्फत करता येईल.

तरी सदर साईभक्त श्री. रघुराम व्यंकटेश चेन्नई यांच्याकडुन टि.व्ही. देणगी घेता येईल व श्री सरवना यांचेकडुन श्रीं च्या ९६ व्या पुण्यतिथी निमीत्ताने फुलांची सजावट करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख / प्र.अधिक्षक, श्री साईप्रसाद निवासस्थान/ प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६ विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.७४३ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** साईभक्तांना जनसंपर्क कार्यालय नेमके कुठे आहे. याबाबत बोध होत नाही. त्यामुळे बस स्थानकापासुन जनसंपर्क कार्यालयापर्यंत ४-५ प्रमुख ठिकाणी जनसंपर्क कार्यालयाकडे जाण्याचे मार्गदर्शक बोर्डस् साईभक्तांच्या सहज नजरेस येतील, अशा पध्दतीने लावण्यात यावेत.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ जनसंपर्क अधिकारी)

---

**(२)** त्रिसदस्य समिती सभेचे वेळेस सभागृहामध्ये उपस्थित असणाऱ्या सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी समिती सभेत झालेल्या चर्चेचे इतिवृत्त तयार होऊन, त्यावर समिती सदस्य व मा.अध्यक्ष महोदय यांच्या स्वाक्षऱ्या होऊन अंतिम होईपर्यंत सदरहू चर्चेची बाहेर कुठेही वाच्यता करु नये. सभेमध्ये झालेली चर्चा गोपनीय ठेवणेत यावी. (कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

**(३)** संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण विभागामार्फत सर्व विभागांचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे काम त्वरीत सुरु करणेत यावे. याकामी आवश्यक असणारे कर्मचारी सामान्य प्रशासन विभागाने प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावेत. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

वरील निर्णय क्र.६७७ ते ७४३ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०६०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (कुंदनकुमार सोनवणे) | (अनिल कवडे) | (शशिकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी